म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा॰वा॰
दा. क्र. १९८
BVBK-0400197

बो. वा.
नों. क्र. १९७

१९७
किशोर १७६

# कलासागरातील मोती

## ( भाग १ )

लेखक :

दत्ता जी. कुलकर्णी

१०२०१२ १८६

: प्राप्तिस्थान :

अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक
पुणे ३०

सौ. मालिनी कुलकर्णी
२४३ बद्रिकाश्रम, १ ली खेतवाडी
अलंकार टॉकीजशेजारी, गिरगांव, मुंबई ४

किंमत तीन रुपये

BVBK-0400197

# कलासागरातील हा एक एक मोती

कलासागरातील हा एक एक मोती मी वेचून आज माझ्या वाचकां-पुढे ठेवीत आहे. प्रत्येक मोती त्याची अलग झळक दाखविणारा आहे. त्या प्रत्येकाचे पैलू इतक्या विविध प्रकारच्या इंद्रधनुष्टी रंगाने झळाळणारे आहेत की, त्या प्रत्येक पैलूवर शेकडो शब्द लिहिले तरी अपुरे पडतील !

केसरी-मराठा-ग्रंथालय, पुणे यांचे मला या पुस्तकाच्या बाबतीत बहुमोल सहकार्य लाभले आहे. ग्रंथपाल श्री. बाळासाहेब करकरे यांची कार्यतत्परता या ठिकाणी विशेष उल्लेखनीय होय.

माधवराव केमकर, मुंबई यांच्या डोक्यात नेहमी प्रकाशनासंबंधी नवीन नवीन कल्पना घोळत असतात. मुंबई भेटीत ते ह्या पुस्तकाची कल्पना माझ्याशी बोलले. नारायणराव अरगडे यांनी सतत चिकाटीने माझ्या मागे लागून हे लिखाण पुरे करून घेतले. माझ्या ह्या यशात या दोघां मित्रांचा मोठा वाटा आहे.

निरनिराळ्या कला क्षेत्रातील कलावंतांचा कलात्मक जीवनाचा हा शब्दचित्रात्मक परिचय. दोषांकडे दुर्लक्ष करून मुद्दाम सहेतुक हा लिहिला आहे. उद्याच्या माझ्या भावी कलाकारांना त्यापासून योग्य ती स्फूर्ति मिळावी आणि या कलासागरातील मोत्यांमध्ये अविरत भर पडत जावी !

१०८।२६, एरंडवणे, पुणे ४. दत्ता जी. कुलकर्णी
२८ फेब्रुवारी ७०

प्रकाशिका : सौ. निर्मला नारायण अरगडे, अरगडे कुलकर्णी प्रकाशन
१६।२२४, लोकमान्यनगर, पुणे ३०
प्रथमावृत्ति एप्रिल १९७०
मुद्रक : बाबर व भंडारी कं., ३४२ नारायण पेठ, पुणे ३०.

चि. राधाकृष्ण रामचंद्र कुलकर्णी

नाशिक

यांस प्रेमपूर्वक भेट

दत्ता जी. कुलकर्णी

# प्रकाशकीय

## शब्दांजली

कै. बाल गंधर्व !—

अभिनयाचा सम्राट जाहला
रंगभूमीवर अजोड एक ।
अजातशत्रु ज्ञानी गायक
फूल सुगंधी आणि सुरेख ।।

कै. बाबुराव पेंढारकर :—

रोमी रोमी तो भरला अभिनय
पकड घेतली रसिकांची ।
अष्ट पैलू कामे करुनी
मने जिंकली लोकांची ।।


कै. सी. के. नायडू :—

क्रिकेटच्या खेळामध्ये
अनेक 'मोती' चमकून गेले ।
नांव परंतु 'सी. के.'चे
सुवर्णाक्षरी अमर राहिले ।।

'मधु'

१

# कलासागरातील राजहंस



कलावंताची कला आणि शिंपल्यातला मोती लक्षात यायला बराच काळ मधे जावा लागतो. कधी कधी बिचारा तो कलावंत, तो शिंपला योग्य हाताचा स्पर्श न झाल्याने तसाच कुठेतरी जिणे जगत रहातो. आणि त्याचे ते तेज जाणवण्याऐवजी तसेच लोप पावते !

जगात आजपर्यंत अनेक कलावंत होऊन गेले. अर्थात् ज्यांना सुदैवाने हात दिला त्याचेच तेज जगाला दिपवून गेले आहे. अशा सुदैवी कलावंतात बालगंधर्व यांची गणना करावी लागेल.

कदाचित या राजहंसाला तो हंस असल्याचीसुद्धा लहानपणी जाण नसेल. आपल्या लहानपणी तो तसाच परिस्थितीच्या शिंपल्यात पडून राहिला असला तर त्याच्याकडे कुणाचे लक्ष गेले नसते. पण या नारायणाची त्या नारायणाला लाज राखायची होती असे वाटते. तसे नसते तर पुण्याच्या शुक्रवार पेठेतल्या एका अज्ञात सामान्य घरात जन्मलेला हा मुलगा बालगंधर्व झाला असता का ?

असामान्य माणसांचं सारंच असामान्य असावं असं काहीसं दिसून येतं. तसं नसतं तर हा अवलिया लाखो रुपये आपल्या कलेवर मिळवून-सुद्धा उत्तर आयुष्यात कफल्लक राहिला असता का ? पैशाची पर्वा सामान्य जन करतात. असामान्य माणसाला पैशाची पर्वा कधी वाटत नाही. म्हणूनच बहुधा चंचल लक्ष्मी ह्या अशा कलंदरावर सुद्धा कधी कधी मनापासून प्रसन्न होत असावी.

बैठकीला हजार रुपयांची अत्तरे खरीदणारे शौकीन बालगंधर्व खरो-खरच सम्राटाचे जिणे ह्या मराठी रंगभूमीवर जगले. असा नटसम्राट, असा कलेची कदर करणारा, दिलाचा दिलवर, मनाचा मानी बालगंध आपल्या सुरेल गोड गळ्याने आणि अभिनय संपन्नतेने महाराष्ट्र नाट्य-रसिकांवर अनेक पिढ्या राज्य करीत होता. राजे महाराजेसुद्धा त्याच्या कलेवर फिदा झाले. कान्होपात्रेच्या भूमिकेतसुद्धा ज्याने आपली अभि-

जयपटुता आणि भक्तिभावना टिकविली त्या नटसम्राटाचे आसन ह्या मराठी रसिकांच्या मेळाव्यात आज सुने पडले आहे. असा हा गंधर्व-लोकीचा शापित गंधर्व पुण्य-नगरीच्या पुण्याईने आणि महाराष्ट्राच्या भाग्याने ह्या मराठी मातीच्या सुगंधात आपल्या कलासुगंधाची भर घालून गेला.

त्यांचा जन्म पुण्यात झाला. अंतही पुण्यात झाला. त्यांच्या कलेचे कौतुक साऱ्या महाराष्ट्राने केले असले तरी पुणेकरांनी ते विशेष केले. मुंबई, पुणे, कोल्हापूर आणि सांगली या चार कलाबिंदूंशी त्यांचे जीवन निगडीत झाले होते. येथील जनतेने त्यांचे सौंदर्य, त्यांचा आवाज, त्यांचा अभिनय याच देही याच डोळा पाहिला, ऐकला आणि अनुभवला. संगीताच्या सरोवरात गायनाच्या स्वरलहरींवर कलेच्या कमल-दलांमधून या रसिक राजहंसाबरोबर सारा महाराष्ट्र विहरला. पुणेकरांना मिळालेले हे स्वर्गसौख्य त्यांच्या ध्यानी मनी १८८८ च्या जूनमध्ये होते का ?

२६ जून १८८८ ला ह्या नारायणाचा पुण्याच्या एका कुलकर्णी घराण्यात जन्म झाला. त्यांचे कुलकर्णी आडनाव हे आता कुणाला माहीतही नाही. गावपाटलाबरोबर काम करणारी ही जमात नाना कारणांनी आपली वडिलार्जित गावे सोडून शहराच्या आश्रयाला आली. नारायणाचे वडील श्रीपादराव नव्हे त्यांचेही वडील दक्षिण सातारा जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील नागठाणे हे आपले मूळचे गाव आणि मूळचे कुळकर्णी नाव जणू सोडून पुण्याला आले. कुलकर्ण्यांचे राजहंस झाले. हा शुभशकूनच नव्हता काय ?

नारायणाचा जन्म पुण्याच्या शुक्रवार पेठेत झाला. त्यांचे वडील नोकरी पेशाचे होते. पाटबंधारे खात्यांत ते ड्रॉफ्टस्मन होते. कुटुंब नियोजनाचे महत्त्व त्याकाळी सरकारलाही फारसे नसल्याने अज्ञानी

कलावंताची कला आणि शिंपल्यातला मोती लक्षात यायला बराच काळ मधे जावा लागतो. कधी कधी विचारा तो कलावंत, तो शिंपला योग्य हाताचा स्पर्श न झाल्याने तसाच कुठेतरी जिणे जगत रहातो. आणि त्याचे ते तेज जाणवण्याऐवजी तसेच लोप पावते !

जगात आजपर्यंत अनेक कलावंत होऊन गेले. अर्थात् ज्यांना सुदैवाने हात दिला त्याचेच तेज जगाला दिपवून गेले आहे. अशा सुदैवी कलावंतात बालगंधर्व यांची गणना करावी लागेल.

कदाचित या राजहंसाला तो हंस असल्याचीसुद्धा लहानपणी जाण नसेल. आपल्या लहानपणी तो तसाच परिस्थितीच्या शिंपल्यात पडून राहिला असला तर त्याच्याकडे कुणाचे लक्ष गेले नसते. पण या नारायणाची त्या नारायणाला लाज राखायची होती असे वाटते. तसे नसते तर पुण्याच्या शुक्रवार पेठेतल्या एका अज्ञात सामान्य घरात जन्मलेला हा मुलगा बालगंधर्व झाला असता का ?

असामान्य माणसांचं सारंच असामान्य असावं असं काहीसं दिसून येतं. तसं नसतं तर हा अवलिया लाखो रुपये आपल्या कलेवर मिळवून-सुद्धा उत्तर आयुष्यात कफल्लक राहिला असता का ? पैशाची पर्वा सामान्य जन करतात. असामान्य माणसाला पैशाची पर्वा कधी वाटत नाही. म्हणूनच बहुधा चंचल लक्ष्मी ह्या अशा कलंदरावर सुद्धा कधी कधी मनापासून प्रसन्न होत असावी.

बैठकीला हजार रुपयांची अत्तरे खरीदणारे शौकीन बालगंधर्व खरो-खरच सम्राटाचे जिणे ह्या मराठी रंगभूमीवर जगले. असा नटसम्राट, असा कलेची कदर करणारा, दिलाचा दिलवर, मनाचा मानी बालगंध आपल्या सुरेल गोड गळ्याने आणि अभिनय संपन्नतेने महाराष्ट्र नाट्य-रसिकांवर अनेक पिढ्या राज्य करीत होता. राजे महाराजेसुद्धा त्याच्या कलेवर फिदा झाले. कान्होपात्रेच्या भूमिकेतसुद्धा ज्याने आपली अभि-

जयपटुता आणि भक्तिभावना टिकविली त्या नटसम्राटाचे आसन ह्या मराठी रसिकांच्या मेळाव्यात आज सुने पडले आहे. असा हा गंधर्व-लोकीचा शापित गंधर्व पुण्य-नगरीच्या पुण्याईने आणि महाराष्ट्राच्या भाग्याने ह्या मराठी मातीच्या सुगंधात आपल्या कलासुगंधाची भर घालून गेला.

त्यांचा जन्म पुण्यात झाला. अंतही पुण्यात झाला. त्यांच्या कलेचे कौतुक साऱ्या महाराष्ट्राने केले असले तरी पुणेकरांनी ते विशेष केले. मुंबई, पुणे, कोल्हापूर आणि सांगली या चार कलाबिंदूंशी त्यांचे जीवन निगडीत झाले होते. येथील जनतेने त्यांचे सौंदर्य, त्यांचा आवाज, त्यांचा अभिनय याच देही याच डोळा पाहिला, ऐकला आणि अनुभवला. संगीताच्या सरोवरात गायनाच्या स्वरलहरींवर कलेच्या कमल-दलांमधून या रसिक राजहंसाबरोबर सारा महाराष्ट्र विहरला. पुणेकरांना मिळालेले हे स्वर्गसौख्य त्यांच्या ध्यानी मनी १८८८ च्या जूनमध्ये होते का ?

२६ जून १८८८ ला ह्या नारायणाचा पुण्याच्या एका कुलकर्णी घराण्यात जन्म झाला. त्यांचे कुलकर्णी आडनाव हे आता कुणाला माहीतही नाही. गावपाटलाबरोबर काम करणारी ही जमात नाना कारणांनी आपली वडिलार्जित गावे सोडून शहराच्या आश्रयाला आली. नारायणाचे वडील श्रीपादराव नव्हे त्यांचेही वडील दक्षिण सातारा जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील नागठाणे हे आपले मूळचे गाव आणि मूळचे कुळकर्णी नाव जणू सोडून पुण्याला आले. कुलकर्ण्यांचे राजहंस झाले. हा शुभशकूनच नव्हता काय ?

नारायणाचा जन्म पुण्याच्या शुक्रवार पेठेत झाला. त्यांचे वडील नोकरी पेशाचे होते. पाटबंधारे खात्यांत ते ड्रॉफ्टस्मन होते. कुटुंब नियोजनाचे महत्त्व त्याकाळी सरकारलाही फारसे नसल्याने अज्ञानी

प्रजेला त्याचे फारसे सोयरसुतक नव्हते. म्हणून या भाग्यवान महन्मंगल भारतार्चा अज्ञानी, दरिद्री जनता मूल म्हणजे आकाशाचे फूल समजून शास्त्राऐवजी अंधश्रद्धेने जगत आणि वागत होती. म्हणूनच नारायणरावांना दहा भावंडे होती. कमावणारा एक, पगार तुटपुंजा, खाणारी तेरा तोंडे! त्यामुळे नारायणरावांचे बालपण राजहंसासारखे गेले नाही; तर ते कमलतंतूला जखडलेल्या, लिडबिडलेल्या चिखलासारखे कष्टप्रद गेले.

श्रीपादरावांना गाण्याचा शोक होता. सतार वाजविण्याची हौस होती. बापालाच अभ्यासाची जेमतेम गोडी असल्याने त्यांच्या मुलांना तरी ती अधिक कशी असणार? मुले अभ्यास करीत पण तो तेवढ्या-पुरताच असे. नारायणही त्याच पंक्तीतला! त्याला अभ्यासापेक्षा बापाचे सतार-वादन ऐकणे अधिक आवडे. त्याचे वडील गाण्याप्रमाणे नाटकाचेही षौकीन होते. घरच्या सांसारिक कटकटींना कंटाळून गावात नाटककंपनी आली म्हणजे ते खुशाल मागचा पुढचा विचार न करता मिळेल ते तिकीट काढून नाटकाला जाऊन बसत. बाबांच्या मागे हट्ट धरून छोटा नारायणही अनेकवेळा त्यांच्याबरोबर नाटकाला जाऊन बसे.

नोकरी निमित्त वडिलांची वारंवार बदली होई. त्यामुळे सर्वांच्या शिक्षणाची अधिकच आबाळ होई. त्याकाळी 'शाहू नगरवासी मंडळी'ची नाटके महाराष्ट्रभर चालत. ह्या कंपनीची अनेक नाटके लहाणपणी नारायणरावाने पाहिली होती. पुढे नटसम्राट होणारा हा, बाल गंधर्व लोकीचे कलाशिक्षणच अेकलव्य निष्ठेने घेत तर नव्हता ना?

मुलाचे रूप बापाच्या फारसे लक्षात आले नाही. पण पोराचा गळा गाण्याला योग्य आहे, हे श्रीपादरावांच्या लक्षात आले. आणि त्यांनी ते जळगावाला असताना मेहबूब खाँ यांच्याकडे त्याला संगीत शिक्षणाचे प्राथमिक धडे घ्यायला परवानगी दिली. आवडीचा उद्योग माणसाला करायला मिळाला म्हणजे चिमुरडं पोरसुद्धा त्यात रंगून जातं, आपली

तहानभूक विसरतं, आपल्या साधनेत मग्न होतं. कलासाधना, कलासाधना म्हणतात ती यापेक्षा काय निराळी असते ?

वयाच्या दहाव्या वर्षी हा नारायण पुण्याला आला. त्यावेळी त्यांचे चुलते यशवंतराव कुलकर्णी पुण्याच्या केसरीत व्यवस्थापक विभागात काम करीत होते. पुतण्याची गादी बळकाविणाऱ्या राघोबाच्या याच पुण्यात नारायणाच्या यशवंतकाकाने मात्र त्याच्या कलेचे कौतुक मनापासून केले. त्यांच्याचमुळे लोकमान्यांनी या छोट्या नारायणाचे सुरेल स्वरातील गंधर्वलोकीचे गायन ऐकले. ते खूष झाले. आणि सहजच उद्गारले, " अरे, हा बाल अगदी गंधर्वासारखा सुरेख गातो ! "

भविष्यदृष्ट्या लोकमान्यांची ही वाणी खोटी थोडीच ठरणार होती. पुढे कारणाकारणांनी त्यांचे गाणे होत गेले, आणि लोकमान्यांनी त्यांना दिलेले ' बाल-गंधर्व ' हे मानाचे पान ते कलेकलेने सार्थ करीत राहिले. कालांतराने तर कुलकर्ण्यांसारखे राजहंस हे आडनावही नारायणाच्या पुढून निवून गेले. नारायणराव ' बालगंधर्व ' झाले. ते मराठी कला इतिहासात कायमचेच !

गायनाची ही अशी साधना चालली असताना शालेय चाकोरीतील शिक्षणही चालूच होते. १९०३ ला ते इंग्रजी दुसरीत शिकत होते. पण शाळेत लक्ष होते कुठे ? सगळ्या विषयात बहुधा त्यांना गाणेच दिसत असावे. त्या निरस कंटाळवाण्या अभ्यासक्रमात या रससम्राटाला अर्थातच त्याच्या बालपणीही रस वाटला नाही. पण घरचे लोक पिटाळतात, म्हणून त्यांना शाळेत जावे लागत होते.

कुठल्याही गोष्टीला काळ यावा लागतो, वेळ यावी लागते, योग यावा लागतो ! अर्थात तो कोणत्या रूपाने आणि कसा येईल हे काही सांगता येत नाही. ते माणसाला सांगता आले असते तर ? माणूस, माणूस राहिलाच नसता ! १९०४ साली त्यांना कुत्रे चावले. तेव्हा त्यावर उप

चार करण्यासाठी त्यांना कोल्हापूरच्या अप्पाशास्त्री बेल्हेकर यांच्याकडे नेण्यात आले. उपचार सुरू झाले. पण बहुधा कुत्रा चावण्याचे हे निमित्त परमेश्वरी योजनेनेच घडले असावे. कारण त्यामुळेच त्यांना कोल्हापूरला जाता आले. त्यावेळी कोल्हापुरात आप्पैया बुवा नावाचे एक प्रसिद्ध गायक होते. त्यांच्याकडे नारायण गाणे शिकण्यासाठी जाऊ लागला.

कोल्हापूर नव्हे कलापूर ! कलामहर्षि राजर्षि शाहू महाराज हे त्याकाळी कोल्हापुरात अनेक कलावंतांना आश्रय देऊन कलेची कदर करीत होते. त्यामुळे नानाप्रकारचे कलावंत या कलानगरीत आपल्या कलागुणांचा विकास करीत होते. अल्लादियाँ खाँ हे त्यावेळी कोल्हापूरचे दरबार गायक होते. आप्पैया बुवांकडे त्यांनी नारायणाचा आवाज ऐकला. त्याची तान या गानसम्राटालासुद्धा डोलायला लावती झाली. शाहूमहाराजांनी नारायणाचे गाणे ऐकले आणि त्यांचे तयार कान एकदम खूप झाले. पोराला त्यांनी नीट न्याहाळले. त्याच्या शिक्षणाची व्यवस्था खाँसाहेबांकडे करावी असे त्यांनी ठरवले. पण त्याच्याशी बोलताना त्यांच्या लक्षात आले की त्याचा उजवा कान फुटला आहे. महाराजांनी आपल्या खास अधिकाऱ्यांमार्फत त्याला मिरजेला मिशन हॉस्पिटलमध्ये पाठविले.

दुग्धशर्करा योग म्हणतात तो हाच! मणीकांचन योग म्हणतात तो हाच! त्यावेळी मिरजेला किर्लोस्कर नाटकमंडळीचा मुक्काम होता. किर्लोस्कर नाटकमंडळी म्हणजे त्याकाळची महाराष्ट्राची सजीव रंग-देवताच ! कानावर उपचार दवाखान्यात जाऊन करावे आणि किर्लोस्कर नाटक-मंडळीत रहावे अशी महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांमार्फत त्याची व्यवस्था केल्याने तो मिरजेला या नाटक मंडळीत राहू लागला. प्रत्यक्ष शाहूमहाराजांची आज्ञा असल्याने ती डावलणे नाटक-मंडळीला शक्य झाले नाही.

एकच वर्षापूर्वी ह्याच किर्लोस्कर नाटक-मंडळीत नारायण आपण होऊन गेला होता; त्याचं रूप कंपनीच्या लोकांच्या डोळ्यांत भरलं होतं. त्याच्या आवाजाची परीक्षा घेण्यात आली होती, सुरेल आवाज असूनही तो शास्त्राच्या अभ्यासू चौकटीत बसवून कमावलेला नसल्याने त्या गानदर्दी कंपनीतल्या माणसांना त्याचा आवाज म्हणजे ‘ फुटक्या काठाचं मडकं ’ वाटले होते; आणि त्यांनी त्याला तेव्हा घालवून दिलं होतं. पण तोच नारायण दत्त म्हणून एक वर्षाने हा असा कंपनीत आला होता.

शाहूमहाराज लहर लागली की कंपनीचे नाटक बघायला येत. कलावंतांचे कौतुक करीत. नारायणाची विचारपूस करीत. असे करता करत १९०५ साल उजाडले. देवल मास्तर, नानासाहेब जोगळेकर, चिंतोबा गुरव, गणपतराव बोडस वगैरे दर्दी मंडळींना शाहूमहाराजांमुळे नारायणाचे गाणे पुन्हा दोन वर्षांनी ऐकावे लागले, गाण्याच्या सुरुवातीला सर्व नाखूष होते पण गाणे ऐकताच सारे खूष झाले. ते ज्याला काठ फुटलेलं फुटकं मडकं समजले होते तो हा असा सुरेल सतारीसारखा निघाला. त्यावेळी नारायणाचे वय अवघे सतरा वर्षाचे होते.

प्रपंच मोठा, पगार तुटपुंजा, गाण्या-नाटकाचा छंद, पै-पाहुण्यांचे अशाही परिस्थितीत आगतस्वागत त्यामुळे श्रीपादरावांना १२०० च्या आसपास कर्ज झाले होते. ते त्रासले होते. कानावरील उपचार संपल्यावर कंपनी सोडून नारायण घरी जायला निघाला. तेव्हा गणपतराव बोडस त्याला म्हणाले, “ नारायणा, परमेश्वराने तुला सुंदर रूप दिले आहे. आमच्या नाटककंपनीत येतील तर मौज करशील ! ” आंधळा कधी डोळा नाकारील का ? नारायण कंपनीत यायला तयार झाला ! आणि देवल मास्तरांनी त्याला प्रथम शारदेत नटीची छोटीशी भूमिका दिली.

भूमिका लहान, नारायणही लहान! पण ती लहान भूमिकासुद्धा नारायणाने तहान, भूक विसरून तयार केली. कोणता शब्द उच्चारताना मुखावर कसा भाव आणायचा हे त्याने नीट हेरले. इतर पात्रांच्या हाल-चालीकडे, अभिनयाकडे त्याने निष्ठापूर्वक लक्ष दिले. आणि पहिला प्रयोग झाला. शारदेतील नटीची ही पहिली भूमिका रंगभूमीवर त्यांनी रंगविली. आपल्या मुलाचे शाळेतील स्नेहसंमेलनातील नाटकाचे काम अनेक माता-पिता दरवर्षी पाहतात. मुलाचे अगर मुलीचें कौतुक करतात आणि मुलाने अगर मुलीने एखादे बक्षीस मिळविले तर त्यांना मुलाचे कोण कौतुक वाटते. नारायणाचे हे पहिले काम पाहायला त्याची आई हजर होती. पण हे काम शालेय रंगभूमीवरील नव्हते तर साक्षात् रंगभूमीवरील होते. कसलेल्या नटांबरोबर त्यांना हे पहिले काम करावे लागले होते. त्यांचे काम बहारीचे झाले. प्रेक्षक आणि जाणकार खुश झाले. या मुलाला कंपनीत ठेवून घ्यावे म्हणून आग्रह सुरू झाले. वास्तविक आईची परवानगी मिळणे कठीण पण ती मिळाली. मुलाला छंद म्हणून गाणे शिकविणारे वडील मात्र त्याने धंदा म्हणून नाटकात काम करावे या विरुद्ध! मामाही त्याच पंथातले!

नारायणाचा नाट्ययोग बलवत्तर होता हेच खरे! कारण ही कुणकुण बहुधा त्यांच्या चुलत्यामार्फत लोकमान्यांच्या कानापर्यंत गेली असावी. प्रत्यक्ष टिळकांनी श्रीपादरावांची समजूत घातली व ते म्हणाले, “मुलाचे जर नुकसान झाले तर मी माझ्या पदरचे वीस हजार रुपये देईन.”

कोल्हापूरच्या शाहू महाराजांचीही नारायणाने किर्लोस्कर नाटक मंडळीत जावे अशी इच्छा होती. एवढ्या मोठ्या लोकांच्या इच्छा श्रीपादरावांना डावलता आल्या नसाव्यात म्हणून ते अखेरीस नाटक मंडळीत नोकरीला राहिले.

देवल मास्तरांनी त्यांच्या पहिल्या भूमिकेवर चांगले लक्ष दिल्यामुळे या छोट्या पोरातील मोठा कलावंत त्यांच्या कलादृष्टीला स्पष्ट दिसला आणि त्यांनी त्याला शकुंतलेची मोठी भूमिका दिली.

नारायणाचे काम वाढले, जबाबदारी वाढली. मोठ्या नटांशी येणारा संबंध वाढला. तालमीचे कष्ट वाढले. नकला पाठ करण्याचे कसब वाढले. पण या साऱ्या गोष्टीला तो कंटाळला नाहीं, त्रासला नाही की वैतागून तेथून पळ काढण्याचा विचार त्याच्या मनाला शिवला नाहीं. निश्चयाच्या बळावर तो हे सारे आनंदाने करू लागला. पुन्हा पुन्हा अभिनय करणे पुन्हा पुन्हा नकला म्हणणे ही काही साधी गोष्ट नाही. एका रात्रीत रंगणाऱ्या नाटकाच्या मागे अनेक दिवस-रात्रीची तपश्चर्या असते. ही साधना, ही कलापूजा जो जितकी प्रामाणिक करील तितकी त्याची भूमिका उठावदार होते, रंगते, रसिकमान्य होते. म्हणूनच नारायणाने शकुंतलेची ही अवघड भूमिका अगदी पहिल्यांदा मिरजेच्या रंगभूमीवर यशस्वी केली. त्यावेळी प्रत्यक्ष शाहूमहाराज आपल्या या मानसकला पुत्राचे काम पहायला कौतुकाने हजर होते. त्यांना आणि इतर साऱ्या जाणत्यांना आपल्या अभिनयाने नारायणाने दिपविले. म्हणून प्रयोग संपताच साऱ्यांनी त्याचे कौतुक केले.

शकुंतलेची भूमिका अशी रंगभूमीवर गाजत असतानाच नाटक मंडळीतील इतर लोकांशी मतभेद झाल्याने नारायणाला धडे देणारे देवल मास्तर कंपनी सोडून गेले. त्याला वाईट वाटले. तो गांगरला. अशा वेळी चिंतोबा गुरव आणि गणपतराव बोडस यांनी त्यांना अभिनयाचे धडे दिले. शकुंतलेची स्त्री भूमिका तरुण नारायणाने अभिनयाने नटून मोहकपणाने प्रेक्षकांपुढे सादर केल्याने सारे रसिक त्याच्यावर म्हणजे त्याच्या सौंदर्यावर व अभिनयावर खूष झाले.

म्हणून सौभद्रातील सुभद्रा, मृच्छकटिकातील वसंतसेना, गुप्त-मंजूषातील नंदिनी या भूमिका त्यांना कंपनीने दिल्या. त्या साऱ्या त्यांनी वरचढ पद्धतीने वठविल्या. त्यामुळे त्यांच्या भूमिका असलेले नाटक रंगू लागले. हा १९०५ चा काळ होता. किर्लोस्कर नाटक मंडळी स्थापन होऊन जवळजवळ पंचवीस वर्षे होत आली होती. कंपनीचा रौप्य-महोत्सव साजरा करावा असे साऱ्यांना वाटतहोते.पण कंपनीच्याअव्यवस्थित आर्थिक परिस्थितीमुळे कंपनी अडचणीत आली होती. नारायणराव नसते तर कदाचत ही अडचण अधिकच वाढीला लागली असती. अशा अवस्थेत कंपनी मिरजेचा मुक्काम संपवून पुण्याला आली. गुप्तमंजूषा हे नाटक पुण्याला लावले. त्यातील नंदीनीच्या त्यांच्या भूमीकेमुळे ते खूपच गाजले, रंगले, रसिकमान्य झाले. अर्थात कंपनीला ‘पैसा भरपूर मिळाला म्हणून किर्लोस्कर नाटक मंडळीने आपला रौप्यमहोत्सव पुण्याला साजरा केला. त्यांच्या अभिनयाप्रमाणेच त्यांच्या गाण्याचीही मोहिनी रसिकांना पडू लागली. कष्टात कसूर न केल्याने अभिनय आणि गाणे दोन्हीही रसिकप्रिय झाले. सुरेख आवाज लवचिक गळ्यातून दाणेदार तान घेऊन असा काही ताल-वलयांचा पक्केपणा आणि तरुण स्त्रीच्या गळ्यातील मोहक भाव स्पष्ट करी की सारे थिएटर भान विसरून जाई. त्यांच्या गाण्यातील ही स्त्रीसुलभता आणि त्यांच्या अवयवातील स्त्री सौंदर्याचा आभास करणारी मोहक रूपता, त्यांच्या वाढत्या यशाला कारणीभूत झाली.

पुण्याला गुप्त मंजूषातील नंदीनी जशी प्रेक्षकाला वेड लावती झाली तशी त्याच काळात सौभद्रातील सुभद्रा मुंबईकरांवर आपले मोहजाल टाकती झाली. म्हणून या नाटकाचे मुंबईला लागोपाठ एका मुक्कामात अनेक प्रयोग झाले. त्यांचा अभिनय, त्यांचे सौंदर्य, त्यांचे गाणे मुंबई-करांना खूप खूप आवडले. तिकीटाअभावी लोक परत जाऊ लागले.

किर्लोस्कर मंडळीला भरपूर पैसा मिळाला. सुभद्रेतील त्यांची सर्वच पदे लोकप्रिय झाली. मूक-नायकातील ‘उगीच का कांता’ ‘सुलभ मनी गणा’ ‘न भूप सुता’ इत्यादी पदे तर लोकांच्या तोंडी झाली.

१९०६ साल जसे त्यांनी गाजविले तसे १९०७ सालही त्यांनी गाजविले. या काळात श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे ‘मति विकार’नावाचे नवे नाटक किर्लोस्करने रंगभूमीवर आणले. त्यातील सरस्वतीची भूमिका त्यांनी केली. १९१० पर्यंतच्या कालखंडात किर्लोस्कर नाटक मंडळी आपली यशस्वी नाटके घेऊन पुण्या-मुंबईप्रमाणेच बेळगाव, हुबळी, सोलापूर, बार्शी, कोल्हापूर, नासिक, नगर, जळगाव, अकोला वगैरे दूर-दूरच्या ठिकाणी गेली. त्यामुळे कंपनीला उत्पन्नही चांगले आले. कंपनीचे खेळ अनेक जणांना पाहता आले.

रसिकावर मोहिनी घालणाऱ्या या सौंदर्यसंपन्न कलावंताला केवळ आपल्या आईच्या हट्टापाई लग्नाच्या बोहल्यावर उभे राहावे लागले. आपल्या रूपाशी विसंगत अशा पारगावकर कुटुंबातील लक्ष्मीबाई या मुलीशी १९०७ साली विवाहबद्ध व्हावे लागले. जणू या नाटकी माणसाच्या संसाराच्या दुःखांत नाटकाची ती नांदी असावी !

१९१० पर्यंतचा काळ त्यांच्या रंगभूमीवरील लोकप्रियतेचा पूर्व कालखंड म्हटला पाहिजे कारण यानंतरचा काळ त्यांच्या परिणामकारी अभिनयाची चमत्कृती दाखविणारा काळ होय. ‘प्रेम शोधन’ हे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे नाटक कंपनीने नव्याने बसवायला घेतले. खाडीलकर त्याच्या तालमी घेऊ लागले. आतापर्यंत नाटकाला दिली जाणारी वाद्यांची साथ फार फार तर तबला आणि पेटी असे. या वादकांना आपल्या वाद्यांसह विंगमध्ये बसून गाणाऱ्या पात्राला साथ करावी लागत असे. त्यामुळे काही काही वेळा नटाच्या खुणेकडे वादकाचे लक्ष नसले तर गाणे म्हणणाऱ्या नटाची फजिती होत असे. म्हणून या नाटकापासून

वादक हल्ली नाटकात प्रेक्षकांच्यापुढे बसतात तसे प्रथम बसण्यास सुरुवात झाली. या नाटकात त्यांना इंदिरेची जी भूमिका देण्यात आली ती अत्यंत साधी होती. पेहेरावही साधा होता. पण तारुण्याची झळाळी नारायणच्या नसानसातून उफाळत असल्याने त्यांची तारुण्य सुलभ-सुंदरता या नाटकात प्रेक्षकांना मोहित करीत असे. गणपतराव बोडस त्यांच्याबरोबर पुरुष भूमिका करीत त्यामुळे नाटक खूप रंगे. विशेषतः तिसऱ्या अंकातील त्या दोघांचे काम फारच बहारीचे होत असे. अशा रितीने निरनिराळ्या नाटकात ते कामे करीत होते. निरनिराळ्या भूमिकांची समज घेऊन ते अभिनय-कला आणि गायनकला जाणकारांकडून शिकत होते.

हाच तो काळ ज्या काळात समाजातील अनेक थरातील लोकांना त्यांचे वेड लागले होते! वास्तविक गंधर्वांच्या पूर्वी नाटकात कामे करणाऱ्या माणसाकडे सुसंस्कृत समाज तुच्छतेने पहात असे. त्यांच्या कलेचे कौतुक घराच्या दाराबाहेर होत असे. अशा माणसांना घरात घेणे त्यांचे सकाळी तोंड पहाणे, अपशकुनी, वाईट समजत असत. पण नारायणरावांनी हे सारे बदलविले. पुण्याचे डेक्कन कॉलेज म्हणजे महाराष्ट्रातले त्यावेळचे श्रीमंत सुशिक्षितांचे कॉलेज समजले जाई. तेथील विद्यार्थ्यांना या काळात नाटकांचे इतके वेड लागले की मुले अभ्यास सोडून त्यांची नाटके पहाण्यासाठी कधी कधी मुंबईला जात. कंपनीचा मुक्काम पुण्यात असला म्हणजे मग काही विचारू नका! मुलांचा गराडा नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी पडे. नाटके तर ते पाहातच पण त्यांच्या गाण्यांच्या खास मैफली ठेवल्या जात. निरनिराळे क्लब त्यांना गाण्यासाठी मानाने बोलावित. त्यांचे गाणे ऐकून, त्यांचे रूप अगदी जवळून न्याहाळून हे रसिक लोक त्यांना अनेक बक्षिसे देत. त्यांच्याबरोबर अनेक फोटो काढून घेत. मेजवान्यांची तर गणतीच नसे. समाजाचे असे प्रेम संपादून, नाटकी लोकां-

बद्दलची तुच्छ भावना स्वतःच्या चांगल्या वागणुकीने दूर करून ते दर दिनी कीर्तीच्या शिखरावर चढतच होते. १९०६ ते १९१० हा काळ म्हणूनच त्यांच्या आयुष्यातला अत्यंत आनंदाचा आणि सुखाचा काळ होय. कंपनीला भरपूर उत्पन्न मिळू लागल्याने कंपनीने सतत त्यांच्या पगाराचा क्रमही वाढता ठेवला होता. प्रतिष्ठा, पैसा, आणि सौख्य हे असे त्यांना मिळत होते. नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी धनिकांचे कडून नित्य गोड कौतुक चाले. थिएटरात आम जनतेचे कौतुक त्यांच्या वाट्याला येई. तर दिवसा कॉलेजकुमार आणि इतरांचे कौतुक त्यांना प्राप्त होई. नाटकाव्यतिरिक्त ते अशा खाजगी बैठकीत गात. असे कार्यक्रम त्यांनी त्या काळी केले. पण त्यासाठी त्यांनी कधी कार्यक्रम चालकांकडून बिदागीची मागणी केली नाही. कलानंदात डुबणाऱ्या कलंदर कलावंताला कनकाचे काय ?

किर्लोस्कर नाटकमंडळी म्हणजे महाराष्ट्रातील एक चालती बोलती रंगदेवता होती. या देवतेच्या आश्रयाला राहणारे सारेजण कलेच्या एका नात्याने एकमेकांना जोडले गेले असल्याने ते सारेजण एखाद्या मोठ्या कुटुंबातील घटकाप्रमाणे राहात. त्यामुळे प्रत्येकाशी दुसऱ्याचे वागणे जोपर्यंत आपुलकीचे होते, तोपर्यंत किर्लोस्कर नाटक मंडळीत फाटाफूट पडली नाही. १९१० च्या दरम्यान त्या काळचे प्रसिद्ध नाटककार खाडिलकर नाटकाच्या तालमी घेण्यासाठी कंपनीत आपुलकीने येऊ जाऊ लागले. गंधर्वांच्या संगीतमय भूमिका पाहून आपणही एखादे संगीत नाटक त्यांच्यासाठी लिहावे असे त्यांना वाटू लागले. वास्तविक 'कीचकवध' आणि 'भाऊबंदकी' ही त्यांची गद्य नाटके अगोदर लोकप्रिय झाली होती. पण नारायणरावांच्यासाठी त्यांनी खास संगीत मानापमान नाटक याच काळात लिहिले. तालमीवर तालमी त्यांनी घेतल्या. १९११ साली कंपनीचा मुक्काम जेव्हा मुंबईला होता तेव्हा या नाटकाचा पहिला प्रयोग तेथे झाला.

हा प्रयोग कदाचित् झालाही नसता. रंगदेवता जणू या नटसम्राटाची सत्वपरीक्षा घ्यायला त्या दिवशी यमाचे पाश घेऊन आली असावी. त्यांची एकुलती एक मुलगी प्रयोगाच्या आदल्या दिवशी यमाच्या पाशात सापडली. नारायणरावावरच काय पण साऱ्या कंपनीवर आकाश कोसळले. नवे नाटक, खाडिलकर लेखक, गंधर्वांची भूमिका आणि मुंबईचे गुजराथी, मुसलमान इत्यादी सर्व समाजांतील त्यांचे प्रेक्षक! पण कंपनी ही केवळ कंपनी नव्हती. ते एक नाट्यकुटुंब होते. सारे हळहळले. कोणाला जेवण गोड लागेना आणि अखेरीस कंपनीच्या व्यवस्थापकांनी संगीत मानापमान नाटकाचा मुहुर्ताचा पहिला प्रयोग धडाक्यानी तिकीट विक्री होऊनही बंद ठेवायचे ठरविले. खिन्न, उदास बसलेल्या नारायण-रावांच्या कानावर हे आले. ते म्हणाले, "देवा! झालं ते झालं. नाटक बंद ठेवू नका. रसिकांचा विरस करू नका." त्यांच्या त्या म्हणण्यावर कोणी काही बोलले नाही. त्या दिवशी आचाऱ्यांनी साऱ्यांचे जेवण तयार तयार केले. पण कोणालाच दुपारचे जेवण गेले नाही. आणि रात्री संगीत मानापमान जेव्हा रंगले, त्यातील पदांना प्रेक्षक टाळ्या देऊ लागले. तेव्ह तर चिंतातूर असलेले कंपनीचे व्यवस्थापक आश्चर्यचकित झाले. स्वतःचे व्यक्तिगत दुःख बाजूला ठेवून ते असे आपल्या भूमिकेशी समरस झाले, म्हणून तर ते रंगदेवतेच्या कठीण कसोटीला उतरले. या नाटका-तील ख्यालगायकी लोकप्रिय करण्याचे श्रेय त्यांनाच होय. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. कंपनीने त्यांना एक भागीदार मानाचे म्हणून स्थान कंपनीत दिले. शंकरराव किर्लोस्कर मालक झाल्यापासून अनेकांशी ते नीट वागत नव्हते. गणपतराव बोडस यांना गंधर्वांचे बोलणे पटले असावे. कारण मिळालेली भागीदारी या कलंदर कलावंताने नाकारली. गणपतरावांनीही त्यांच्या पावलावर पाऊल ठेवले. त्यामुळे एकटे शंकर-राव किर्लोस्कर कंपनीचे मालक झाले

पण शंकरराव या दोघांना दरदिनी अपमानीत वागणूक देऊ लागले. कलेची कास धरणारे हे कलावंत अखेरीस हे सारे असह्य होऊन आपल्या प्रिय कंपनीतून जून १९१३ ला बाहेर पडले.

किर्लोस्कर नाटक मंडळीतून ते असे बाहेर पडावे हा विधी संकेत असावा. ते कंपनीतून बाहेर पडले नसते तर ५ जुलै १९१३ ला म्हणजे साधारण एक महिन्याने गंधर्व नाटकमंडळी स्थापन झाली असती का ? नारायणराव राजहंस, गणपतराव बोडस, आणि गोविंदराव टेंबे या तिघांनी भागीत ही कंपनी स्थापन केली. कंपनीचे हे नाव नाटककार खाडीलकरांनी सुचविले होते.

तीन कलावंतांचा हा त्रिवेणी संगम गंधर्व नाटकमंडळीत झाल्याने मंडळीच्या नाटकाला प्रत्येक ठिकाणी गर्दी जमत होती. मुंबई, बडोदे, इंदूर, औरंगाबाद, पुणे, जळगाव, नागपूर, अमरावती इ. अनेक ठिकाणी कंपनी सतत दोन वर्ष खेळ करीत राहिली. नारायणरावांच्या स्त्री भूमिकेची मोहिनी प्रेक्षकांच्या मनावर चांगलीच पडलेली होती. स्वतःच्या नावाची आणि मालकीची नाटक मंडळी त्यांनी स्थापन केल्याने तर ह्या मोहिनीची पकड अधिकच टिकवून ठेवण्यासाठी ते खर्चिक बनले. आपल्या कल्पनेप्रमाणे भूमिकेला योग्य असे उंची वस्त्रे, अत्तरे ते घेऊ लागले. हजारोवारी खर्च होऊ लागला. नाटकाचे भव्य देखावे उभारण्यासाठीही त्यांनी असे हजारो रुपये खर्च करण्याचा सपाटा लावला. नाटककाराच्या कविकल्पना असे ते व्यवहारात उतरवू लागल्याने खर्च अतोनात वाढला. व्यवहारी गोविंदराव टेंबे यांना हा अवाच्या सवा खर्च पटण्यासारखा नव्हता. त्यांनीं अनेक वेळा गंधर्वांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचे म्हणणे नारायणरावांना पटले नाही. आणि अखेरीस गोविंदराव टेंबे यांनी आपल्या भागीदारीचा मे १९१५ ला राजीनामा दिला. आता गंधर्व नाटक मंडळीचे नारायणराव आणि बोडस हेच

मालक राहिले. मात्र त्यांच्या या वेषभूषेचा आणि केशभूषेचा उच्च-वर्गीय श्रीमंत समाजावर एवढा प्रभाव पडला की, त्या स्त्रियात गंधर्व नेसतील त्या पोतीचे, त्या रंगाचे आणि त्या पेठेचे शालू, पैठण्या, जरीची पातळे वापरण्याची एक चालच रुढ झाली. त्यांच्या भ,गासारखा भांग आणि केशभूषेसारखी केशभूषा करण्याची फॅशन रूढ झाली.

रात्री नाटकात रंगणारे गंधर्व दिवसाही त्याच तंद्रीत वागत असत. ते दिवसातून दोन वेळा थंड पाण्याने स्नान करीत. बर्फाने थंड केलेले पाणी पिण्याचा जणू त्यांना एक छंद लागला होता. त्यासाठी कंपनीचा मुक्काम कुठेही असला तरी मुंबईहून रोज तिथें बर्फ पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली होती. १९०६ सालापासून राम गणेश गडकरी यांचा किर्लोस्कर नाटक मंडळींशी संबंध आल्याने गंधर्वांशी त्यांचा परिचय झाला होता. गंधर्वांनी स्वतंत्र कंपनी काढल्यावर आपल्या कंपनीला त्यांचे नाटक मिळावे म्हणून बोडसांनी आणि त्यांनी प्रयत्न सुरू केले. पण गडकरी किर्लोस्कर नाटक मंडळीचे अभिमानी होते. दोन वर्षापर्यंत त्यांनी या नव्या मंडळीला नाटक काही दिले नाही. अखेरीस ‘ पुण्य-प्रभाव ’ नाटकाचे वाचन त्यांनी गंधर्व नाटक मंडळीत केले. पण अजून योग यायचा होता, असे दिसते. त्यामुळे काही कारणाने पुन्हा गडकरी आपले नाटक घेऊन किर्लोस्कर मंडळीकडे गेले. या काळात गंधर्व नाटक मंडळीचा हातखंडा खेळ संशय-कल्लोळ हा होता. ‘ संशय कल्लोळाचे ’ मुंबईला एकामागून एक हाऊस फुल प्रयोग होत होते. गंधर्वाची रेवतीची भूमिका आणि बोडसांची फाल्गुनरावांची भूमिका अत्यंत लोकप्रिय झाली होती. वास्तविक १९०६ ते १९१६ या काळात त्यांनी ज्या अनेक नाटकात भूमिका केल्या, त्यात फक्त दोनच भूमिका सामाजिक स्वरूपाच्या होत्या. एक शारदेची आणि दुसरी सरस्वतीची. रेवतीच्या या भूमिकेने त्यांची तिसरी सामाजिक निराळ्या धाटणीची

भूमिका रसिकांपुढे आली. शारदेतील भूमिका शोकरसात्मक होती. सरस्वतीची भूमिका विशिष्ट रसाला प्राधान्य देणारी नव्हती. तर रेवतीच्या भूमिकेला शृंगार आणि हास्याचे कोंदण लाभले. त्यामुळे 'संशय-कल्लोळ' महाराष्ट्रभर गाजत राहिले.

खाडिलकरांनी गंधर्वांचा अभिनय पाहिला, त्यांची गायकी ऐकली, त्यांच्यातील भूमिका-चातुर्य लक्षात घेऊन त्यांच्यासाठी खास 'संगीत स्वयंवर' हे नवीन नाटक १९१६ च्या सुमारास लिहिले. त्यात रुक्मिणीच्या भूमिकेला त्यांनी केवळ गंधर्वासाठी जास्त वाव ठेवला. कृष्णाची भूमिका बोडसांना देण्यात आली. मनाप्रमाणे भूमिका मिळाल्याने जणू या शापित रुक्मिणीने रंगभूमीवर प्रकट होऊन आपल्या स्वयंवराचा डाव मांडला असावा. गाणे आणि अभिनय यांची उंची या काळात खूपच वाढल्याने हेही नाटक 'संशय-कल्लोळा' प्रमाणे मुंबईकरांच्या गळ्यातील ताईत बनले. गंधर्व म्हणजे नाटक असे समीकरण याच काळात रूढ होऊ लागले. मुंबईच्या श्रीमंत गुजराथ्यांना तर त्यांचे जणु वेडच लागले. १९१६ म्हणजे त्यांच्या 'गंधर्व नाटक मंडळी'चा ध्वज वैभवाने मिरविणारा काळ होय. इतकी वर्षे गंधर्वांना निरनिराळ्या भूमिकात पाहिल्याने; त्यांचें गाणे ऐकल्याने त्यांच्याविषयीच्या कौतुकाच्या भावना कळत न कळत भक्तीत परावर्तित होत गेल्या.

गडकरी हे सारे पहात होते. गडकऱ्यांची नाटकेही खाडिलकरांप्रमाणे याच काळात गाजत होती. ते दिसले की, बोडस आणि गंधर्व पुन्हा नव्या नाटकाची मागणी करीत. गंधर्वांचे वैभव, त्यांचा थाटमाट राजघराण्याला शोभतील असे त्यांचे कपडे आणि दागदागिने हे सारे गडकरी इतरांप्रमाणे पहात होते. नाट्यरस तेही कदाचित लुटीत असतील. एकदा अशीच गंधर्व-बोडसांनी त्यांच्याकडे नाटकाची मागणी करताच

फटकळ तोंडाचे गडकरी म्हणाले, "नारायणराव माझ्या नाटकात तुम्हाला फाटकं लुगडं नेसून दळावं लागेल, आहे कबूल?"

खरा कलावंत वेळ आली तर कसा वागतो याचे नारायणराव म्हणजे मूर्तिमंत प्रतीक होय. या हाडाच्या कलावंताला, हजारो रुपये रोज गल्ला मिळविणाऱ्या मालकाला त्यांच्या या बोलण्याबद्दल राग आला नाही. गडकऱ्यांची लेखणी ते चांगली ओळखीत होते. त्यांचे एक तरी चांगले नाटक आपल्याला मिळावे हा त्यांचा ध्यास होता म्हणून ते लगेच म्हणाले, "फाटकं लुगडेच काय पण गोणपाट नेसूनसुद्धा काम करायला मी तयार आहे. पण तुमचं नाटक आम्हाला पाहिजे!"

रंग जाने रंगारी! कलावंतच कलावंताला ओळखू शकतो! दिलदार दिलाच्या, कडक स्वभावाच्या गडकऱ्यांनी गंधर्वांसाठी नवे नाटक लिहायला घेतले ते 'एकच प्याला'.

असे गडकऱ्यांना नवे नाटक लिहायला लावून कंपनी पुण्याहून निरनिराळ्या ठिकाणी मुक्काम करीत ग्वाल्हेरला गेली. तेथे 'सहचारिणी' हे कोल्हटकरांचे नवे नाटक गंधर्वमंडळीने घेतले, बसवले आणि ते साफ पडले. केवळ लेखकांच्या नावावर नाटक चालत नाही हेच जणू या नाटकाने सिद्ध केले असावे. म्हणून स्वयंवर, संशयकल्लोळ इत्यादी आपली जुनीच नाटके करीत कंपनी १९१८ च्या सुमारास पुण्याला आली.

'एकच प्याला' भरून तयार होता. तालमी सुरू झाल्या. सिंधूची भूमिका गंधर्वांना आणि सुधाकरची भूमिका बोडसांना देण्यांत आली. मध्यंतरीच्या काळात कंपनी मुंबईहून बडोद्याला गेली होती. १९१९ च्या फेब्रुवारीत बडोद्याला 'एकच प्याला' चा पहिला प्रयोग होण्याचे जाहीर झाले. गडकऱ्यांनी हजर राहावे म्हणून त्यांना कळविण्यात आले. पण दैवदुर्विलास कसा असतो ते पाहा, गडकरी नेमके या काळात आजारी होते. आजारातून ते बरे होतील आणि आपले अमर नाटक

आपल्या डोळयांनी रंगभूमीवर पहातील असे अनेकांना वाटत होते. पण परमेश्वराच्या नाटकाचे सूत्र कधी कुणाला कळले आहे का ? इतके चांगले नाटक लिहिणाऱ्या गडकऱ्यांना जणू स्वर्गातील एखादे नंदनवन प्राइज देण्यासाठी तर देवाने तेथे बोलावले नसावे ना ? जानेवारी १९१९ ला गडकरी या प्रिय महाराष्ट्राचा कायमचा निरोप घेऊन गेले ! म्हणजे केवळ एक महिना अगोदर ते या जगातून गेले आणि त्यांचा ' एकच प्याला बडोदेकर रसिकांना प्राशन करायला मिळाला. मोठमोठे धनिक त्या प्रयोगाला हजर होते. प्रत्यक्ष गायकवाड महाराज या प्रयोगाला हजर होते. त्यांनी खूष होऊन ठरल्यापेक्षा दोन हजार रुपये जास्त बिदागी दिलदारपणे कंपनीला दिली.

हे नवे नाटक करून बडोदे जिंकून कंपनी मुंबईला आली. नाटक म्हणजे मनोरंजन ! केवळ करमणुकीसाठी नाटक असते अशी सर्वसाधारण मुंबईच्या प्रेक्षकांची आजवरची समजूत होती. आजपर्यंतची किर्लोस्कर नाटक मंडळीची काय, गंधर्व नाटक मंडळीची नाटके काय, अगर अन्य कोणत्याही नाटक मंडळीची नाटके काय ही साधारणपणे करमणूकप्रधान अशी होती. पण एकच प्याला हे नाटक मुंबईला लागले, प्रेक्षकांनीं पाहिले आणि साऱ्या प्रेक्षकात एक वैचारिक खळबळ निर्माण झाली. वैभवाचा झगमगाट, श्रृंगारिक गायकी, ऐश्वर्याचा विलास हे गंधर्वांच्या नाटकात आढळून येणारे कोणतेच आकर्षण या नाटकात नव्हते, तर दारिद्र्याचे दर्शन, पतिव्रतेची परिक्षा, कारुण्यशोक आणि भक्ती या रसांचा परिपोष एका नवीनच विषयाला घेऊन मराठी रंगभूमीवर प्रथमच प्रेक्ष-कांच्या नजरेला अंजन घालता झाला. सिंधूची ही अगदी वेगळी भूमिका गंधर्वांनी आपल्या कलेचे कसब पणाला लावून उभी केल्याने नाटक सामान्य-जनतामान्य झाले. वस्त्र अलंकारादी बाह्य शृंगारिक उपचारांचा सिंधूला स्पर्शही झाला नाही. पण तिच्या मानसिक सौन्दर्यामुळे ती

प्रेक्षकप्रिय झाली. अभिनयाची अत्यंत कठीण कसोटी या नाटकात गंधर्वांना द्यावी लागली. गंधर्व कसोटीस उतरले आणि समाजाचा आणखी एक थर त्यांचा चाहता बनला.

असे अमर नाटक मराठी रंगभूमीला देऊन ते न पाहताच गडकरी या जगातून निघून गेले. आणि या घटनेनंतर अवघ्या अकरा महिन्यात म्हणजे डिसेंबर १९१९ ला मतभेद झाल्याने बोडसही ३७ हजार रुपये घेऊन कंपनीची मालकी सोडून बाहेर पडले आणि एकटे गंधर्व कंपनीचे मालक झाले. जणू दुर्दैव सिंधूच्या पावलाने कंपनीत शिरले असावे. कोणी विचारणारा राहिला नाही. दर प्रयोगाला हजारो रुपये मिळताना दिसत राहिल्याने गंधर्वांनी आपल्या मनाप्रमाणे खर्च करण्याचा सपाटा सुरू केला. नाटकातील निरनिराळ्या देखाव्यासाठी हजारो रुपये खर्च करून बाबूराव पेंटरांकडून देखावे तयार करून घेण्याचा सपाटा सुरू झाला. सर्व पात्रांसाठी भरजरी पोषाख शिवले गेले. कौरव पांडवादिकांसाठी सोन्याचे पाणी दिलेले चांदीचे मुकूट तयार केले गेले. संगीताची मोहकता प्रयोगात वाढविण्यासाठी पेटी ऐवजी ऑर्गन आणि दोन सारंग्या घेण्यात आल्या. एकट्या 'द्रौपदी' नाटकासाठी गंधर्वांनी ७२ हजार रुपये खर्च केले. आणि कळत नकळत सावकार कंपनीत शिरला. इतका आतोनात पैसा खर्च करूनही 'द्रौपदी' नाटकाचे सुरवातीचे प्रयोग फारसे आर्थिक फायद्याचे झाले नाहीत. मानापमान, विद्याहरण, स्वयंवर पाहिलेल्या प्रेक्षकांना 'द्रौपदी' जिंकू शकली नाही.

नारायणरावांची कुटुंबीय मंडळी पुण्याला वास्तव्य करून होती. सात-आठ माणसांच्या या कुटुंबाचा खर्च त्यांनाच करावा लागे. १९१८ साली त्यांचे वडील वारले. पहिली कन्या हिरा ही मानापमान नाटकाच्या पहिल्याच प्रयोगाच्या वेळी वारली होती. नंतर कृष्णा आणि नागनाथ ही दोन मुलेही बालपणीच वारली. गंधर्व पान खात, तंबाखू खात, चहा

पीत, वेळप्रसंगी बैठकीत मदिरापानही करीत. पण ते अत्यंत हट्टी आणि निग्रही होते. वडील वारल्यानंतर १९१८ साली त्यांनी त्यांच्या स्मृतीसाठी जो विडा सोडला तो कायमचा. १९२० साली लोकमान्य वारले. आणि त्यांच्यासाठी त्यांनी चहा सोडला तो कायमचा!

सिंधू गंधर्व मंडळीत एकच प्याला घेऊन आली. तिने प्रथम नाटकाच्या तालमीच्या वेळी जणू १९१८ साली श्रीपादरावांचा बळी घेतला. पहिला प्रयोग लागण्यापूर्वी केवळ एक महिना अगोदर या मानस कन्येने प्रत्यक्ष पित्याचा म्हणजे गडकऱ्यांचा जानेवारी १९१९ ला दुसरा बळी घेतला. आणि तिसरा बळी डिसेंबर १९१९ ला सुधाकराचा म्हणजे गणपतराव बोडसांचा कंपनी सोडून जाण्याचा. आणि पाठोपाठ अनेक सावकार कंपनीत शिरले. कंपनीला कित्येक हजारांचे कर्ज झाले. रंगभूमीवरील सिंधूचे दुर्दैव जरी गंधर्वांची लोकप्रियता वाढवित राहिले तरी त्याचवेळी कंपनीला तिच्या अस्तित्वाने ग्रहण लागले.

मुंबईचे प्रयोग संपवून कंपनी सामान घेऊन बोरीबंदर स्टेशनवर निघाली होती. आणि एकएकी सावकाराच्या पठाणांनी कंपनीचे सामान पैशासाठी अडविले. कंपनीत खळबळ उडाली. अनेकांना आश्चर्य वाटले. काहींना वाईट वाटले. गंधर्व मंडळीचे सल्लागार मुंबईचे पी. एस. लाड हे ताबडतोब धावत आले. त्यांनी कंपनीचा जमाखर्च तपासला. तेव्हा कंपनीला १ लक्ष ८० हजार कर्ज असल्याचे साऱ्यांच्या लक्षात आले. बहुतेक कर्ज जबर व्याज देण्याच्या कराराने घेतलेल्या पैशांचे होते. लाडांनी नाना युक्त्या-प्रयुक्त्या योजून तात्पुरते सावकारांना थोपवून धरले. त्यावेळी गंधर्वांचे वय अवघे ३२ वर्षांचे होते. हे अफाट कर्ज गंधर्वांच्या कोणत्याही खाजगी गोष्टीसाठी झाले नव्हते तर एका दिलदार कलावंताने कलेचा दिमाख रंगभूमीच्या दरबारात मिरविण्यासाठी झाले होते. हे त्यांच्या अनेक चाहत्यांना माहीत असल्याने मुंबईतील काही

पुढारी आणि श्रीमंत मंडळी त्यांच्या मदतीसाठी पुढे आली. त्यात शेठ वालचंद हिराचंद, बॅ. जमानादास मेहता, डॉ. भडकमकर, श्री. विठ्ठल सायन्ना इत्यादींनी घेतलेल्या पहिल्याच बैठकीत एक लाख रुपये फंड उभा राहिला. आठ दिवसात उरलेली सारी रक्कम सहज उभी राहील असा अंदाज घेऊन ही आनंदाची बातमी नारायणरावांना सांगण्यासाठी हे सर्वजण मंडळीच्या बिऱ्हाडी आले. चिंतातूर नारायणरावांना जनतेचे आपल्यावरील हे खरे प्रेम दिसताच ते गहिवरले. पण या स्वाभिमानी कलावंताचा स्वतःवर भरवसा होता. जे एका दिवसात इतके पैसे मदत म्हणून देतात ते माझे प्रेक्षक एवढी रक्कम मला नाटके पाहून सहज देतील. म्हणून ते गहिवरून उद्‌गारले, “ देवा, माझ्यासाठी फंड जमवू नका. माझ्या चुकीमुळे झालेले कर्ज माझे मला फेडले पाहिजे. ते फिटे-पर्यंत आपणा सर्वांचा आशीर्वाद आणि प्रभुची कृपा कायम असावी इतकीच माझी प्रार्थना ” त्यांचे हे दिलदार उद्‌गार ऐकून आलेले सर्व थक्क झाले. याच सॉलिसिटर लाडांची मुलगी पहिल्या मराठी बोलपटाची नायिका दुर्गा खोटे होय. लाडांनी दादा काटदरे नावांचे मराठी हिशोब-दक्ष गृहस्थ कंपनीचे व्यवस्थापक नेमले.

लोकमान्य टिळक वारल्याने गांधीजींनी टिळक स्वराज्य फंड काढला होता. लोकमान्यांबद्दल साऱ्या भारताला आदर आणि प्रेम असले तरी गंधर्वांना त्यांच्याबद्दल विशेष आदर होता. लोकमान्यांच्याच शब्दाने, कौतुकाने, प्रोत्साहनाने छोटा नारायण एवढ्या लौकिकाला चढला होता. तेव्हा त्यांच्या निधीसाठी केशवराव भोसले यांच्यासह एक संयुक्त ‘ मानापमानाचा ’ प्रयोग मुंबईला करण्यात आला. दोन श्रेष्ठ नट असे एकत्र आल्याने पहिल्या प्रयोगाची तिकिटे केवळ अर्ध्या तासात संपली ! गंधर्व भामिनी झाले, भोसले धैर्यधर झाले. आणि हा प्रयोग मुंबईच्या बालिवाला थिएटरात खूपच यशस्वी झाला. म्हणून दुसरा प्रयोग

करण्यात आला. तोही हाऊस फुल झाला. त्यावेळी केशवराव भोसले गंधर्वांना म्हणाले, "नारायणराव, कर्जाची काळजी कशाला करता? असे संयुक्त नाट्यप्रयोग करून तुमचे कर्ज फेडून टाकू!" नारायणराव गहिवरले. दुर्दैव जरी त्यांच्या मागे हात धुवून लागले होते तरी उभा महाराष्ट्र त्यांच्या पाठीशी असा उभा असल्याने नारायणराव आल्या दिवसाला तोंड देत राहिले. पण दैवाने तीनच महिन्यात भोसल्यांना स्वर्गाच्या रंगभूमीवर काम करण्यास नेले. महाराष्ट्र हळहळला. असे आघात त्यांच्यावर होत होते. टेंबे, बोडस, पंडित, गडकरी, बल्ले या आणि अशा अनेकांचे आधार त्यांना या काळात एकामागून एक दुरावत गेला. चिंतेने ते ग्रासले गेले. त्यामुळे त्यांची प्रकृती सुमारे दोन वर्षे बिघडली. हा १९२२–२३ चा काळ होता. खाडिलकर आणि लाड यांचा राग, काटदऱ्यांचा व्यवस्थित कारभार, त्यांची कलेवरील निष्ठा, कर्ज फेडण्याची खरी तळमळ आणि असंख्य रसिकांचा त्यांना लाभणारा सतत आश्रय म्हणून ते या मानसिक व शारीरिक अस्वस्थेच्या काळाला जिंकू शकले.

स्वयंवर, मानापमान, विद्याहरण, सौभद्र, एकच प्याला ही नाटके सतत भरपूर उत्पन्न या काळात त्यांना देत होती. पण प्रथम पडलेले खाडिलकरांचे 'द्रौपदी' हे नाटकसुद्धा त्यांच्या कलागुणांमुळे उत्पन्नाच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे ठरले. दुसरा नंबर 'एकच प्याला'ने पटकावला होता आणि स्वयंवरचा पहिला क्रमांक अनेक वर्षे कायम टिकला होता. स्त्री भूमिकेला शोभेल अशी आपल्या गायनाची आणि अभिनयाची पद्धत त्यांनी अंगिकारल्याने त्यांच्या स्त्री भूमिका जितक्या यशस्वी झाल्या तितक्या पुढील काळात त्यांच्या पुरुष भूमिका यशस्वी झाल्या नाहीत.

१९२३ आशा-निराशा आणि १९२५ नंदकुमार ही दोन नवी नाटके त्यांनी रंगभूमीवर आणली. आर्थिक दृष्टीने ती फायद्याची ठरली

तरी त्यांच्या भूमिकेला फारसा वाव नसल्याने त्यांच्या या नाटकाच्या भूमिका तितक्याशा गाजल्या नाही. नंतर खाडिलकरांचे मेनका हे नवे नाटक त्यांनी रंगभूमीवर आणले. मेनकेतील त्यांची स्त्री-भूमिका ही शेवटची प्रभावी भूमिका होय.

सौंदर्यदृष्टीचा त्यांना अत्यंत हव्यास होता. रंगभूमीवरचे कलासौंदर्य कसोशीने कलाप्रिय रसिकांना दाखविण्यासाठी त्यांनी अतोनात पैसा खर्च केला. रंगभूमीवरील रोषणाईपायी तर त्यांच्या कर्जात सतत भरच पडत राहिली.

१९२१ ते २७ च्या काळात त्यांची कंपनी महाराष्ट्रातल्या जवळ जवळ सर्व मोठ्या शहरी फिरून आली होती. मुंबई, पुणे, बडोदे, बेळगाव, हुबळी, सोलापूर इत्यादी नेहमीची शहरेही त्यात होती. जवळजवळ दहा वर्षांनंतर कंपनी वऱ्हाडकडे गेली. जत्रेसारखी गर्दी कंपनीच्या तिकिटासाठी होऊ लागली. काही रसिकांनी तर तारेच्या मनिऑर्डरने तिकिटाचे पैसे पाठवायला सुरुवात केली. असे दोन दोन अडीच अडीच हजार रुपये प्रत्येक खेळास केवळ तारेने येऊ लागले. त्यामुळे प्रत्यक्ष तिकीट देणाऱ्यांची कुचंबणा होऊ लागली. कंपनीचा मुक्काम वऱ्हाडात खूपच वाढला. आणि तिला भरपूर पैसा मिळाला. म्हणून १९२७ अखेर सर्व कर्जफेड त्यांना करता आली. आणि कंपनी गंधर्वांच्या पुन्हा ताब्यात आली. या सात वर्षांत त्यांनी एकंदर जवळजवळ व्याजासह तीन लाख नऊ हजार रुपये सावकारांना दिले. शिवाय कंपनीचा खर्च आणि पगार भागवावा लागतच होता.

कर्जमुक्त झाल्याचे समाधान १९२८ साली त्यांना लाभले. पण नारायणराव थोडे जरी सुखात असले तरी दुःख त्यांच्यापुढे हजर राहात गेले आहे. याच काळात त्यांची एक मुलगी आणि दोन मुलगे अल्पशा आजाराने मृत्युमुखी पडले. हा आघात त्यांच्यावर फारच झाला. ते

अधिक हळवे झाले. त्यांना तिन्हीही मुलीच आता मुलांच्या ठिकाणी होत्या. कमला, सरोजा आणि पद्मा या त्यांच्या तीन कन्यका होत. कमलेवर त्यांचे निरतिशय प्रेम होते. पण कान कोरण्याचे निमित्त होऊन हजारो रुपये खर्चूनसुद्धा ती अखेरीस मरण पावली. हा आघात त्यांना जबर बसला. वऱ्हाडासारख्या उष्ण हवेचा प्रदेश; तिथे थंड पाण्याने दिवसातून नेहमीप्रमाणे दोनदा स्नान करणे आणि बर्फाने गार केलेले पाणी सतत पिणे हा त्यांचा सतत बाराही महिने चालणारा क्रम भरउन्हाळ्यातही चालू राहिल्याने त्यांचा आवाज बसला. अशा वेळीच कमलेचा मृत्यू झाला. तरीही मृच्छकटिक नाटकात त्या रात्री त्यांनी काम केले.

कमलेच्या मृत्युने ते विशेष दुःखी झाले. कुणाचेही वाईट न करतां आपले कौटुंबिक जीवनात मात्र सतत वाईट घडत चालल्याने त्यांच्या मनात विरक्तीची भावना यातूनच निर्माण झाली असावी !

सुखदुःख निर्माण करणाऱ्या परमेश्वराला लगेच त्यांची दया आली. तिरखवा आपण होऊन साथीला त्यांच्या कंपनीत आला. त्यामुळे ते उत्साहित झाले. ऑर्गनवर केशवराव कांबळे, सारंगीवर कादरबक्ष आणि तबल्यावर तिरखवा हा अपूर्व संगीतयोग जुळून आल्याने गंधर्वांचा सुरेल आवाज आणि या कसलेल्या साथीदारांच्या वाद्यांचा स्वर इतके एकजीव होऊन प्रेक्षकांपुढे साकार होत, की स्वर कोणता आणि साथ कोणती यांचा क्षणभर जाणकारालासुद्धा संभ्रम पडे !

सरोजिनीचे लग्न १९३० ला पुण्यात त्यांनी एखाद्या संस्थानिकासारखे केले. त्यांच्या घरातील हे पहिलेच कार्य होते. बॅ. गोविंद वावळे यांच्याशी तिचा विवाह झाला. हा सोहळा कित्येक दिवस पुण्यात साजरा होत राहिला होता. सतत सात दिवस पंचपक्वान्नाच्या पंगतीवर पंगती उठत होत्या. वरातीपुढे हजारो रुपयांचे दारूकाम करण्यात आले होते. गेल्या पंचवीस वर्षांत असे कार्य पुणेकरांनी पाहिले नव्हते. अर्थात् पुन्हा

या गोष्टीसाठी त्या काळचे तीस-चाळीस हजार रुपये खर्च झाले. पुन्हा सावकाराकडे त्यांचे पाय नकळत वळले.

रंगभूमीवर जरी अमाप पैसा मिळत होता, तरी स्वयंवर नाटकासाठी अफाट खर्च या काळात त्यांनी केला. केवळ स्वयंवर नाटकातील गालीचा आणि बैठकीसाठी खऱ्या जरीचे सुबक काम केलेले सणंग सोळाहजार रुपयाला घेण्यात आले. सुबक उंची कपड्यांच्या शौकाप्रमाणे उंची अत्तरांचा हव्यासही त्यांना भारी होता. हजार रुपयाचे अत्तर ते कधी कधी बैठकीला खरेदी करीत. प्रत्येक नाटकातील देखाव्यासाठी असाच अफाट खर्च, त्यामुळे कर्जात वाढ ! वाढते वय, आवाज मधून मधून बसू लागलेला म्हणून १९३० च्या दरम्यान त्यांचे प्रयोग मधून मधून बंद पडू लागले होते.

याच काळात पुण्यास नाट्य सम्मेलन भरले होते. त्याचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले होते.

मुंबईस एक नवे नाटक १९३१ च्या सुमारास त्यांनी रंगभूमीवर आणले. ते म्हणजे संगीत कान्होपात्रा. भक्तिरसाला महत्त्व देणारे हे गंधर्व मंडळीचे पहिलेच नाटक. विषयाचे नाविन्य, भक्तिरस परिपोष करणाऱ्या नाविन्यपूर्ण चाली, देहभान विसरून कान्होपात्रेची त्यांनी केलेली संगीत भूमिका आणि तिच्या तोंडी असलेले सर्वच अभंग इतक्या तन्मयतेने ते म्हणत की, जणु पंढरीला निघालेली वारकऱ्यांची दिंडीच वाटावी ! 'अवघाचि संसार' 'पतित तू पावना' 'अगा पंढरीच्या राया' 'दीन पतित अन्यायी' हे अभंग तर अत्यंत जनताप्रिय झाले.

गोव्यात गंधर्व नाटक मंडळी १९३२ च्या सुमाराला प्रथमच गेली. त्यामुळे पणजीत होणाऱ्या त्यांच्या प्रयोगाला खूपच गर्दी उसळली पण त्यांचे वाढते वय आणि आवाज यांच्या जोडीला पुन्हा कर्जाची पकड त्यामुळे त्यांच्या भूमिका मनावरील ताणामुळे रंगेनाशा झाल्या. भविष्य

त्यांना भेडसावू लागले. अभंग ऐकायला लोक भक्तिभावाने येतात म्हणून ते कान्होपात्रातले अभंग गळ्यावर अत्याचार करून खड्या सुरात म्हणत त्यामुळे कोमल रागदारीने कमाविलेला त्यांचा आवाज दिवसेंदिवस बिघडत गेला. याच काळात मराठी रंगभूमीवर स्त्रीभूमिका करण्यासाठी जोत्स्ना भोळे, हिराबाई बडोदेकर इत्यादी तरुण महिला पुढे आल्याने नाट्याभिनयापेक्षा त्यांचे कौतुक करण्यासाठी, त्यांना पहाण्यासाठी, गर्दी तिकडे वळाली. याच काळात बोलपटांचा जन्म होऊन मूकपट बोलू लागले. प्रभातच्या अयोध्येचा राजा, माया मछिन्द्र या बोलपटांकडे प्रेक्षक खेचले गेले. म्हणून गंधर्व नाटक मंडळाचे उत्पन्न कमी कमी होत गेले. तिच्या कर्जात भर पडत होती. अशाही स्थितीत त्यांची काही पदे नाटकात रंगत. त्यांच्यावरील भक्तीने अजूनही काही प्रेक्षक त्यांच्या नाटकांना येत असत. याच काळात खर्चाची ओढाताण होऊ लागल्याने बोडस, वालावलकर, भांडारकर हे जास्त पगारी नट त्यांनी खर्च कमी करण्यासाठी कंपनीतून कमी केले. त्यामुळे तोटयात फायदा होण्याऐवजी तो अधिकच वाढला.

जुनी नाटके तोटयात येतात म्हणून वसंतराव देसायांचे नवे नाटक 'अमृतसिद्धी' हे कंपनीने रंगभूमीवर आणले. पण पडत्या काळात सारे पडते तसे हेही नाटक पडले. कर्जाचा आकडा पुन्हा दुसऱ्यांदा ७० हजारापर्यंत वाढत गेला.

रंगभूमी हा त्यांच्या जीवनाचा ध्यास असल्याने रंगभूमीचा हा राजहंस अशाही परिस्थितीत मान वर करून कलेच्या सरोवरात महाराष्ट्रात सर्वत्र विहरत होता. असा सोलापूरला मुक्काम असताना व्ही. शांताराम यांनी त्यांची सिंधूची भूमिका प्रथमच रंगभूमीवर पाहिली. त्यांच्या मनावर त्या भूमिकेने ठसा उमटविला. ते गंधर्वांना भेटले. जर चित्रपटात

तुम्ही आला तर तीन वर्षात सहा चित्रपटासाठी ६ लाख रुपये तुम्हाला मिळतील.

पैशाचे प्रलोभन कोणाला पडत नाही. अडचणीत सापडलेल्या माणसाला तर ते विशेष आपल्याकडे खेचते. सध्याचे वाईट दिवस संपावयाला ही संधी बरी हे लक्षात घेऊन त्यांनी अत्यंत नाइलाजाने डिसेंबर १९३४ ला आपली प्राणप्रिय गंधर्व नाटक मंडळी बंद करण्याचा निर्णय घेतला. कंपनीतल्या सर्व माणसांना निरोप द्यायचा त्यांच्या जिवावर आले. ते गहिवरलेल्या स्वरात एवढेच बोलले, "कर्ज फेडण्यासाठी नाइलाजाने मला कंपनी बंद करावी लागत आहे. आणि सिनेमात जावे लागत आहे."

त्यांचा हा बालगंधर्व–प्रभात करार म्हणजे त्यांच्या उतार वयातील कलागुणांच्या मूल्याचे प्रतीक होय. प्रभातने त्यांच्याशी प्रथम एक वर्षाचा करार केला. पुण्यातल्या प्रभात स्टुडिओत नवीन कामावर गंधर्व रुजू झाले. पण तेथील सारे वातावरण त्यांना तापदायक वाटू लागले. निर्जीव कॅमेऱ्यासमोर सतत उभे रहावयाचे. हजारो कँडल पॉवरच्या प्रकाशांत मेकअप करून तुटक तुटक प्रवेश, टेकरिटेक करीत काम करायचे आणि सोईसाठी ३।४ मिनिटात गाणे आटपायचे. या साऱ्याने ते वैतागून गेले. महिन्या दीड महिन्यातच त्यांना कंटाळा आला. वास्तविक धर्मात्मा बोलपटात भूमिका करण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले होते. तेथेही कलेशी प्रतारणा त्यांनी केली नव्हती. भूमिकेला विसंगत अशी आपली स्थूलता घालविण्यासाठी ते रोज हनुमान टेकडीवर नाहीतर पर्वतीवर पळत जायचे. खाण्यापिण्यात पथ्य पाळायचे पण सारे करूनही पुन्हा स्टुडिओत गेले आणि तेथील ते निर्जिव यांत्रिक वातावरण पाहिले की त्यांचा नाट्यकलात्मा तडफडू लागले. कसाबसा एक चित्रपट त्यांनी पुरा

केला. अखेरीस ते वैतागून उद्गारले, "देवा, या धंद्यात आमच्या नाटक धंद्यासारखा आनंद नाही."

याच काळात गंधर्व नाटक मंडळीच्या इतर लोकांनी एकत्र जमून १९३५ एप्रिलला गंधर्वाशिवाय गंधर्व नाटक मंडळी पुन्हा पुण्याला स्थापन केली. हे पाहताच सहा लाखाच्या मोहावर या नाट्यप्रेमी नटाने पाणी सोडले. पैसा हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव नव्हता. कलेची सेवा आणि तिच्यासाठी सर्वस्वाचे दान हाच त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होता म्हणून धर्मात्मा चित्रपट कसाबसा पूर्ण झाल्यावर प्रभातच्या मालकांच्या मागे लागून अखेरीस ते एप्रिल १९३६ ला प्रभातच्या करारातून मुक्त झाले. आणि पिंजऱ्यातून मुक्त झालेल्या पक्षाप्रमाणे जणू त्यांनी पुन्हा नाट्यकलेचे पंख फडफडवून आपल्या मंडळीत झेप घेतली. गंधर्व, 'गंधर्व मंडळीत' पुन्हा आले. म्हणून साऱ्यांना आनंद झाला. पुन्हा नाटकाला गर्दी जमू लागली होती. पुन्हा ते कला-आनंदाचा उपभोग घेऊ लागले होते.

पण नाटकाचा धंदा हा सदैव एखाद्या शापित अप्सरेसारखा राहिला आहे. रंगभूमीवर आपल्या तारुण्याच्या आणि चलतीच्या ऐन काळात लोकांना आपल्या रूपाने गायनाने आणि परिणामकारक अभिनयाने वेड लावून त्यांनी लाखो रुपये मिळविले आणि अमर्याद लोकप्रियता प्राप्त केली. त्याकाळी पैशाची पर्वा न करता नाटक हे रसिकांच्या हृदयावर विराजमान झाले पाहिजे अशा वेडाने भारावून या कला व्यसनी साधकाने सौंदर्य लहरी, संगीत लहरी आणि सुगंधी लहरी या त्रिविध लहरींचा जणू त्रिवेणी संगम घडवून आणला होता. सजावटीच्या, वेशभूषेच्या आणि साथीदारांच्यासाठी हजारो, लाखो रुपये या कला व्यसनी माणसाने उधळले. पण असे होऊनही त्यांच्या उत्तर आयुष्यात त्यांच्यावर नको नको ते प्रसंग कोसळले. त्याला कारण हे व्यवहारी,

हिशेबी जग होय आणि त्यांचा बिन हिशेबीपणा, खर्चाचा अतिरेकीपणा आणि दुर्दैवाचे तडाखे !

या माणसाने गंधर्व नाटकमंडळी म्हणजे एक सतत फिरते संस्थानच निर्माण केले होते. जवळ जवळ १०० माणसे ऐन उमेदीच्या काळात या संस्थानात कामाला होती, त्या साऱ्यांचा त्या काळचा दरमहा पगारच २००० रुपये होता. चांगल्या कलावंतांच्याबद्दल या खऱ्या कलावंतांना कधीच तेढ किंवा असूया वाटली नाही. दिलदार स्वभावाचा हा खर्चीक कलावंत जेव्हा एकटाच मालक झाला तेव्हा त्याने चांगल्या चांगल्या कलावंतांना भरपूर पगार देऊन कलाकारांचा एक संचच मंडळीत जमविला. गणपतराव बोडस, मास्टर कृष्णराव, कादर बक्ष, तिरखावा, जगन्नाथ बुवा पंढरपूरकर, विनायकराव पटवर्धन, गंगाधरपंत लोंढे, केशवराव कांबळे, हरीभाऊ देशपांडे किती म्हणून विविध कलावंताची नावे मोजावीत ! आपआपल्या कला क्षेत्रांतील हे कलावंत गंधर्व संस्थानात आल्यामुळे त्यांच्या कलेचे तेज अधिकच वाढले. नाट्य-कलेच्या इतिहासात त्यांच्यासारखा मालक झाला नाही ! गंधर्व नाटक मंडळीत दरमहाचा एकूण खर्च त्या काळी जवळ जवळ १२००० रु. होता. कधी कधी तो याहीपेक्षा जास्त होत असे, दीड लाख सरासरी कंपनीचे वार्षिक उत्पन्न तिच्या वैभवाच्या काळांत होते. साधारण दरमहा तेरा नाटके कंपनी करीत असे. कोणत्याही एका नाटकावर कंपनी कधीच अवलंबून नव्हती पण साधारणपणे 'स्वयंवर' 'एकच प्याला' 'मानापमान' 'विद्याहरण' 'द्रौपदी' 'संशयकल्लोळ' 'सौभद्र' 'मृच्छकटिक' ही आठ नाटके कंपनीची हातखंडा होती. 'आशा निराशा' 'नंदकुमार' 'मेनका' 'विधिलिखित' 'सावित्री' इत्यादी नाटकेही अधून मधून केली जात.

गंधर्व नाट्यमंडळी अस्तित्वात आली तेव्हा किर्लोस्कर नाटकमंडळी

वैभवाच्या शिखरावर मिरवत होती. या नाटकमंडळीप्रमाणे त्या काळी 'ललितकलादर्शन नाटकमंडळी' 'बलवंत नाटक मंडळी' 'महाराष्ट्र' 'यशवंत', 'नूतन', इत्यादी अनेक नावें घेण्यासारख्या कंपन्या आपले प्रभावी प्रयोग करीत असत. गंधर्वांनी आपली चलती होती तेव्हा जवळ जवळ सव्वालाख रुपये प्रयोगाचे सर्व उत्पन्न विविध संस्थांना मदत म्हणून धर्मार्थ दिले. पण धर्मार्थ शब्दाचा त्यांच्या कोशातला अर्थ, हा आमच्या लोकांपेक्षा वेगळा होता. कंपनीचा एक दिवसाचा सर्व खर्च काढून घेऊन काय उरेल ते उत्पन्न देऊन टाकणे म्हणजे धर्मार्थ खेळ होय. हे असे व्यवहारी गणित त्यांना आयुष्यात कळले नाही, म्हणून तर त्यांचे शेवटचे दिवस अत्यंत कठीण असे गेले. धर्मार्थ दिलेल्या खेळाचे सर्वच्या सर्व उत्पन्न त्यातला एक पैसाही ठेऊन न घेता ते देऊन टाकीत असत.

त्यांनी गायकी आणि गायक यांना समाजमान्यता मिळवून दिली. विशेषतः ख्यालगायकी, ठुमरी आणि कवाली हे गायकीचे प्रकार त्यांनी लोकप्रिय केले. गाणे कोणत्याही रागातले असो, ते शास्त्राकडे लक्ष न देता स्वरांकडे लक्ष देत. त्यामुळे त्यांचे गाणे गळ्यातून आल्यासारखे वाटत नसे तर ते हलकेच कोमल खुलावटीने ओठाच्या हालचालीतून नकळत बाहेर पडत असे. म्हणूनच त्यांचे गाणे केवळ शास्त्रीय थाटाचे राहिले नाही तर ते भावनाप्रकटीकरणाचे माध्यम बनले. आचार्य अत्रे म्हणतात त्याप्रमाणे, त्यांची गाणी म्हणजे अमृताची कारंजी !

गोविंदराव टेंबे, भास्कररावबुवा बखले, मा. कृष्णराव इत्यादी संगीत महर्षींनी त्यांच्या सुरेल आवाजाला योग्य अशा संगीताचा आणि सजावटीचा साचा निर्माण करून दिल्याने ते कोणताही राग म्हणू लागले तरी त्याचे स्वरचित्र मूर्तिमंत ते रसिकांपुढे उभे करीत. भूप, भिमपलास, यमन, बिहाग, पिलु, जंगला, बागेश्री, मालकंस, देस, देसकारू, मांड, पहाडी, कलिंगडा, ललत, तिलककामोद, भैरवी, सिंध भैरवी या त्यांच्या

आवडत्या रागांच्या यादीवरून सुद्धा त्यांचे गानश्रेष्ठत्व कसे विविध रंगी होते ते जाणकारांच्या चांगलेच लक्षात येते. अशा श्रेष्ठ पदाला पोहोचण्यासाठी कोणत्याही विशिष्ट गुरूचा गंडा त्यांनी बांधला नव्हता. ते कुणाचे शिष्य नव्हते, आणि त्यांनी कोणी शिष्यही तयार केला नाही ! ही असली उठाठेव करायला या स्वयंभू गान महर्षीला वेळ तरी कुठे होता ! शास्त्रीय गाण्यांची आवड सामान्य रसिकांत रुजविण्याचे अवघड कार्य त्यांच्या संगीत नाटकांतील भूमिकांनी केले. शृंगार आणि करुण हे विरोधी रस सहजपणे वठविण्यात ते कुशल होते. म्हणूनच शृंगारिक, पौराणिक नाटकात कीर्ती संपादन केल्यावरही सिंधूची अवघड, करुणरसात्मक भूमिका ते समर्थपणे वठवू शकले. सिंधूची भूमिका म्हणजे त्यांच्या अभिनयसामर्थ्याचे गौरीशंकर होय ! असे असले तरी १९३७ च्या सुमारास त्यांची कंपनी त्यांच्या विविध अडचणींमुळे खूपच कर्जबाजारी झाली होती. वेळच्यावेळी सर्व काही संस्थानी थाटात प्राप्त करण्याची संवय झालेल्या कंपनीतल्या लोकांना धड जेवायला मिळेनासे झाले. अनेक महिन्यांचे पगार थकले. तेव्हा कुटुंबवत्सल असलेले कलावंत अखेरीस कंपनी सोडून मुंबई मुक्कामी निघून गेले. लोंढे, भांडारकर, वालावलकर, अभ्यंकर आणि देशपांडे हे प्रमुख कलावंत निघून गेल्यावर प्रयोगाला पहिल्यापेक्षाही गर्दी कमी होऊ लागली.

कंपनीत त्यांच्याशिवाय एकही चांगला कलावंत उरला नाही. त्यांच्यावर जीव टाकणारी गोहरबाई याचवेळी त्यांच्या हाकेला धावून आली. तिच्यामुळे कृष्णराव चोणकर हे गायक नट कंपनीला लाभले. गायक गोहरबाईचे कंपनीत येणे आणि तिच्याशी गंधर्वांनी संबंध ठेवणे हे घरातील लोकांना तसेच त्यांच्याविषयी जिव्हाळा असलेल्या मित्रांना आवडले नाही.

पण कुणाच्या आवडीनिवडीचा प्रश्न परमेश्वरी योजनेपुढे कधी चालत नाही हेच खरे ! तसे नसते तर हजारो प्रेमपत्रे वैभवाच्या काळात येणाऱ्या

या सज्जन माणसाचा असा तोल गेला असता का ? तिने काय मोहिनी- घातली होती कुणास ठाऊक ! रूपाने उजवी नसूनसुद्धा गंधर्व तिच्या जाळयात अडकले ते कायमचेच. तिच्यासाठी त्यांनी सर्वांचा संबंध तोडून टाकला. ती सांगेल त्याप्रमाणे गंधर्व नाटकमंडळीचे पान हलू लागले.

त्यामुळे झाले काय, गंधर्वाबरोबर मिरविण्याची तिची खूप दिवसांची सुप्त इच्छा तिने तृप्त करून घेण्याचा सपाटा सुरू केला. ती 'संशय-कल्लोळात रेवती, मृच्छकटिकात वसंतसेना, मानापमानात भामिनी बनून गंधर्वांचा साजशृंगार आणि त्यांची भूमिका घेऊन त्यांना अश्विनीशेठ, चारुदत्त, धैर्यधर बनवून खानदेश, वऱ्हाडात प्रयोग करीत राहिली. तिचा गळा जरी चांगला होता तरी रूप नसल्याने आणि प्रत्यक्ष गंधर्व रंग-भूमीवर हजर रहात असताना उत्पन्नाच्या दृष्टीने ही उठाठेव अयशस्वी ठरली. त्याचवेळी त्यांनी केलेल्या 'द्रौपदी' 'स्वयंवर' 'एकच प्याला' यातील त्यांच्या उतारवयातील स्त्रीभूमिकांना मात्र रसिकांनी दाद दिली. वयाच्या एकावनाव्या वर्षी हा असा अलौकिक पराक्रम जगाच्या नाट्य-अभिनय क्षेत्रात सापडणे विरळाच !

कंपनीच्या कर्जाच्या पोटी सावकारातर्फे कंपनी अखेरीस १९४३ ला डॉ. भडकमकरांनी मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी पूर्वी कंपनीत नोकर असलेले नेवरेकर आणि भांडारकर यांना पाठविले. हा आघात, हा अपमान त्यांना सहन झाला नाही. वाढत्या वयात, पडत्या काळात कर्ज-बाजारी होत असता, कलानंदात डुंबणाऱ्या या राजहंसाला अखेर आपली प्रिय गंधर्व नाटक मंडळी सोडावी लागली. गोहरबाईसह ते १९४८ साली गंधर्व नाटकमंडळीतून बाहेर पडले.

पण नाट्यरसिक जणू त्यांचीच वाट जरा निराळ्या कारणासाठी पहात असावेत. कारण एप्रिल महिन्यात भरलेल्या 'मुंबई मराठी साहित्य संघाच्या' मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवाचे बहुमानाचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले. पण हे अध्यक्षपद केवळ भाषण करण्यापुरतेच

त्यांनी स्वीकारले नव्हते, तर उत्सव समितीने महाप्रयासाने विनायकराव पटवर्धन, गंगाधरपंत लोंढे, मा. कृष्णराव, रानडे, भांडारकर, आदी पूर्वीच्या गंधर्व नाटक मंडळीतील नटांना एकत्र आणून 'स्वयंवर' 'एकच प्याला' 'सौभद्र' या नाटकांचे प्रयोग हजारो प्रेक्षकांसमोर करविले. जणू गंधर्व नाटक मंडळीची नव्या प्रेक्षकांना उत्सवसमितीने ही एक झलकच दाखविली!

ह्या यशस्वी उपक्रमानंतर असे अनेक प्रयोग पुणे, मुंबई, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी करण्यात आले.

वाढते वय, पडता काळ गोहरबाईशिवाय फारसा सहवास न मिळणारा हा काळ अखेरीस या मानी वैभव भोगलेल्या दिलदार कलावंताला जणू अंतर्मुख करता झाला. भरजरी कपडे, शालू, अत्तरे, दागिने यांचा जणू त्यांना वीट आला असावा. अगदी लज्जारक्षणापुरते कपडे ते परिधान करू लागले. अर्ध्या बाह्यांचा पांढरा शर्ट, विजार, जाड्याभरड्या वहाणा आणि वर एक टोपी! झाला! इतकाच काय तो या नटराजाचा पोषाख राहिला!

गोहरबाई गायीं, तेही गात; स्वर संगीत ऐकले की पुन्हा जणू ते अस्वस्थ होत. त्यांना गप्प बसणे असह्य होई! आणि म्हणून पुन्हा नट जमवून त्यांनी जमतील तसे नाट्य प्रयोग करायला सुरुवात केली दगदग जास्त होऊ लागली. मनाला जास्त त्रास करून घेतल्याने १९५२ साली बडोद्यात प्रयोग करीत असता त्यांचा एक पाय अधू झाला. आणि हा नटेश्वर भूमिका करण्याला अपात्र ठरला!

पण अर्धनारी नटेश्वर त्याच्या ह्या नटेश्वराच्या सहाय्याला धावून आला, तो बडोद्याच्या डॉ. कीर्तने यांच्या रूपाने! सहा महिने परिश्रम आणि स्वतःचा पैसा खर्च करून या डॉक्टराने या राजहंसाचा पाय बरा केला. सहा महिने विश्रांतीचा सल्ला त्यांना देण्यात आला.

त्याप्रमाणे ते मुंबईला गोहरबाईच्या घरी आले. गोहरबाईने घेतलेल्या घराच्या कटकटीचे ताट याच वेळी दुर्दैवाने त्यांच्यापुढे वाढून ठेवले! घर सरकारजमा होऊ नये म्हणून पैसा उभा करायला हवा होता. आणि पैशासाठी दुसऱ्याजवळ याचना न करणाऱ्या ह्या मानी महापुरुषाला आपली विश्रांती, आपले दुखणे बाजूला ठेवून पुन्हा नाटके भजने, गाणी करीत महाराष्ट्रभर हिंडावे लागले. प्रवासाची दगदग, खाण्याचे हाल, जागरणामागून जागरणे, तरीही हा माणूस पुन्हा पैसा उभारण्यासाठी भ्रमंती करीतच राहिला!

त्यांच्या आयुष्यातील आणि पुणेकरांच्या आयुष्यातला आणखीन एक भाग्य योग १९५४ साली मे महिन्यात जमून आला. पुण्याच्या 'हिंद विजय' मध्ये 'एकच प्याला' 'द्रौपदी' 'स्वयंवर' इत्यादी नाटकांचे प्रयोग पुन्हा बोडस, कृष्णराव, पटवर्धन यांच्यासह त्यांनी पुणेकरांना जणू गंधर्व नाटक मंडळीचे शेवटचे दर्शन देण्यासाठी केले. या म्हाताऱ्या नटांची ही नाटके पुण्याच्या खऱ्या रसिकांनी अलोट गर्दीने पाहिली! ती श्रद्धेने, भक्तीने!

सतत पन्नास वर्षे रंगभूमीची अशी सेवा नारायणाने केली, बालगंधर्व हे लोकमान्यांचे उद्गार इतके वर्षे त्यांनी सार्थ करून दाखविले. या नटसम्राटाची अखेरची भूमिका ५ जून १९५५ ला तुमसर येथे झाली. सिंधूची ही दुर्दैवी भूमिका करीत असता दुर्दैवी ईश्वराने त्यांचे दोन्ही पाय अखेरीस याच प्रयोगात अधू केले ते कायमचेच!

शरीर दुबळे झाले, असे पंगुत्व प्राप्त झाले! सुगीचे दिवस संपताच सारी पाखरे दूर दूर उडून गेली! पण या सश्रद्ध गान नाट्यसम्राटाने आपली असामान्य इच्छाशक्ती या दुबळ्या देहातही टिकवून धरल्याने त्यांचा गळा शेवटपर्यंत शाबूत राहिला! म्हणूनच त्यांच्या शरीराकडे, सौन्दर्याकडे, वैभवाकडे लक्ष देणारा मराठी रसिक त्यांच्या पडत्या काळा-

तही त्यांच्या या सर्व व्यंगांकडे दुर्लक्ष करून त्यांची नाट्य-गीते, त्यांची भक्तीगीते ऐकत राहिला !

गंधर्व म्हणजे मराठी रंगभूमी व मराठी रंगभूमीचा गौरी-शंकर होय ! तेनसिंगने आणि हिलरीने फार फार तर एकदा गौरीशंकरावर आपली विजय-पताका फडकविली पण गंधर्वांची ही गौरी-शंकरी जागा मराठी रंगभूमीवर त्यांचा विजय ध्वज सतत मानाने मिरवत आली. दिल्लीच्या सरकारी संगीत नाटक अकादमीने योग्य काळी फारच कमी प्रमाणात कलाकारांचा सत्कार केला आहे. गंधर्वांच्या बाबतीत उशिरा का होईना, पण १९५४-५५ सालचे अभिनयाचे अखिल भारतीय राष्ट्रपतीपदक त्यांना देण्यात आले.


त्यांच्या वयाच्या ७५ व्या वर्षी 'मुंबई मराठी नाट्य परिषदेने' १९६४ साली अमृत महोत्सव सप्ताह साजर केला. त्यावेळी गंधर्वांना ३५० रुपये सरकारी मदत दरमहा महाराष्ट्र सरकार देत होते. या समारंभाच्या निमित्ताने ते मानधन दरमहा ७५० रुपये महाराष्ट्र सरकारने केले.

पुण्याच्या सूज्ञ महानगरपालिकेने त्यांच्या नावाने 'संभाजी उद्याना' शेजारी सुमारे ३४ ते ३५ लाख रुपये खर्च करून आशियातले भव्य आणि आलिशान नाट्यगृह बांधण्याचे ठरवून त्याची पायाभरणी प्रत्यक्ष त्यांच्या हस्ते करविली.

बालगंधर्व रंगमंदिराचे बांधकाम सपाट्याने सुरू झाले. पण तिकडे विधात्याने बांधलेले बालगंधर्वाचे बांधकाम झपाट्याने ढासळत होते ! आजार वाढत गेला. अनेक धन्वंतरी; नानाप्रकारची किमती औषधे शेवटच्या क्षणाला त्यांच्यासाठी पुन्हा एकदा प्रेमाच्या प्रतिकरूपाने एकत्र आली. पण ! 'नाही मी बोलत नाथा' असे म्हणणारे बालगंधर्व शेवटी खरोखरच बोलले नाहीत ! सर्व उपाय थकले आणि १५ जुलै १९६७ ला अखेरीस रंगभूमीचा हा राजहंस, अर्धनारी नटाचें हे मोहक रूप; गंधर्व लोकीचा हा शापित गंधर्व आठवणी मागे ठेवून अनंतात विलीन झाला !

# २

# कोल्हापुरी मोती



तोंडाला रंग लावायचा, प्रखर प्रकाशाच्या दिव्यापुढे तास न् तास उभे रहायचे आणि आपल्याला विसरून दिलेल्या भूमिकेशी समरस व्हायचे, हे काम येऱ्या गबाळ्याचे नव्हे! गंधर्वांसारखा असामान्य नटसम्राट सुद्धा सिनेमातल्या ह्या निर्जीव यंत्राच्या चाकोरीत फार काळ टिकला नाही. व्ही. शान्ताराम ह्यांच्या आमंत्रणावरून गंधर्व आपली नाटक कंपनी बंद करून कोल्हापुराहून पुण्याला आले ते नाटकात काम करण्यासाठी नव्हे तर 'धर्मात्मा' ह्या चित्रपटात एकनाथाची भूमिका करण्यासाठी म्हणून! त्यासाठी त्यांना प्रभातचा पाचवा भागीदार म्हणून भागीदारी देण्यात आली होती. 'प्रभात बालगंधर्व कन्सर्न' म्हणून एक वेगळी पाती प्रभातमध्ये निर्माण करण्यात आली होती. सुखासीन देहाच्या गंधर्वांनी सुद्धा आपल्या सिनेमातल्या भूमिकेसाठी काही कमी कष्ट उपसले नाही! आपले वजन कमी करण्यासाठी ते रोज डेक्कन जिमखान्यावरून कधी पर्वतीकडे तर कधी लॉ कॉलेजच्या बाजूला घामाघूम होईपर्यंत पळत गेले होते. त्यांनी आपले वजनही कमी केले होते. प्रेक्षक समोर असताना ज्यांना सवय झालेली होती, त्या गंधर्वांना प्रेक्षकांशिवाय आणि तीन मिनिटात गाणे म्हणणे म्हणजे शुद्ध अन्याय वाटला तर त्यात आश्चर्य काहीच नव्हते. एक तान जिथे तीन मिनिटे टिकू शकते तिथे केवळ निर्जीव यंत्राच्या आणि चित्रपटाच्या लांबी-रुंदीच्या मर्यादेत 'टेक रिटेक' करीत बसणे ह्या मानी सम्राटी वृत्तीच्या कलावंताला मानवले नाही. आणि पैशाची पर्वा न करता अखेरीस त्यांनी आपल्या भागीदारीचा मोह डावलला. दुसऱ्या चित्रपटाचा करार धुडकावला आणि हा धर्मात्मा बनलेला कलात्मा थेट आपल्या सहकार्यांनी आपल्याशिवाय चालवलेल्या 'बालगंधर्व' नाटक मंडळीच्या मुक्कामी निपाणीला हजर झाला. पण बाबुराव पेंढारकरांचे सारे कलाजीवन ह्या यंत्राच्या कसोटीला उतरून रसिकमान्य राहिले. पेंढारकर म्हणजे मराठी चित्र व्यवसायाचा भला-बुरा इतिहास होय.

मराठी चित्रपटाचे चांगले आनि वाईट गुण पेंढारकरांच्या चरित्रात ठळकपणे दिसतात. कलावंतांच्या खाजगी जीवनात नव्हे, अनेकांच्या खाजगी जीवनात, नव्हे प्रत्येकाच्या मनात शिरण्याची एक दुर्दम्य हौस त्याला गप्प बसू देत नाही. कलावंताचे जीवन हे ज्यानी जवळून पाहिले असते, त्यांच्या सान्निध्यात जे आलेले असतात ते आपआपल्या बुद्धीप्रमाणे आणि आपल्याशी तो कलावंत कसा वागला त्या अनुभवाच्या धाग्याने त्यांच्या संपूर्ण चरित्राच्या स्वर्गाला रंगीबेरंगी ठिगळे लावण्याचा प्रयत्न करतात. अशावेळी तो कलावंत त्यांच्यात नसेल तर मग काय विचारावे? बाबूरावांच्या बाबतीत, नव्हे अनेक कलावंताच्या बाबतीत असेच घडते, आणि घडत आहे.

कोल्हापूर म्हणजे कलापूर! अनेक कलाच्या बाबतीत हे नाव कोल्हापूरने सार्थ केले आहे. अनेक गुणी आणि दिगंत कीर्तिचे कलावंत कोल्हापूरने भारताला दिले आहेत.

सतत साठ सत्तर वर्षे चित्रपट जगतात आपल्या असामान्य अस्तित्वाने विविध रेखा प्रेक्षकांच्या मनावर ठसविणारे बाबुराव पेंढारकर अशा ह्या कोल्हापूरात जन्मले. कोल्हापुरात त्यांचे बहुतेक आयुष्य गेले. आणि अखेरीस कोल्हापूरच्याच मातीत आपले सुगंधित कलाजीवन यांनी विसर्जित केले. असा चित्रपट कलावंत सातत्याने, ताठ मानेने, इतकी वर्षे चित्रपट क्षेत्रात स्वयंतेजाने तळपत राहणारा माझ्या मते त्यांच्या शिवाय जगाच्या कोणत्याही भाषेतील चित्रपट क्षेत्रात सापडणे अवघडच आहे.

असे हे भूलोकी स्वकलातेजाने चमकून जाणारे तारे निसर्गाचे चमत्कारच म्हणावे लागतील. आपल्या इच्छित, आवडीच्या, कलेसाठी, या महाभागांनी उभे आयुष्य अक्षरशः वेचलेले असते. रूपेरी

पडद्यावर याची नांवे आणि चेहरे पाहताना सामान्य माणूस हा आनंदून जातो. त्या क्षेत्रात जाऊ इच्छिणारा सामान्य कलाकार आदर, हेवा, असूया अशा विविध भावनातून त्या व्यक्तीच्या जीवनाकडे पाहू लागतो. आणि या चमकलेल्या ताऱ्याभोवती असलेले कीर्तीचे वलय खऱ्याखोट्या दंतकथारूपी मेघांनी पार ग्रासले जाते.

कलावंताचे जीवन म्हणजे सन्मार्गाने जाणाऱ्या साधूचे जीवन नव्हे. बऱ्या वाईट विचारांच्या भूमिका साकार करताना त्याला येणाऱ्या बऱ्या-वाईट अनुभवांनी तो अडाखे बांधून आपले जीवन जगतो. या जीवनात ज्याला जशी संगती लागते तशी त्याची प्रगती होत असताना तो वागताना दिसतो. बाबूराव पेंढारकर हे तरी या गोष्टीला कसे अपवाद असतील !

चित्रपट क्षेत्रात आयुष्य घालविलेल्या या माणसाचा जीवनपटसुद्धा अनेक चित्रपट कथांसारखा अद्भुत घटनांनी भरलेला आहे.

त्यांनी खऱ्या अर्थाने आयुष्य भोगले. त्यांचा जन्म कोल्हापूरला २२ जून १८९६ ला झाला. आयुष्यभर बोलपटात काम करणाऱ्या या मुलाची वृत्ती मात्र अबोल होती. तो एकलकोंडा होता. बरोबरीची मुले पाहून तो बोलत असे. मराठी चित्रपटक्षेत्रातले आजचे प्रसिद्ध निर्माते, दिग्दर्शक भालजी पेंढारकर हे त्यांचे धाकटे बंधु होत. भालजींचा स्वभाव मात्र बाबूपेक्षा उलटा होता. मुलात खेळावे, दंगामस्ती करावी असे बाबूला वाटत असे पण बालपणी दंगेखोर कोल्हापुरी मुलांची भीतीची पकड त्याच्या मनावर बसल्याने तो लहानपणी फारसा मुलांत मिसळत नसे.

त्याचे वडील गोपाळराव कोल्हापूर दरबाराचे डॉक्टर होते. सहाजिकच त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कोल्हापूरातच झाले. वाढत्या वयात कोल्हापूरच्या तालीम शौकीनांचा परिणाम त्यांच्या मनावर झाला

आणि तो अभ्यासाकडे दुर्लक्ष करून दंड बैठकांच्या नादी लागला. अभ्यासाची त्याला जेमतेमच आवड होती. पोरांनी खूप खूप शिकावे, फाड फाड इंग्रजी बोलावे, बड्या पगाराचे कोणीतरी मोठे साहेब व्हावे अशी सामान्य आईबापाच्या मनातील सामान्य सुरक्षित सुप्त इच्छा त्याच्याही बाबतीत त्याच्या आईची होती. पण पोरगं इंग्रजी चौथीतच चक्क इंग्रजीत नापास झाल. आईचा धाक त्याला असल्याने त्याने ते घरी सांगितले नाही आणि दुसऱ्या एका नवीन शाळेत तो इंग्रजी पाचवीत जाऊन बसला. आईशी आपण खोटे बोललो हे मात्र त्याला खटकले. कुस्तीचा शोक आणि तालमीची आवड वाढीला लागल्याने लहानपणची यथातथा प्रकृती या काळांत चांगलीच सुधारली. **गीता न वाचताही जणू गीतेतले तत्त्व** त्या बाल कलाकाराने शरीराच्या बाबतीत साकार केले असावे. या काळातील तालमीचा फायदा त्याला उभ्या आयुष्यात पुढे झाला. आयुष्यातले अनेक सुखदु:खाचे प्रसंग पचविण्याचे सामर्थ्य या पोलदी देहाला त्यामुळेच प्राप्त झाले.

मॅट्रिकपर्यंत अभ्यासाची गाडी जेमतेम ढकलत ढकलत वर जात राहिली. एकदा मॅट्रिक नापास झाल्यावर पुन्हा दुसऱ्यांदा प्रयत्न करण्या-ऐवजी त्यांनी तो कटकटीचा मार्ग सोडून दिला.

तरुण वय, गोटिबंद शरीर, कोल्हापूरातील पोलीस अधिकाऱ्यांशी घरच्यांची ओळख. यामुळे नोकरीसाठी निदान पोलीस खात्यात जावे असे ठरवून शारीरिक तपासणीसाठी ओळखीचे प्रमाणपत्र घेऊन तो बेळगांवला गेला. त्यावेळी बेळगांवला गंधर्व नाटक कंपनीचा मुक्काम होता. मृच्छकटिक हे गंधर्व कंपनीचे नाटक त्या दिवशी यांनी प्रथम पाहिले. शारीरिक तपासणी झाली. बाकी सर्व दृष्टीने शरीर मजबूत निघाले पण डोळ्यात तपासणिसाला दोष आढळला म्हणून पोलिसात भरती होण्याऐवजी तो पुन्हा कोल्हापूरला आला.

दृष्टीदोषामुळे पोलीसातील नोकरी हातची गेली. त्यामुळे कोल्हापूर-जवळील पन्हाळ्यास दरमहा बारा रुपये पगारावर आयुष्यातील पहिली शिक्षकाची नोकरी त्यांनी केली. ही नोकरी आणि येथील वातावरण त्यांना मानवले. इंग्रजीचे शिक्षक म्हणून आयुष्याला सुरुवात केलेल्या या माणसाला आपण खूप मोठे नट होणार असे तेव्हा वाटले सुद्धा नव्हते. शिक्षणाला रामराम ठोकला म्हणून नोकरी करायची इतकेच माफक ध्येय त्यांच्या डोळ्यापुढे होते. खेडेगावात इंग्रजी शिक्षकाची वाण आजही भासते. तेव्हा त्या काळात काय विचारावे ? बाबुराव इंग्रजी बरे शिकवीत. ते एकटेच खोली घेऊन रहात, तेव्हा साहजिकच बहुतेक मुले त्यांच्या घरी शिकवणीला येऊ लागली. मुलांना शिकवावे, निसर्गशोभा अवलोकावी, मिळेल ते वाचावे, हातानी जमेल ते करून खावे, असे एकमार्गी आयुष्य त्यांचे चालले होते.

पोराला नोकरी लागली, पोरगं मोठं झालं तेव्हा त्याचे दोनाचे चार हात करायची घाई त्यांच्या आईला झाली. त्यांच्या आईचे आणि वडिलांचे फारसे पटत नव्हते. त्यामुळे लग्नासारख्या महत्त्वाच्या बाबतीत सुद्धा त्याच्या आईने घाईने मुलगी पाहून लग्नासाठी रजाविजा घेण्याच्या भानगडीत त्याला न पाडता सरळ त्याला नोकरी सोडायला लावून लग्नाच्या बोहोल्यावर उभे केले. त्यावेळी बाबुराव २० वर्षांचे होते. खरे तर लग्न करण्याची त्यांची त्यावेळी इच्छा नव्हती. पण हट्टी आईच्या आग्रहापुढे त्यांचे काही चालले नाही. रमाबाई पवार या नर्सने संगोपिलेल्या एका अनाथ सुंदर मुलीशी त्यांचे हे पहिले लग्न झाले. लग्नाविषयीच्या कल्पना आणि प्रत्यक्षातला अनुभव यामुळे ते बायको-वरच चिडले. बरेच दिवस ते तिच्याशी बोलतसुद्धा नव्हते.

नोकरी गेलेली, शिक्षण कमी पण घरची परिस्थिती बरी असल्याने खावे, प्यावे आणि भटकावे, ओळखीच्या दुकानात जाऊन बसावे असा

त्यांचा दिनक्रम सुरू झाला. पण रिकामे बसणे हे त्यांच्या स्वभावातच नसल्याने त्यांनी पुन्हा नोकरी शोधायला सुरुवात केली. डॉ. पटवर्धनांच्याकडे त्यांना कंपाउंडरची नोकरी अखेरीस मिळाली पण कपड्याला अत्तर लावून औषधे द्यायला आलेल्या या कंपाउंडरला पटवर्धनांनी नोकरीवरून दूर केले. बाबुराव पुन्हा बेकार झाले !

त्यांच्या ह्या नोकऱ्या सुटणे किंवा पोलिसात नोकरी न मिळणे या गोष्टी जणू त्यांच्या अस्थीर जीवनाचा पाया होय. पन्हाळ्याला ते मास्तर म्हणून कायम झाले असते किंवा पटवर्धनांकडे कंपाउंडरची नोकरी इमानेइतबारे केली असती तर मग या चरित्रकथनाचे प्रयोजनच उरले नसते. सामान्य चाकोरीतील जीवन बाबुराव जगता जगता जीवनाच्या प्रवेगाने ते प्रगतीकडे आगेकूच करीत राहिले.

नोकरी सुटल्यावर ते आनंदराव पेंटरांच्या महाराष्ट्र सिनेमात सहज गप्पा मारण्यासाठी जाऊ लागले. पेंटर या काळात ललित कलादर्श या नाटक मंडळीसाठी स्टेज सजावटींचे काम करीत होते. गप्पा मारता मारता ते त्यांच्या कलेचे बारकावे पाहत राहिले. रिकामपण असल्याने जाणे येणे सतत वाढत राहिले.

१९१३–१४ च्या सुमारास नाशिकला ज्यावेळी दादासाहेब अळत्यांनी भारतीय चित्रपटाच्या उद्योगाला सुरुवात केली, अगदी त्याच सुमाराला कोल्हापूरला आनंदराव मिस्त्रींनी एक मूकपट काढला होता. आबासाहेब धारवाडकरांनी त्यात काम केले होते. बाबुराव पेंटर, प्रभातचे दामले, फत्तेलाल वगैरे लोक हे त्यांचेच शिष्य होत.आनंदराव पेंटरांच्यामुळे बाबुरावांचा बाबुराव पेंटरांशी परिचय झाला. आनंदरावांचा अकालीच अंत झाला. त्यामुळे रोजच्या जाण्यायेण्याचे एक हक्काचे ठिकाण आणि एक चांगला कलावंत त्यांच्यापासून दूर झाले.

दिवस असे रिकामटेकडे चालले होते. S. A. B. नावाची मोटार

कंपनी शाहू महाराजांनी याच काळात काढली होती. तिच्यात इंग्रजी पत्रव्यवहार करणारा कारकून म्हणून अर्धवेळचे काम त्यांना मिळाले. काम फार फार तर तास दोन तासांचे असेल. तेवढा वेळ सोडला की पुन्हा सर्व दिवस मोकळा वेळ त्यांना सापडे.

पण निसर्गाला त्यांना असे मोकळे ठेवायचे नसावे. आयुष्यात विविध भूमिका बोलपटात करायला लावणारा परमेश्वर जणू या काळात त्यांना प्रत्यक्ष जीवनात विविध प्रकारचे अनुभव, विविध प्रकारची माणसे यांचे कळत न कळत दर्शन घडवून शिक्षण देत होता. पण ही गोष्ट प्रत्यक्ष बाबुरावांसुद्धा त्याकाळी लक्षात आली नाही. अप्पासाहेब घोरपड्यांनी आपल्या मुलाला इंग्रजी शिकविण्यासाठी त्यांना पुन्हा गजेंद्रगड या आपल्या संस्थानांत पाठविले. राजपुत्राचा राजगुरू म्हणून ते तेथे हजर झाले. खाणेपिणे वगैरे सर्व गोष्टी दरबारमार्फत होऊ लागल्या. शिकवणे थोडे आणि बाकीच्या गोष्टी अधिक युवराजाच्या कलाने त्यांना कराव्या लागत. त्यांच्याबरोबर ते शिकारीलाही जात. असेच एकदा डुकराच्या शिकारीला ते गेले असता युवराजाचा अकाली मृत्यु झाला. पुन्हा गजेंद्रगडला जाणे त्यांना बरे वाटेना. म्हणून ते कोल्हापूरला आले.

त्यांचे कोल्हापूरला येणे यात विधिसंकेताचा भाग असावा. कारण याच काळात बाबुराव पेंटरांनी १ डिसेंबर १९०१ ला महाराष्ट्र फिल्म कंपनी स्थापन केली. कोणतीही गोष्ट स्थापन करणे किंवा तिचा आरंभ करणे ही फार सोपी गोष्ट आहे. मात्र त्या गोष्टीला लोकमान्यता मिळवून देणे ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. फिल्म कंपनी म्हटली म्हणजे भांडवलाचा प्रश्न प्रथम भेडसावतो. कंपनी काढणाऱ्या पेंटरांकडे तसे एक चित्रपट पूर्ण करण्याइतके भांडवल नव्हते. पण इच्छा तेथे मार्ग सापडतो. मनाची निष्ठा त्या गोष्टीवर केंद्रित झाली म्हणजे ती गोष्ट सोपी वाटू लागते. मात्र यासाठी पैसा नसलेल्या माणसाजवळ चिकाटी

व जीवापाड परिश्रम करण्याची तयारी एवढे तरी भांडवल सतत असावे लागते. सुदैवाने हे भांडवल त्यावेळी या लोकांजवळ होते म्हणून कोल्हापूरच्या त्या काळच्या प्रसिद्ध गायिका तानीबाई कागलकर यांनी आपले स्वतःचे दहा हजार रुपये कोणतीही अट न घालता या लोकांच्या स्वाधीन केले.

झाले ! चित्रपटाचे काम अखेरीस सुरू झाले ! बाबुराव या कंपनीत सुरुवातीपासूनच जात येत असल्याने आणि त्यातल्या त्यात लिखापढीचे काम करण्यात ते इतरांपेक्षा अनुभवी असल्याने कंपनीचे लिखाणाचे आणि चौकशीचे काम पेंटरांनी त्यांच्याकडे सोपविले. महाराष्ट्र फिल्म कंपनीतली ही पहिली उमेदवारी जणू त्यांच्या चित्रपट जीवनाचा श्रीगणेशा होता.

पेंटरांनी पहिला मूकपट 'सैरंध्री' म्हणून काढायचे ठरवले. त्याकाळी सिनेमात अगर नाटकात कामे करायला जाणे म्हणजे अत्यंत हलक्या प्रतीचे मानले जाई. म्हणून कुलीन घराण्यातील मुले इकडे फिरकतसुद्धा नसत. मग मुलींच्या बाबतीत विचारायलाच नको ! म्हणून नट-नटी मिळवणे ही मोठी डोकेदुखी होती. त्याचप्रमाणे तंत्रज्ञ कोणीच नव्हते. धंद्याला लागणारी यंत्रसामुग्रीही परदेशाहून आणणे मोठे खर्चाचे काम होते. पण हरहुन्नरी बाबुराव पेंटरांना आणि दादा मिस्त्रींना त्याचे काय ? कल्पक माणसे अडचणींना घाबरत नसतात. त्यांनी पुस्तके वाचून स्वतः स्टुडिओत एक उत्कृष्ट कॅमेरा छायाचित्रणासाठी तयार केला. आणि याच कॅमेऱ्याने त्यांनी आपल्या 'सैरंध्री' या पहिल्या मूकपटाचे छायाचित्रण केले. कंपनीत असे काम करीत असलेले बाबुराव सेटवर लागणाऱ्या वस्तू देण्यासाठी पेंटरांजवळ हजर होते. विष्णुची भूमिका नट न आल्याने पेंटरांनी बाबुरावांना मेकअप करून यायला सांगितले. आणि खलनायक म्हणून चित्रपटसृष्टीत पुढे नाव कमावणाऱ्या या माणसाने या चित्रपटात

बालविष्णुची पहिली भूमिका केली ! पेंटरांकडून अभिनयाचा पहिला धडा त्यांना मिळाला.

या चित्रपटाचे उद्‌घाटन पुण्याच्या आर्यनमध्ये लोकमान्य टिळकांच्या हस्ते झाले. लोकजागृतीचे चित्रपट हे प्रभावी साधन आहे हे लोकमान्यांनी ओळखले होते. त्यांचा हा मूकपट पाहून ते प्रभावित झाले त्यांना सिनेमाकेसरी ही पदवी लोकमान्यांनी दिली ! ध्येयात्मक चित्रपट पेंटरांनी काढावेत असे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

विष्णूचीं अशी पहिली भूमिका करून नट झालेल्या या तरुणाला आपण नट व्हावे असे तेव्हाही वाटले नव्हते. त्याची फिल्म कंपनी ज्या अवस्थेतून जात होती, ते वातावरण आणि नटांची स्थिती बहुधा त्यांच्या डोळ्यापुढे असल्याने नट होण्याचे धाडसी ध्येय त्यांच्यापुढे नसावे. पण त्यांनी निश्चित केलेले नसले म्हणून काय झाले ? सूत्रधाराने बाबुरावांना नटच बनविण्याचा चंग बांधला होता. त्याला कोण काय करणार ?

अन्नपूर्णाश्रमात जेवणे आणि विड्याकाड्यापुरते चार पैसे केव्हातरी घेणे हाच कंपनीतील नटनट्यांचा आणि मॅनेजरांचा काय तो पगार त्य काळी होता ! बाबुरावांना घरी दोन वेळेला जेवायला मिळत नव्हते- अशी काही त्यांची व्यक्तिगत अवस्था नव्हती. तरीपण ते या सर्व कलाकारांबरोबर अशा प्रकारे सतत दोन वर्षे खडतर जीवन जगत राहिले. एक दिवस फत्तेलाल त्यांना चेष्टेने म्हणाले, “ मॅनेजर, अहो पगाराचं काय करता ? ” मॅनेजर तरी काय बोलणार ? त्यालाही कंपनी स्थापन झाल्यापासून आजतागायत कुठे पगार मिळाला होता ? असे असले तरी त्या काळच्या कलावंतात आपण एका कुटुंबातील आहोत अशीच भावना नांदत होती. त्यामुळेच तर त्यातला एकेक मोहोरा नुसत्या पाट्या न टाकता पुढील आयुष्यात उपयोगी पडेल अशा नाना गोष्टींचे शिक्षण गाठी बांधीत होता. आपण विशेष काहीतरी करून दाखवावे अशी

इच्छा म्हणूनच अनेकांच्या मनातून या काळात निर्माण होत होती. आज सिनेमा क्षेत्रात वावरणारे अनेक कलाकार ह्याच जिद्दी पिढीतून निर्माण झाले आहेत. तशी जिद्द, तशी तळमळ, तशी ध्येयाबद्दलची निष्ठा आज अनेक प्रकारची शिक्षण साधने उपलब्ध असूनही आजच्या तरुणात आहे कां ?

व्यवस्थापकाचे कार्य करीत असता या काळात त्यांनी 'वत्सलाहरण' मध्ये लक्ष्मणाची, 'दामाजी'मध्ये विठू महाराची, 'बजारबट्टू'मध्ये दिवाणाची आणि 'जुल्म'मध्ये राजबंधूची अशा विविध प्रकारच्या भूमिका वरील मूकपटांत केल्या. त्या काळात स्वस्ताई खूप होती. भारतात चित्रपट कंपन्याही फारशा नव्हत्या. त्यामुळे उत्पादनाचा खर्च फार फार तर वीस ते तीस हजार येई. त्यामानाने प्रेक्षकवर्ग जास्त लाभत गेल्याने उत्पन्न मात्र एका चित्रपटापासून ऐंशी ते नव्वद हजार येई. असा हा फायद्याचा धंदा असतानासुद्धा कलाकारांना मात्र वेळेवर फारतर जेवायला मिळे. पण असे किती दिवस चालणार ? पेंटरांना सारेच घाबरत त्यामुळे पैशासाठी त्यांच्यापुढे तोंड उघडण्याचा कुणाला धीर होत नसे. पेंटर अव्यवहारी, बेहिशोबी आणि लहरी होते. मोडक्या मोटार दुरुस्तीचा आणि चित्रकलेचा असा त्यांना विविध छंद होता. या धंद्यातच ते महिनेच्या महिने घालवीत. त्या अवधीत चित्रपट निर्मिती बंद राही. कलावंत नुसते खातपीत आणि गप्पा मारीत वेळ घालवीत. अखेरीस सर्वच ह्या लहरी प्रकाराला विटले. सर्वांनी मिळून धीर करून त्यांच्यापुढे जाऊन असे सांगितले, आणि कुणाला दोन, कुणाला चार, कुणाल सात रुपये असे करता करता शंभराच्या आतबाहेर सर्वांचे पगार ठरले. बाबुरावांना पंधरा रुपये दरमहा पगार देण्यात आला. मॅनेजरची आणि चित्रपट प्रतिनिधी अशी कामगिरी त्यांना ह्या काळात करावी लागली. याच काळात बाबुरावांचा मावसभाऊ जो कोल्हापूरलाच

रहात असे, तो व्ही. शांताराम कंपनीत कामासाठी आला. बाबुरावांच्या वशिल्याने त्याला काम मिळाले. पण पेंटरांनी भारताच्या आजच्या ह्या महान् निर्मात्या दिग्दर्शकाला त्या काळी स्पष्ट सांगितले, " काम करायचे असेल तर कर पण पगार मात्र सहा महिने काहीही मिळणार नाही. शिवाय पडतील ती कामे करावी लागतील. आहे कबूल ? "

शांतारामच्या जागी दुसरा कुणी उमेदवार असता तर त्याला घरच्या भाकरी खाऊन ह्या लष्करच्या भाकरी भाजणे मान्य झाले असते का ? अशा दिव्यातून जाण्याची जबरदस्त आत्मविश्वासी निष्ठा असायला माणसाचे मनही तसेच कणखर असावे लागते. ते तसे असले तर मग कवी विनायक यांचे म्हणणे खोटे कसे ठरेल ! पूर्व दिव्य ज्याचे त्याला रम्य भावी काल ! असली पोपटपंची करून आम्ही विसरून जातो. म्हणूनच आजचे शिक्षण फार पूर्वीपासून व्यवहारी माणसांना पोकळ पुस्तकी विद्या वाटत आली आहे ! बाबूराव काय, शांताराम काय, ही माणसे शालेय शिक्षण फारसे शिकली नाहीत ! पण आपण निवडलेल्या कार्यक्षेत्राला प्रयोगशाळा समजून तिथे खूप शिकत राहिली. त्या काळच्या या बाल शांतारामचे हे अग्निदिव्य त्याला ' दो आँखे बारा हाथ ' सारख्या जगन्मान्य कलाकृतीचे जनकत्व देऊ शकले ! सहा महिने असे पडेल ते विनपगारी काम केल्यावर शांतारामला दरमहा पंधरा रुपये पगार पेंटरांनी दिला, कोणत्याही कामाला शांताराम कधी पेंटरांना ना म्हणाले नाहीत. त्यांची सारी कामे करून त्यांनी अनेक तंत्रविद्या आळस सोडून हस्तगत केल्या. याच काळात त्यांच्याप्रमाणे दामले, फत्तेलाल, हैदर यांनीही सिनेमा धंद्यातील अनेक तंत्रविद्या हस्तगत करून घेतल्या.

पेंटिंग आणि मोटार दुरुस्तीमुळे हा असा वेळ व्यर्थ वाया जात असल्याने कलावंत नाराज होऊ लागले. आज लाखाने पगार घेणाऱ्या

मुख्य नट्या त्या काळी किती रुपये घेत असतील बरं? तुम्हाला सांगितले तर आश्चर्य वाटेल! सैरंध्रीची भूमिका करणाऱ्या मुख्य नटीचा पगार दरमहा फक्त पंचवीस रुपये होता आणि तोही अनेक महिने पेंटरांकडे थकलेला होता. तिचे वडील वारले तेव्हा त्यांच्या क्रियाकर्मासाठी दहा रुपये मिळावे म्हणून दुःख विसरून ती पेंटरांकडे आली. पण पेंटरांनी दहा रुपये देण्याची माणुसकीसुद्धा दाखविली नाही. म्हणूनच की काय नंतर काही दिवसातच कंपनीला अचानक आग लागली. आणि हजारो रुपयांचे सामान, चित्रपटांच्या प्रती जळून त्यांची राख झाली. पण कोल्हापुरातील कलाप्रेमी लोकांनी त्यांना धीर दिला. नेसरीकरांनी भांडवल दिले. आणि भारतातील पहिला ऐतिहासिक 'सिंहगड' हा बोलपट तयार करण्यात आला. यात उदयभानूची भूमिका त्यांनी केली होती. नंतर 'कल्याण खजिना' 'सावकारी पाश' वगैरे ध्येयवादी चित्रपट त्यांनी काढले.

हा काळ त्यांच्या ऐन पंचविशीचा होता. पगाराकडे लक्ष न देता कंपनीला आपलीच कंपनी समजून साऱ्या कलावंताप्रमाणे तेही जीव तोडून काम करीत होते. पण याच काळात घडू नये ते घडले. पेंटरांनी दुसऱ्याच्या जवळ पंचवीस हजार रुपये त्यांनी खाल्ल्याचा आरोप केला. असत्याला कधी न कधी वाचा फुटतेच. पेंटरांचा हा आरोप त्यांच्या मित्रांनी त्यांना सांगताच त्यांना दुःख झाले. आणि पुराव्यानिशी तो आरोप खोटा आहे हे चारचौघासमोर त्यांना ठणकावून सांगून ते म्हणाले, 'इतःपर तुमचं आणि तुमच्या कंपनीचं तोंड पाहणार नाही.'

मानी माणसाला स्वजनांनी केलेला आरोप सहन होत नाही. अशा वेळी त्या माणसाचा आपल्या मनावर ताबा रहात नाही. ज्यांच्यासाठी आपण खस्ता खाल्ल्या ते हे असे उलटल्यावर त्याला मरणप्रायः दुःख होते. तसेच त्यांचे झाले. कधी न रडणारा हा माणूस घरी आल्यावर

मुक्तपणे रडला. तो आईचा हात मायेने पाठीवरून फिरत असताना ! त्याना आपल्या आईबद्दल अत्यंत आदर होता. तिने केलेल्या काही चुकांबद्दल त्यांचे आयुष्य भोवऱ्यात सापडलेल्या नावेसारखे सैरभैर झाले. पण मायेच्या ओढीने हा भोवरा फोडून त्यांची जीवननौका त्यांच्या आईमुळे पुढे पुढे जात होती. खरे काय ते त्यांनी आईला सांगितले. आईला ते पटले. तिने त्याला चार धीराच्या गोष्टी सांगितल्या. आणि हा असा मानहानीचा आघात ते पचवतात न पचवतात तोच परमेश्वराने आणखीन एक जबरदस्त धक्काच त्याना दिला. चारपाच दिवसाच्या आजाराचे निमित्त होऊन पत्नी वारली. तिचे अबोल पातिव्रत्य ! म्हणूनच आणखीन भडभडून यायला आणखीन कारणीभूत झालं. वेळ आणि भरतीची लाट कधी कुणासाठी थांबत नाही ह्या उक्तीप्रमाणे वेळेचे चक्र दिनमणीच्या क्रमानुसार सतत फिरत होते. पुन्हां बेकार होऊन बाबुराव हिंडत होते. याच काळात सरपोतदार पुण्याला प्रभावती चित्रपट डेक्कन पिक्चर्सतर्फे काढीत होते. त्यांची आणि बाबुरावांची ओळख असल्याने ते पुण्याला गेले. नंतरच्या दोनच वर्षात त्यांचे धाकटे बंधू भालजी यांनी मुंबईत मे १९२६ ला अळतेकरांच्या सहकार्याने ‘ वंदे मातरम् ’ फिल्म कंपनी स्थापन केली. बाबुरावांनाही त्या दोघांनी सहभागी करून घेतले. आणि सर्वांनी मिळून ‘वंदे मातरम्’ हा ध्येयवादी बोलपट तयार केला. या चित्रपटात त्यांनी सारंगीवाल्याची भूमिका केली होती.

अज्ञान, हेवेदावे, भांडवलाचा अभाव, स्वतःबद्दलचा फाजील अभिमान इत्यादी नको त्या दुर्गुणांचा प्रभाव संस्थेत काय, व्यक्तीत काय एकदा झाला की तिची प्रगती खुंटते. भारतातील अनेक संस्थांना याच गोष्टी त्या जमीनदोस्त होण्याला कारणीभूत झालेल्या आहेत. मराठी चित्रपट क्षेत्रात तर आजतागायत अनेक वर्षे जिद्दीने टिकून राहिली

आहे अशी एकही चित्रपट निर्मिती संस्था नाही ! भालजी शांतारामचे कोल्हापूरचे स्टुडिओ हे त्यांच्या पाठीशी उभे आहेत इतकेच काय ते ! म्हणून वरील कारणांनी ' वंदे मातरम् ' चित्रसंस्था एका चित्रपटातच आटोपली. आणि बाबुराव पुन्हा कोल्हापूरला आले.

तरुण विधुर पोरगा पुन्हा आईच्या डोळ्यासमोर आला. लग्न करू नये या विचारात असताच पुन्हा आईच्या प्रेमाला बळी पडून शिपूर गावच्या कृष्णाबाईशी त्यांचा दुसरा विवाह झाला. अर्थात पहिल्या विवाहाप्रमाणे ह्या काळीही ते बेकारच होते. आईच सारे पाहत असल्याने प्रापंचिक जीवनाची काळजी नव्हती. म्हणून बेछुट आणि कलंदर जीवन ते याही काळात जगत होते. या काळात त्यांना सोंडुलचे राजे घोरपडे यांच्याकडे पुन्हा बोलावणे ल्याने ते पत्नीला माहेरी पोचवून एकटेच तिकडे गेले. पुन्हा राजयोग त्यांच्या कुंडलीत आला असता फारसे कामधाम न करता राजेसाहेबांबरोबर नाना प्रकारचे उपभोग घेण्यात आणि त्यांच्या पंक्तीला सुग्रास अन्न घेण्यात त्यांचा काळ जाऊ लागला. असे सुख घरी चालून आले होते. काय पाहिजे ते मिळत होते. चैन चालू होती. पण हे सारे करूनही रिकामा वेळ भरपूर मिळे आणि या रिकामपणाचाच त्यांना उबग येई. अनेक वेळा पळून जावे असे वाटे. आणि अखेरीस झाले तसेच ! राजेसाहेबांबरोबर उटकमंडला हवा खाण्यासाठी जाण्यासाठी म्हणून ते रेल्वे स्थानकावर गेले. आणि त्यांचा डोळा चुकवून कोल्हापूरच्या गाडीत विनातिकीट प्रथम वर्गात बसले. पोषाख दरबारी असल्याने शेवटपर्यंत कुठेच कुणी काही विचारले नाही. आणि अशा रीतीने सोन्याच्या पिंजऱ्यात अडकलेला हा रूपेरी छावा सुखरूप कोल्हापूरला आला. तिथून तो पत्नीसाठी शिपूरला गेला. जावईबोवांना बायकोसह सामानसुमान देऊन सासऱ्याने त्यांना जवळच्याच गडहिंग्लजला बिऱ्हाड थाटून दिले. पण चहा प्यायची सवय

लागलेल्या बाबुरावांच्या खिशात चहासाखरेपुरते सुद्धा पैसे या काळात नव्हते. पुन्हा दिवस जाऊ लागले. या काळात त्यांना जो मुलगा झाला त्याचे नाव त्यांनी त्यागराज ठेवले. पत्नीच्या त्यागी स्वभावावरून हे नाव त्यांनी त्याला दिले होते. हा त्यागराज सध्या राजकमल कला-मंदिरात शांतारामबापूंकडे तंत्रज्ञ म्हणून काम करीत आहे.

काम नाही, रिकामे बसवेना, काय करावे ते सुचेना! अशा या संभ्र-मावस्थेत त्यांना कळले की पेंटर्सना सोडून धायबर, दामले, फत्तेलाल व्ही. शांताराम आणि सी. कुलकर्णी हे पाचजण महाराष्ट्र फिल्म कंपनी-तून बाहेर पडले. पण या बोलपटातील पाच पांडवांच्या दोन वेगळ्या वाटा होत्या. ह्या बाबुरावांच्यामुळेच एकत्रित आल्या.

त्याचेच फळ म्हणजे प्रभात फिल्म कंपनी होय. प्रभात हे नाव त्यांनीच सुचविले. आणि मराठीतून या पाच चित्रपट मालकांना त्यांचे नाव आवडले. प्रभात फिल्म कंपनीची स्थापना जून १९२९ ला कोल्हा-पूरला झाली. जणू मराठी चित्रपटाचा उषःकाल संपून प्रभातकाल सुरू झाल्याचेच हे नाव निदर्शक असावे; इतके ते योग्य आणि अर्थवाही ठरले. जुनीच पेंटरांकडची काही मंडळी प्रभातमध्ये येऊ जाऊ लागली. बाबुरावही या कंपनीत रोज येऊ लागले. त्यांचे नाव जरी पसंत पडले तरी त्यांना कुणीच नोकरीस रहा म्हणून म्हणेना. अखेरीस चित्रनिर्मितीचे काम सुरू झाले आणि पंचवीस रुपये पगारावर प्रभातचे व्यवस्थापक म्हणून त्यांना काम देण्यांत आले. अर्थात व्यवस्थापक म्हणजे त्याकाळी सर्व प्रकारचे काम करणारा माणूस व्यवस्थापक समजला जात असे. ऑफिस संभाळणे, शूटिंगला लागणाऱ्या सर्व प्रकारच्या साहित्याची जातीने जुळवाजुळव करणे, थोडक्यात कुठे काय कमी पडते आणि लागते ते लक्षात ठेवून काम करणारा म्हणजे व्यवस्थापक. अशा प्रकारे सर्व प्रकारच्या खात्यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळत गेल्याने चित्रनिर्मितीला लागणाऱ्या जणू निर्मितीचे शिक्षण त्यांना मिळत होते.

१९२९ साली प्रभातचा पहिला मूकपट 'गोपाळकृष्ण' तयार झाला. हा पौराणिक मूकपट भारतभर गाजला. कंपनीला चांगलाच फायदा झाला. नंतर 'खुनीखंजीर' हा दुसरा मूकपट कंपनीने ताबड-तोब तयार करण्यास घेतला. आणि या चित्रपटापासूनच त्यांच्या चित्र जीवनाला खरी सुरुवात झाली.

या मूकपटात दिवाणाची भूमिका शांतारामच्यामुळे अचानकपणे, ध्यानीमनी नसता मिळाली. भूमिका मिळाल्याने झालेला आनंद त्यांनी ती भूमिका वठविण्यासाठी आणला.

आपल्या भूमिका जिवंत, वास्तव आणि प्रेक्षकांची पकड घेणाऱ्या व्हाव्यात म्हणून ते सतत अशा मिळालेल्या भूमिकांचा मनापासून अभ्यास करीत. दृश्य समजावून घेत. मिळालेली भूमिका कोणत्या प्रकारची आहे ते लक्षात येताच तशा प्रकारचा इसम आपल्या प्रत्यक्ष जीवनात जवळ-पास कुठे आढळतो का याचे ते संशोधन करू लागत. या संशोधना-तूनच ती भूमिका प्रत्यक्ष करणारा कुणीतरी भेटे. बाबुराव त्याला नकळत त्याचे निरनिराळ्या प्रकारे निरीक्षण करीत. म्हणून दिवाणाची भूमिका मिळाल्यावर त्यांनी लगेच कोल्हापूर दरबारचे त्यावेळचे दिवाण लठ्ठे यांचे सर्व प्रकारचे निरीक्षण केले. ते बसतात कसे, हातापायांची हालचाल करतात कसे, कुणाशी बोलताना त्यांचा आवाज आणि चेहऱ्यावरील भाव दिसतात कसे इत्यादी अनेक बारीक सारीक निरीक्षण त्यांनी या भूमिकेसाठी केले. आणि म्हणूनच त्यांची या मूकपटातील खलपुरुषाची ही पहिली भूमिका गाजली. त्यांच्यातील कलागुणांचा प्रभातच्या मालकांना यामुळे चांगलाच प्रत्ययाला आला. आणि म्हणूनच त्यानंतर प्रभातच्या अनेक चित्रपटात खलपुरुष म्हणून गाजले.

अजूनही आपण नट म्हणून आयुष्य जगावे असे त्यांनी ठरविले नव्हते. कंपनीत पडेल ते काम करायचे हाच एक बाणा त्यांनी अंगि-

कारला होता. त्यामुळे मूकपटात खलनायक म्हणून काम करीत असताच ते व्यवस्थापक म्हणूनही काम करीत होते. कधी कधी सहदिग्दर्शक म्हणूनही ते काम करीत असत. कंपनीचा एकेक मूकपट यशस्वी होऊ लागला. आणि कंपनीची कोल्हापुरातील मंगळवार पेठेतील जागा तिच्या वाढत्या व्यापाला अपुरी पडू लागली.

याच काळात मूकपट बोलू लागले. 'अयोध्येचा राजा' हा प्रभातचा पहिला बोलपट. चित्रपटात कामे करायला कुलीन स्त्रिया त्या काळी तयारच होत नसत. मुंबईच्या लाडांची कन्या दुर्गा खोटे ही या बोलपटासाठी लाभलेली पहिलीच कुलीन नटी! तिला तारामतीची भूमिका देण्यात आली. रोज तीन ते सहा या वेळात या चित्रपटाच्या तालमी नाटकाप्रमाणे घेतल्या जाऊ लागल्या. कारण नाटकांचे प्रस्थ जबरदस्त होते. या चित्रपटात त्यांना गंगानाथ महाजनाचे काम देण्यात आले होते. मिळालेली भूमिका आत्मसात केल्यामुळे त्यांनी आपल्या धारदार शब्दांनी आणि प्रसंगाभिनयाने हा गंगानाथ महाजन चांगलाच वठविला. आपले कसब आणि शांतारामचे दिग्दर्शन यामुळे प्रत्येक पात्राचे काम फारच सुरेख या चित्रपटात झाले आहे, त्या काळी विजेच्या दिव्यांची शूटिंग-साठी सोय नव्हती. त्यामुळे स्टुडिओत काय किंवा स्टुडिओबाहेर काय, बहुतेक शूटिंग प्रखर उन्हात केले जाई. मोठमोठाले रिफ्लेक्टर्स, निर-निराळ्या कोनात उभे करून त्याचें प्रकाशझोत चित्रित केल्या जाणाऱ्या जागेवर टाकले जात. मेकअप, दगदगिने, कपडे आणि हा प्रखर उन्हाचा त्रास यांनी प्रत्येक जण वैतागून जात असे. आजकालच्या मोटारीतून स्टुडिओत आणि स्टुडिओतून मोटारीत जा-ये करणाऱ्या, नाजूक प्रकृतीचे अनेक नट-नटी त्या काळी या असल्या पहिल्याच शूटिंगच्या वेळी आपले काम टाकून पळून गेल्या असत्या. पण तसे होत नव्हते. प्रत्येकाला आपआपल्या कलेचे सामर्थ्य दाखविण्याची ही सुवर्णसंधी

वाटत असे. कंपनीबद्दलचा परकेपणा त्यांच्या मनात नव्हता. आपुलकीच्या भावनेने एकत्र जमलेले हे कलेचे कुटुंब जणू अभिनय आणि कला यांचा डाव रंगविण्यासाठी प्रभातच्या झेंड्याखाली एकत्र आले होते. आणि म्हणूनच प्रभातचा हा पहिला अजरामर बोलपट १९३२ साली भारतभर झळकला. मराठी व हिंदीतून निघालेल्या या चित्रपटाने प्रभातची तुतारी भारताच्या कानाकोपऱ्यात घुमविली.

अर्थात प्रभातचे नाव भारतातच नव्हे तर जगात सर्वत्र माहीत आहे. जागा शोधण्याचे काम सुरू झाले, पुणे-मुंबई, पुणे-कोल्हापूर या भिन्न भिन्न गांवाचा या दृष्टीने विचार सुरू झाला. शांतारामबापूंचे म्हणणे अखेरीला मान्य होऊन मुंबईला जवळ म्हणून पुण्याची निवड कायम झाली; व्यवस्थापक या नात्याने अर्थातच जागेच्या शोधासाठी बाबुराव कोल्हापूरहून पुण्याला आले. पुण्याच्या आसपासच्या जागा त्यांनी सोडल्या. हनुमान टेकडीची पार्श्वभूमी असलेली सरदार नातूंची अकरा एकर जागा फक्त सतरा हजार रुपयास १९३२ साली खरिदण्यात आली. व्यवहार पूर्ण करून बाबुराव कोल्हापूरला गेले. चित्रपटाचे व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठीं त्याचवेळी व्ही. शांताराम जर्मनीला गेले. कोल्हापूरला आहे त्या पगारावर ज्यांची पुण्याला यायची तयारी असेल; त्यांनाच फक्त पुण्याला न्यायचे ठरले. त्यामुळे काही गळले, काही राहिले. त्यावेळी १२० रु. पगारावर ते मॅनेजर, नट, सहदिग्दर्शक इत्यादी भूमिका वठवीत होते. पुण्याला जायचे म्हणजे कोल्हापूरचे स्वतःचे रहाते घर सोडून भाड्याने जागा घेण्याचा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. २५ रुपये भाड्याची जागा त्यांनी पाहिलीही होती. निदान तेवढे भाडे कंपनी आपल्याला देईल असे त्यांना वाटे. पण फत्तेलाल आणि धायबर हे दोघेजण असलेल्या पगारात एक पैशाचीही वाढ करण्यास तयार झाले नाहीत. तेव्हा त्याना मनस्वी दुःख झाले. ज्यांच्यासाठी आपण रात्रंदिवस तहान-

भूक विसरून सर्व काही केले त्यांच्याकडून हा असा अनुभव येताच त्यांच्या मानी मनाला वाईट वाटले. आणि हा अपमान समजून १९३३ साली त्यांनीं प्रभातचा राजिनामा दिला.

१९३३ सालची ही घटना आहे. हे साल त्यांना फारच वाईट गेले. क्षयाने आजारी असलेली त्यांची द्वितीय पत्नी या साली वारली. अशा रीतीने कलेचा आणि गृहस्थी जीवनाचा संसार त्यांना उध्वस्त झाल्यासारखा वाटला.

प्रभात कंपनी कोल्हापूर सोडून पुण्याला गेल्याने कोल्हापूरचे कलाप्रेमी महाजन अस्वस्थ झाले. बाबूराव कंपनीबरोबर पुण्याला न गेल्याचे कळताच त्यांना बरे वाटले. आणि त्यांनी स्वतःच कोल्हापूरचे चित्रपट जीवन चालू रहावे म्हणून ऑक्टोबर १९३३ ला कोल्हापूर सिनेटोन नावाची कंपनी स्थापन केली. विनायक, भालजी आणि बाबुराव हे तिघेही बंधू या कंपनीत एकत्र आले. 'आकाशवाणी' नावाचा कृष्णजीवनावरील बोलपट या कंपनीने १९३४ साली प्रकाशित केला. त्यात दिकपालाची भूमिका त्यांनी केली होती. नंतर 'विलासी ईश्वर' हा आणखीन एक बोलपट या कंपनीने काढला. त्यात ईश्वराची भूमिका त्यांच्या वाट्याला आली होती. कंपनीचा कारभार दरबारातील कलेविषयी जिव्हाळा नसलेले आणि उठसूट हिशोबीपणाची कातर प्रत्येक बाबीला लावणाऱ्या काही नोकरांच्या रोजच्या त्रासदायक वागण्याने अखेरीस ते तिघेही बंधु कंपनी सोडून बाहेर पडले.

आजपर्यंत या धंद्याचा सर्व प्रकारचा अनुभव त्यांना आला होता. तेव्हा आपणच स्वतःची चित्रपट कंपनी काढावी या विचाराने त्यांच्या मनाची पकड घेतली. खिशात पैसा नव्हता. पण पैशासाठी त्यांचे कधीच अडले नाही. 'हिम्मते मर्दा तो मदते खुदा' या न्यायाने त्यांनी हालचाली सुरू केल्या. मुंबईच्या चंदुलाल शहाने त्यांना कोणत्याही

अटी न लावता भांडवल दिले. आणि खांडेकरांच्या कथेवर त्यांनी 'छाया' नावाचा पहिला बोलपट आपल्या मालकीच्या 'हंस पिक्चर्स' मार्फत १९३६ ला प्रकाशित केला. हिंदी-मराठीतील हा बोलपट शोकांत असल्याने आणि खांडेकरांची कथा त्याला लाभल्याने भारतात तो सर्वत्र गाजला. डॉ. अतुलची भूमिका त्यांनी या चित्रपटात केली होती. ह्याचे दिग्दर्शन त्यांचे बंधू विनायक यांनीच केले होते. विनायकच्या लहरी स्वभावामुळे आचार्य अत्रेंची कथा असलेला 'धर्मवीर' हा दुसरा या कंपनीचा चित्रपट पहिल्या गतीने तयार झाला नाही. लाळघोट्या लोकांच्या नादी लागून विनायकाने आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष केले. स्वतःची भूमिका संभाळून कंपनीचा आर्थिक व्यवहार तेच पहात असल्याने चित्रपट वेळेवर तयार व्हावा म्हणून त्यांना काळजी वाटत होती. पण अखेरीस मोठ्या प्रयासाने १९३४ ला हा चित्रपट हिंदी-मराठीत प्रकाशित झाला. धर्मवीराची प्रमुख भूमिका त्यांनी या चित्रपटात केली होती.

कामानिमित्त ते पुण्याला आले असता प्रभातमध्ये काम करणारा चंद्रमोहन आपल्या नारायण पेठेतील बिऱ्हाडी आजारी असल्याचे त्यांना कळले. तेव्हा ते जातीने त्याना भेटायला गेले. तापाने फणफणणाऱ्या या नटाची प्रभात कंपनीतील कुणीही चौकशी केली नव्हती. बाबुरावांच्य' भेटीमुळे म्हणून त्यांना खूप बरे वाटले आणि म्हणूनच प्रभातवर चिडून बरे झाल्यावर तो कोल्हापूरला आला. त्याच्यासाठी 'ज्वाला' हा चित्रपट खांडेकरांनी लिहिला. नंतरचा चित्रपट 'अमृत' यात विनायकाने अनेक बदल केल्याने तो चित्रपट पडला. आर्थिक नुकसान खूपच झाले. बाजारातील पत नष्ट होण्याची वेळ आली. ते हतबल झाले. वास्तविक त्यांना पटले होते की, दिग्दर्शन कितीही कल्पक, कलात्मक आणि हेतुप्रधान असले तरी ते संयमाच्या कोंदणात बसावे लागते. तरच ते उठावदार दिसते.

सारेच प्रसंग सारख्याच विस्ताराने चित्रित केले तर चित्रपटाची लांबी निष्कारण वाढून चित्रपट कंटाळवाणा होतो. पण त्यांच्या या मौलिक सूचनांकडे विनायकाने दुर्लक्ष केले आणि चित्रपट पडला.

काय करावे, पुन्हा हा प्रपंच कसा रेटावा अशा हतबल अवस्थेत ते असता अत्रे यांच्या घरी पुण्याला ते गेले. त्यांची स्थिती लक्षात येताच अत्रे त्यांना म्हणाले, "बाबुराव, तुमची पत ती आमची पत! तुम्ही घाबरू नका. असा फर्स्टक्लास चित्रपट तुम्हाला देतो की, खोऱ्याने पैसा मिळवाल." रात्रभर दोघांनाही झोप नव्हती. बाबुराव स्वतःच्या चिंतेत असल्याने आणि अत्रे चित्रपट कथेच्या कल्पनेत विहरत असल्याने पहाट होता होता अत्रे बाबुरावांना म्हणाले, "बाबुराव चित्रपटाचे नाव जाहीर करा."

बाबुरावांनी प्रश्नार्थक नजरेने त्यांच्याकडे पाहिले.

अत्रे सात मजली हसत म्हणाले, "ब्रह्मचारी!"

नावात नाविण्य, कथेत नाविन्य, मुंबईची रतन शिरोडकर हिला मिनाक्षी हे नाव देऊन दरमहा २५० रुपये पगार देऊन या चित्रपटासाठी नवी नटी म्हणून त्यांनी शोधून काढली. अपयश पचवून नव्या उत्साहाने विनायकाने ब्रह्मचारी तीन महिन्यात पूर्ण केला. चित्रपट फायद्याचा आहे हे लक्षात येताच देणेकरी चित्रपट लागण्यापूर्वी त्यांना कर्जाचा तगादा वारंवार करू लागले. म्हणून नाइलाजाने १ लाख दहा हजाराला हा चित्रपट त्यांनी अखेरीस विकला. आणि दोन तीन लाख होणारा फायदा अशारीतीने त्यांना दुरावला. 'ब्रँडीची बाटली' या चित्रपटात केलेल्या भूमिकेमुळे दामुआण्णा मालवणकर प्रथम प्रसिद्धीस आले. नंतर 'देवता' 'सुखाचा शोध' 'अर्धांगी' वगैरे जवळजवळ दहा बोलपट हंसने चार वर्षात काढले. यात अर्धांगीमधील झेंड मारुतराव ही भूमिका त्यांची विशेष गाजली.

हंसने काढलेल्या या दहा चित्रपटांपैकी दोन चित्रपट सोडता बाकीचे सर्व हिन्दी-मराठीत काढले होते. आचार्य अत्र्यांचे सहा आणि खांडेकरांचे चार असे त्यांचे विभाजन होते. महाराष्ट्रातील मान्यवर साहित्यिकांच्या चित्रकथा 'हंस'ने चित्रपटासाठी निवडून कलेचे एक नवीनच 'हंसयुग' सुरू केले होते. ध्येयवादी समाजसुधारक संस्कृती आणि राष्ट्रप्रेम यांचा गुणांचा वारसा सांगणारे हे चित्रपट कधी शोकात, कधी सुखात, कधी उपहासात्मक तर कधी विनोदप्रचुर असत. 'हंस'ने हाताळलेल्या ह्या विषयांची नावेच तिच्या विविधतेची म्हणजेच पर्यायाने बाबुराव पेंढारकरांच्या कलाप्रवृत्तीची साहित्यिक साक्ष देणारे ठरतात.

शामराव ओक 'हंस'च्या प्रसिद्धीचे काम पाहत असत. त्यांचा बोचक विनोदी स्वभाव या रूक्ष व्यवसायातसुद्धा टिकून राहिला होता. देवता चित्रपटाची प्रसिद्धी करताना त्यांनी एका जाहिरातीवर मथळा दिला होता, "पडद्यावरील बदमाश सुधारला' यातील पडद्यावरील शब्द त्यांनी गाळला असता तर? 'हंस' म्हणजे साहित्यिक कलावंत यांचा कोल्हापूरला जमलेला मेळावा होय.

सहा चित्रपटांचे यशस्वी कथा-लेखन केल्याने अत्र्यांना वाटले एक लिमिटेड चित्रकंपनी काढावी. म्हणजे या धंद्याला स्थैर्य येईल. आणि ते नुसते बोलूनच थांबले नाही तर त्यांनी एकट्याने या नव्या कंपनीचे शेअर्स महाराष्ट्रभर हिंडून खपविले. 'हंस'चेच रूपांतर म्हणून 'नवयुग चित्रपट लि.' मध्ये झाले. साठ हजाराला हंसाची सारी मालमत्ता या नव्या कंपनीने विकत घेतली. उत्साहाने नव्या चित्रपटाचे शूटिंग सुरू झाले. 'लपंडाव' हा नवयुगचा पहिला बोलपट. 'वनमाला' या बोलपटाने प्रसिद्धीला आली. या चित्रपटात ठेकेदाराचे काम त्यांनी केले. दुसरा चित्रपट संतपट काढावा म्हणून अत्र्यांनी संत सखूच्या जीवनावर चित्रकथा लिहिली. पण विनायकच्या आगलाव्या मित्रांनी त्याच्या

अहंकारी आणि अदूरदर्शी स्वभावाचा फायदा घेऊन ह्या नांदत्या चित्र-संस्थेला खो घातला. आणि त्यामुळे अत्रे व विनायक यात मतभेद निर्माण झाल्याने त्यांनी कंपनीचा राजीनामा दिला.

कलेचा संसार फार विचारपूर्वक करायला पाहिजे. व्यवहाराच्या गणिताचा अनादर तिने करू नये. कलेला प्राधान्य जरूर द्यावे परंतु तिचे व्यवहाराबरोबर समीकरण करावे. हे असे घडत नाही. म्हणून तर अनेक चित्रसंस्था आणि नाट्यसंस्था बंद पडतात. आणि त्याच्यावर अवलंबून असल्याने अनेक कलावंताचे जीवन धोक्यात येते. हे कटू सत्य त्यांना पटले होते. पण विनायकला ते उमजले नव्हते. ते जर त्याला उमजले असते तर हंस नवयुगाचे दैदिप्यमान युग मराठी चित्रपट सृष्टीला खचितच आणखी मोलाची भर घालते !

पुन्हा बाबुरावांच्या जीवनात दुःखाचा कालखंड आला. मोठ्या मुलाने सात वर्ष लग्न करण्याचे नाकारल्याने अखेरीस ती आजारी पडली. त्यातच तिला पोटातील कॅन्सरने जास्त यातना दिल्या. तेव्हा पुन्हा एकदा डिसेंबर १९४० ला घाईघाईने पुण्यातील एका मास्तरणीशी आईच्या समाधानासाठी त्यांनी तिसरे लग्न केले. आणि महिन्या भरातच त्यांची आई हे जग सोडून गेली.

अत्रे नवयुग सोडून गेले, त्यांनाही विनायकाचे म्हणजे प्रत्यक्ष भावाचे वागणे पटेनासे झाले होते. त्यातच दामुआण्णा, मीनाक्षी वगैरे कंपनी-तील लोकांनी पगार वाढ मागितली. नट म्हणून झालेल्या करारामुळे ते तसेच काही दिवस कंपनीत येत जात होते. मानहानी आणि मनाचा कोंडमारा होत असता बाहेर पडण्याचा मार्ग सुचेना ! तेव्हा मित्राच्या सल्ल्याने त्यांनी खोट्या आजारी माणसाची भूमिका वठवली. आणि 'अमृत' तयार होताच अखेरीस त्यांना कंपनीतून बाहेर पडता आले. 'अमृत'मध्ये केलेली कृष्णा चांभाराची भूमिका ही त्यांच्या गाजलेल्या भूमिकांपैकी एक होय.

मनाच्या अशा गोंधळात आगतिकपणे ते आला दिवस घालवित होते. त्यांच्या ओळखीचे अनेक लोक त्यांनी पुन्हा नवीन कंपनी काढावी काढावी म्हणून मागे लागले. काहीजण भांडवल द्यायलाही तयार झाले. नाईक आणि बाबुराव यांनी अखेरीस रमणीकलाल मोहन-लाल यांच्याकडून भांडवल मिळताच न्यू हंस पिक्चर ही कंपनी स्थापन केली. सप्टेंबर १९४१ ला 'पहिला पाळणा' याचा मुहूर्त करण्यात आला. ग. दि. माडगूळकर नकला छान करीत. म्हणून त्यांना एक भूमिका ह्या चित्रपटात देण्यात आली. हा चित्रपट ४२ ला प्रकाशित झाला. बेडेकर लेखक आणि दिग्दर्शक म्हणून या चित्रपटाने त्यांच्याच मुळे पुढे आले. नंतर 'भक्त दामाजी' हा न्यू हंसचा दुसरा चित्रपट 'आणि पैसा बोलतो आहे' हा तिसरा चित्रपट त्यांनी काढला. 'पहिल्या पाळण्यात' प्राणनाथाची, भक्त दामाजीत विठू महाराची आणि पैसा बोलतो आहे मध्ये लाल नाथाची, अशा भूमिका त्यांनी केल्या. विठू महार विशेष गाजला.

द्रौपदी मुख्य नटी घेण्याच्या प्रश्नावरून बाबुराव पटेल आणि त्यांच्यात मतभिन्नता झाली. आणि अखेरीस हजारो रुपयांचा फायदा सोडून त्यानी न्यू हंस मधून आपले अंग १९४४ साली काढून घेतले.

चित्र निर्मितीतील अनेक वर्षांचे कटु अनुभव जमेला धरून त्यांनी अखेरीस निर्माता होण्याचा मोह आग्रहाने टाळला. पैसा येईनासा झाला. दिवस रिकामे जाऊ लागले. तेव्हा मुंबईच्या प्रकाश चित्राच्या विक्रमा-दित्यामध्ये वेताळ भटाची भूमिका साधारण दोन वर्षानंतर त्यांना मिळाली. ते स्वतःची कंपनी सोडून इतरत्र काम करतात असे मुंबईच्या चित्र निर्मात्यांच्या लक्षांत येताच त्यांना अनेक हिंदी चित्रपटातून भूमिका मिळाल्या. रणजितच्या सम्राट अशोकमधे कलिंग देशाचा राजा, पहली नजरमधे छोटा नबाब, नंदकिशोरमधे कंस इत्यादी अनेक भूमिका त्यांनी

या काळात केल्या तरी विशेषपणे राजकमल चित्रमंदिरात ते रमले. डॉ. कोटणीस, जीवनयात्रा, दो आँखे बारह हाँथ, मौसी, नवरंग, शकुंतला इत्यादी अनेक राजकमल चित्रात त्यांनी भूमिका केल्या. डॉ. कोटणीस' मधील चिनी सेनापतीची आणि दो आँखे बारह हातमध्ये सुपरिंटेंडेटची त्यांची भूमिका विशेष वाटली.

चित्रनिर्मितीची कटकट अशी मागे नसल्याने या काळात मिळणारा भरपूर पैसा ते आपल्या चैनीसाठी खर्च करू लागले.

आतापर्यंत त्यांनी मोटार घेतली नव्हती ती घेतली. कोल्हापूरला मना-सारखा बंगला बांधला. त्यामुळे पत्नी आणि मुलांना हक्काचे घर झाले. चित्रपटाच्या कामानिमित्त ते घरापेक्षा बाहेरच जास्त असत.

असे घराबाहेर त्यांचे बरेच आयुष्य गेले. घराविषयी, घरातल्या माण-सांविषयी त्यांना ओढ आणि प्रेम असले तरी कोल्हापुरी रंगेल वृत्ती आणि कलावंताचे कलंदर जीवन जेव्हा पैशाने बोलू लागले, फारसा घाम न गाळता जेव्हा हजारो रुपये त्यांना मिळू लागले तेव्हा त्यांनी मन मानेल तसे त्या पैशाला नाचविले. बाई, बाटली आणि सट्टा यांचा नाद अनेक वेळा हद्दीबाहेर संगतीमुळे जसा गेला, तसाच काही चारदोन चांगल्या मित्रांच्या निरपेक्ष प्रेमामुळे ते ह्या आयुष्यातून उठविणाऱ्या उपभोगातून शिरसलामत बचावत गेले. आपला हा कमीपणा, हे दुर्गुण त्यांना आयुष्याच्या उत्तरकाळी जेव्हा पैशाला पैसा दिसेनासा झाला तेव्हाच चांगले जाणवले. हा प्रमाणाबाहेर मिळालेला पैसा आला कसा आणि गेला कसा, हे त्यांना कळले तेव्हा त्यांच्या जवळचा पैसा संपला होता. ह्या अशा पैशाला ते जुगारी पैसा म्हणून संबोधतात. आपण मिळव-लेल्या लाखो रुपयांपैकी थोडे जरी सत्कार्यासाठी उपयोगात आणले असते, लोकहिताच्या कामासाठी थोडा जरी त्याचा उपयोग केला असता तर आयुष्याच्या उत्तरकाळात मानसिक तरी समाधान लाभले असते.पण

ह्या मायानगरीतील या जुगारी पैशाचा असा उपयोग होऊ नये असा बहुधा शाप मिळालेला असावा ! सार्वजनिक कार्य आणि त्यासाठी पैसा खर्च करणे ही गोष्ट तर सोडा, पण आपण निर्माण केलेली चित्रसंस्था आपल्या हयातीत किंवा आपल्या हयातीनंतर सुरळीत चालावी अशी वृत्तीही अनेक कलावंतात नसते. म्हणूनच पैशाच्या व्यवहारात तो मिळत असता प्रमाणाबाहेर दुसऱ्यावर अंधविश्वास टाकणे अगर तो प्रमाणाबाहेर खर्च करणे याच गोष्टीची खंत, बोचणी त्यांना आपल्या म्हातारपणी पैसा थोडाफार मिळत असतानाही सतत लागलेली होती.

चंद्र आणि समुद्राचे वेड त्यांना होते. मुंबईच्या रेडिओ क्लबच्या हिरवळीवर बसून चांदण्या रात्री समुद्राची भरती आणि चंद्राचे चांदणे यांच्या काव्यमय शांत वातावरणात त्यांनी आपल्या कितीतरी उद्विग्न रात्री घालविल्या !

मूकपटाच्या जमान्यापासून अगदी परवा परवापर्यंत ते भूमिका करत होते. अनेक हिंदी चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. त्यांच्या अभिनयाची चमक, वृत्तीतील मोकळेपणा, भूमिकांची विविधता मराठी चित्रपटात जेवढी आढळते आणि स्मरणात राहते तेवढी ती हिंदी चित्रपटात प्रकट होत नाही. ' जय मल्हार ', ' जशास तसे ', ' पसंत आहे मुलगी ', ' भाग्यरेखा ', ' शिलंगणाचे सोने ', ' पावनखिंड ', ' नायकिणीचा सज्जा ', ' कल्याण खजिना ', ' मानाचं पान ', ' जगावेगळी गोष्ट ', ' शामची आई ', ' महात्मा फुले ', ' साखरपुडा ' इत्यादी अलीकडची ही चित्रपटाची नावे आणि त्यातील त्यांच्या विविध भूमिका याच गोष्टींच्या निदर्शक नाहीत काय ? ' जयमल्हार 'मध्ये कल्लू भैरव ' मानाचं पान ' मध्ये दौलू वस्ताद ' शामची आई 'मध्ये शामचे आजोबा, ' महात्मा फुले' मध्ये फुल्यांची भूमिका त्यांच्या अभिनयसंपन्नतेची यशस्वी साक्ष देणाऱ्या आहेत. आणि ह्यापैकी ' शिलंगणाचे सोने ' या चित्रपटात काम करत

असता भरधाव घोड्यावरून पडून ते आयुष्यात तिसऱ्यांदा मरणाला भेटून आले. अजून बहुधा यमराज त्यांना स्वर्गातील चित्रपटात काम द्यायला नाखूष असावा ! या भयंकर अपघातातूनही ते बचावले. ते बहुधा त्यांच्या मनात राहिलेल्या एका अपुऱ्या कलागुणांच्या पूर्तीसाठीच !

दादरला अप्पा पेंडसे त्यांना बेबंदशाही नाटकांत त्यांनी काम करावे म्हणून भेटायला आले. चित्रपटात अनेक वर्ष घालवलेल्या ह्या कलावंताच्या मनात आपण एकदा रंगभूमीवरही आपली चमक दाखवावी अशी इच्छा याच काळात वारंवार येऊ लागली होती. आचार्य अत्र्यांच्या कानावर बेबंदशाहीची ही कुणकुण गेली आणि त्यांनी त्यांना बेबंदशाही ऐवजी ' झुंझाररावची ' भूमिका करण्याचा सल्ला दिला. मार्च १९४९ ला झुंझारराव नाटकाचा त्यांची भूमिका असलेला प्रयोग झाला. २५००० रुपये एका प्रयोगाला मिळाले. पण आयुष्याचे नाट्य अजून संपले नसावे ? कोल्हापूरहून यानंतर असेच ते येत असता भीषण मोटार अपघात होऊन ते उलटलेल्या मोटारीखाली सापडले. हा पहाडासारखा माणूस होता म्हणूनच तो या अपघातातून वाचला. पण तरीही आठ महिने अंथरूणाला खिळून राहिला होता.

अशा अपघातातून बरे झाल्यावर त्यांच्या वयाचा दुसरा कुणीही माणूस दगदगीच्या भानगडीत न पडता कोल्हापुरात मिळतील त्या भूमिका करीत स्वस्थ बसला असता. पण संकटांना घाबरणे हे त्यांच्या स्वभातच नव्हते. तरुणाच्याच उत्साहाने ते पुन्हा मुंबईला आले. आणि ' नवनाट्य मंदिर प्रा. लि. ' ची स्थापना जून १९५३ ला त्यांनी चिंतामणराव कोल्हटकर आणि स्नेहप्रभा प्रधान यांच्यासह केली. झुंझारराव आणि भावबंधन या दोन नाटकांचे जवळ जवळ दीडशे प्रयोग त्यांनी महाराष्ट्रभर केले. रंगभूमीवरील आनंद हा असा त्यांनी झुंझारराव आणि घनःश्याम होऊन लुटला. स्वतः नाट्यमंडळी स्थापन केल्यावर आणि ठिक-

ठिकाणचे अनुभव घेतल्यावर नाटक धंद्यातील अडचणी त्यांच्या लक्षात आल्या. नाटकावरील करमणूक कर सरकारने रद्द करावा, स्वतंत्र नाट्य-गृहाची ठिकठिकाणी सरकारने निर्मिती करावी, सरकारी पातळीवरून या कलेला आणि यातील कलाकारांना उत्तेजन द्यावे इत्यादी गोष्टींसाठी त्यांनी मंत्री, अधिकारी यांच्याशीं गाठीभेटी, पत्रव्यवहार सुरू केला. आणि अखेरीस त्यांच्या बहुतेक मागण्या सरकारने आज या ना त्या रीतीने मान्य केलेल्या आहेत. पण त्यांना मात्र मनांत असूनही कर्ज झाल्याने आपली नाट्यसंस्था अखेरीस बंद करावी लागली. या काळ'त त्यांनी 'एकच प्याला' मध्ये सुधाकराचीही भूमिका आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अभिनयाने सादर केली होती.

शांतारामबापूंकडे ते असताच शांतारामांचे सहकार्य त्यांच्या नाट्य-चळवळीला लाभले. आणि त्यांच्याच सक्रीय सहानुभुतीने रंगमंदिर ही नाट्यसंस्था त्यांनी पुन्हा एकदा स्थापन केली. या संस्थेचा जन्म बहुधा 'शिवसंभव' या नाटकासाठी असावा. या काळात 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' जशी महाराष्ट्रभर चालू होती तशीच शिवसंभवच्या प्रयोगांची मालिकाही महाराष्ट्रभर चालू होती. आणि य नाटकाचा सांगता समारंभ प्रत्यक्ष शिवनेरीवर व्हावा अशी परमेश्वराची इच्छाच असावी म्हणून महाराष्ट्र स्थापनेच्या प्रथमदिनी तीन लाख प्रेक्षकांसमोर नाटकाचा प्रयोग झाला. असा राजयोग कोणत्या तरी नाटकाच्या बाबतींत आजपर्यंत आला आहे का ?

१९६७ साल उजाडले ! आपल्या कोल्हापूरच्या 'साईस्मृती' या बंगल्यात साईबाबांच्या चांदीच्या मूर्तीकडे मधूनच पहात, सुवासिक उद-बत्तीचा गंध जाणवल्याने मधूनच अस्वस्थ होत, बाबांच्या पायांशी वाहि-लेल्या जाई, मोगरा या फुलांकडे लक्ष जाताच एक दीर्घ श्वास सोडून ते

डोळे मिटत आणि आपल्या आयुष्याच्या चित्रपटाचे बहुरंगी नाट्य त्यांच्या डोळ्यापुढे टेलिव्हिजनच्या पडद्याप्रमाणे तरळून जात असे.

त्यांची प्रकृती सतत ढासळत आहे या वार्ता वर्तमानपत्रातून अनेकांना कळत होत्या, अनेकजण त्यांना भेटायला मिळेल तसे येत होते. कधीं शुद्धीवर तर कधी ग्लानीत ते पुन्हा आपलाच गतकाळ एखाद्या तुटक वाक्याने भेटीला येणाऱ्या माणसाला सांगून जात.

खांडेकर त्यांना भेटायला येऊन गेले त्यावेळी ते म्हणाले, "त्यांना उगीच त्रास दिला. मी काय केले या लोकांसाठी? म्हणून ही सारी मंडळी मला भेटायला येतात?"

"......मी पुन्हा हंस कंपनी सुरू करणार आहे. मी पुन्हा चित्रपट काढणार आहे......"

मधूनच वेदना असह्य झाल्याने ते विव्हळत. यमराज यायला निघाला होता. पण अजून तो 'साईस्मृती' जवळ यायला बराच अवधी असावा!

मरणापूर्वी चारपाच वर्षे त्यांना वाचनाची गोडी लागली होती. कधी ते स्वतः वाचीत कधी दुसऱ्याकडून वाचून घेत. आपल्याला फार उशीरा वाचनाची गोडी लागली म्हणून त्यांना याबद्दल सतत हळहळ वाटत होती.


साईबाबावर आणि गुरुवारवर तशीच साधुसंतावर त्यांची भक्ती होती. मनाच्या कोपऱ्यात तग धरून राहिलेले सात्त्विक विचार सतत त्यांचा पाठपुरावा करीत राहिल्याने आपल्या भल्याबुऱ्या आयुष्यात ते अनेकदा भक्तीने भारावून अशा लोकांच्यापुढे नतमस्तक झाले होते.

बहात्तर वर्षांचे लाभलेले आयुष्य अखेरीस कर्क रोगाचे निमित्त होऊन संपले. मृत्यूची चाहूल त्यांना अनेक दिवस आधी लागली असावी. कुणाचे पत्र आले तर ते त्याला चक्क लिहीत, "अहो, हा

अखेरचा प्रवास ! उतार वयात व्याधींनी सोबत करायची नाहीतर कुणी करायची ?" आणि या व्याधींच्या संगतीतच अखेरचे त्यांचे दिवस त्यांच्या आवडत्या कोल्हापूरलाच गेले. प्रकृती ढासळू लागली तेव्हा भालजी पेंढारकर, व्ही. शांताराम, संध्या, त्यांची पत्नी आणि मुलेही अधिकच दुःखी झाली. 'सैरंध्री' या मूकपटात १९२० साली विष्णूची भूमिका मुक्याने करणारा हा कलाकार अखेरीस शेकडो भूमिका बोलक्या करूनही पुन्हा आयुष्याची अखेरची भूमिका नोव्हेंबर १९६७ ला करीत असता तो मनोमन असेच म्हणाला. असेल काय, अजूनही माझ्या डोळ्यासमोर एक स्वप्न तरळत आहे, एक दिवस असा यावा की शेक्सपिअरच्या जन्म गावी जगातील सर्व राष्ट्रांनी आपआपल्या भाषेत ऑथेल्लो म्हणजे झुंझारराव नाटकाचा प्रयोग करावा. आणि त्यातून सर्वोत्कृष्ट कलाकाराला ठेवलेले मानचिन्ह हिन्दी ऑथेल्लोच्या प्रयोगाला मिळवून आपण ते आपल्या प्रिय भारतात आणावे; आणि मुंबईतील भारताच्या प्रवेशद्वाराजवळ श्री शिवप्रभूंच्या चरणी अर्पण करावे.

३

# सी. के. म्हणजे . . .



कला, क्रीडा आणि साहित्य या त्रिविध गोष्टींनी माणसाचे जीवन सुसंस्कृत आणि संपन्न होते. सर्व दृष्टीने प्रगती होण्यासाठी मनुष्याला या गोष्टींची आवश्यकता असते. म्हणूनच अधुनिक शिक्षण शास्त्रात बौद्धिक वाढीला महत्त्व न देता मुलाच्या शारीरिक वाढीकडे तेवढेच लक्ष दिले जाते. कलागुणांची वाढ आणि जोपासना हीसुद्धा प्रथमपासूनच केली जावयास पाहिजे.

भारत स्वतंत्र होऊन इतकी वर्षे झाली असली तरी या विविध रंगी भारतात विविध भाषा आणि जमाती यांच्यातून एकात्म भावनेचा सूत्र-बद्ध भावी भारत घडविण्याचे कठीण कार्य आमच्या राज्यकर्त्यांना आणि शिक्षण तज्ञांना कठीण वाटत असले तरी विविधतेतील एकता कोण-त्याही भाषेची अडचण आड न येता जर कोठे प्रत्ययाला येत असेल तर ती क्रीडांगणावर होय.

खेळ मनाचा मेळ न कळत घालीत जातो. खेळांचे विविध प्रकार असले तरी कांही खेळ अखिल जगाला आज मान्य झाले आहेत. या खेळांचे लहान मोठ्या गटातील सामने निरनिराळ्या पातळीवर आजकाल हिरीरीने खेळले जाऊ लागले आहेत. माणसाच्या या धकाधकीच्या आयुष्यात जर त्याच्या अंगी खेळकरपणा नसेल तर छोटेसे दुःख त्याला हतबल करणारे ठरते. आणि असे हतभागी अखेळकर तरुण आयुष्यातील अल्पशा अपयशाने पार खचून जातात.कोणी रेल्वेखाली, कोणी ढेकणाचे औषध पिऊन, कोणी गळफास लावून घेऊन आणि अशाच अघोरी मार्गाचा अवलंब करून परमेश्वराने त्याला दिलेले सुंदर जीवन तो अकाली नष्ट करतो. पण अशा माणसांना जर खेळकरपणाचे दर्शन आयु-ष्यात घडले असते तर कदाचित त्यांचे जीवन असे अकाली संपले असते का ? लाख संकटे झेलण्याचे सामर्थ्यसुद्धा खेळामुळे प्राप्त होते. अशा या विविध खेळात क्रिकेटचा खेळ आज भारतमान्य झालेला आहे.

टेनिसमध्ये जसा बिल टिल टन, हॉकीमध्ये जसा ध्यानचंद, बॉक्सिंग मध्ये जसा लुईस, तसा क्रिकेटमध्ये कर्नल नायडू होय.

आजच्या पिढीतील मुलांना हे नाव तितकेसे परीचित वाटणार नाही पण जे आज भारतीय कसोटी संघात खेळाडू म्हणून खेळत आहेत त्यातील बहुतेकांचे स्फूर्तिस्थान जर कोणी असेल तर ते भारतीय क्रिकेटचे पितामह कर्नल कंकय्या कोठारी नायडू होय.

क्रिकेटचा हा पितामह आज आपल्यात नाही. एकेकाळी आपल्या फलंदाजीने, गोलंदाजीने आणि क्षेत्ररक्षणाने क्रिकेटच्या क्षेत्रात चमकलेला हा तारा आज आपल्या आठवणींचा झगझगीत प्रकाश क्रिकेट शोकिनांना सदैव देत राहील.

भारत हा निसर्गसंपत्तीने समृद्ध असला तरी आमच्याकडे शिक्षणानें निर्माण होणारी मनाची समृद्धी अजून फारशी दृष्टीस पडत नाही. प्रत्येक क्षेत्रात आजसुद्धा भारतातील तरुणांना झगडावे लागत आहे. जिथे जायचे त्यासाठी वेळ आणि काळ खर्चावा लागत आहे. स्वातंत्र्याच्या काळातील ही अवस्था तर मग पारतंत्र्याच्या काळातील गोष्टीबद्दल काही विचारूच नका. म्हणून तर वयाच्या ३७ वर्षापर्यंत ह्या तरुणाला आंतरराष्ट्रीय सामन्यात भाग घेण्याची संधी मिळाली नाही. तशी ती मिळाली असती तर ऐन पंचवीशीत क्रिकेटची चमक त्यांना दाखविता आली असती तर, तर जगातले सर्व क्रिकेट शौकिन आज ब्रॅडमनविषयी बोलले नसते. ते बोलले असते फक्त सी. के.बद्दल.

होय, सी. के. बद्दल. कर्नल नायडू याच नावाने त्या काळी क्रिकेट क्षेत्रात ओळखले जात असत. हे नायडू महाराष्ट्रीयन होते हा त्यातला आणखी एक अभिमानाचा धागा. त्यांचा जन्म नागपूरला झाला. १ ऑक्टोबर १८९५ ला जन्म झालेल्या या मुलाची ऊडली वर्तविण्याचे

अवघड कार्य अर्थातच कोणी केले नाही. कारण त्याकाळी भारतात क्रिकेटचे नुकते कुठे आगमन झालेले होते. बहुतेक खेळाडू हे भारतीय इंग्रज अधिकाऱ्यांची मुले असत. आमच्या राष्ट्रीय रांगड्या वृत्तीला कित्येक वर्षांपर्यंत तो खेळ परका वाटत राहिला होता त्यामुळेच या खेळाकडे सामान्य भारतीय मुले फारशी त्याकाळी वळली नाहीत.

एक तर या खेळाचे साहित्य महागडे! खेळाचा थाट साहेबी! ह्यातले सर्व उपलब्ध शिक्षण इंग्रजीतून! त्याला लागणारे मोकळे आणि ठराविक प्रकारचे क्रीडांगण! रोजची प्रॅक्टिस. हा असा सर्व सरंजाम. दारिद्र्याने पिचलेल्या या सामान्य भारतीय मुलांना त्याकाळी थोडाच उपलब्ध होणार होता म्हणून भारतीय इंग्रज अधिकाऱ्यांच्या मुलांबरोबर श्रीमंत शौकिनांची खेळाडू मुले प्रथम क्रिकेटच्या क्रीडांगणावर दिसू लागली. म्हणूनच या खेळाचा भारतातील प्रारंभिक काल श्रीमंत क्रिकेट खेळाडूंचा काळ होय. सामान्य घराण्यातील असामान्य मुले ही त्याकाळी या क्षेत्रांत फारशी चमकली नाहीत असे म्हटले तरी अतिशयोक्तीचे होणार नाही. हा खेळ श्रीमंतांचा चैनीचा खेळ म्हणून भारतात समजला जात असे तो यामुळेच.

त्यांचे वडील आणि काकाही नागपूरला आपला वकिलीचा व्यवसाय करीत होते. ते दोघेही बॅरिस्टर होते. त्या दोघांनाही साहेबाच्या चेंडू फळीबद्दल साहेबाइतकेच प्रेम वाटत होते. वडिलापेक्षा त्यांचे काका आपल्या या छोट्या पुतण्याशी क्रिकेट खेळत. त्यांनीच त्याला मोठ्या प्रयासाने लहान बॅट व चेंडू घेऊन दिला. त्याकाळी असे साहित्य मिळणे कठीण असे. नागपूरच्या सिटी हायस्कूलमध्ये त्यांचे प्रारंभिक आणि माध्यमिक शिक्षण ते पूर्ण करीत असता त्यांच्या १४ व्या वर्षापासून ते या खेळाकडे विशेष आकर्षिले गेले.

मॅट्रिक झाल्यावर त्यांचे नाव नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमध्ये घाल-

ण्यात आले पण पोराचे लक्ष पुस्तकी अभ्यासापेक्षा ग्राऊंडवरील नाना प्रकारच्या खेळाकडे विशेष होते. त्यातल्या त्यात क्रिकेटची बॅट दिसली म्हणजे आनंदून जात. त्यांचे हात चेंडू टोलविण्यासाठी उतावीळ होत. त्यामुळे साहजिकच रखडत रखडत जेमतेम इंटरपर्यंत यांची गाडी कशी-बशी गेली. आणि त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा कालखंड विधा-त्याने त्यांना नकळत त्यांच्यापुढे आणून ठेवला. याच काळात त्यांच्या वडिलांनी इंदूर संस्थानात सिव्हिल जज्जाची नोकरी पत्करली आणि ते इंदूरला स्थायिक झाले. इंटरला बरीच वर्षे हिस्लॉप कॉलेजात तळ ठोक-णाऱ्या या मुलालाही त्यामुळे इंदूरला जावे लागले.

भरपूर उंची, सरळ नाक, सशक्त प्रकृती, इंटरपर्यंतचे शिक्षण, वडि-लांची पुण्याई या सर्वांचा परिणाम म्हणजे अखेरीस १९२६ ला त्याने इंदूर संस्थानातील लष्करात नोकरी धरली. आणि याच सालापासून त्यांच्या उत्कर्षाला सुरुवात झाली. १९२६-२७साली भारतात एम.सी.सी. संघ आला होता. त्या संघाचे नेतृत्व आर्थर गिलगीन यांच्याकडे होते. या नावाजलेल्या संघाविरुद्ध एक सामना खेळण्याची संधी सी. के. ना मिळाली. या संघात इंग्लंडचे त्या काळी नावाजलेले अनेक प्रसिद्ध कसोटी खेळाडू होते. मॉरल टेट, जॉर्ज गिअरी, मर्सस एरिल, यांची प्रभावी गोलंदाजी त्यावेळी या ३१ वर्षाच्या खेळाडूंने आपल्या नेत्र-दीपक खेळांनी ढासळून टाकली. आणि काय आश्चर्य पहिल्यांदा संधी मिळालेल्या या खेळाडूने अवघ्या ६५ मिनिटांत १०० धावा काढून साहेबी गोऱ्या साहेबाला चांगलेच बुचकळ्यात पाडले. त्यांचे यावेळचे तेरा षटकार आणि सोळा चौकार तर त्यांच्या कौशल्यपूर्ण खेळाची विजय मालिकाच होती. त्यांच्या खेळातील सौन्दर्य, तो आत्मविश्वास ती सह-जता तिथे जमलेल्या शेंकडो डोळयांचे पारणे फेडती झाली. आजपर्यंत डावलला गेलेला हा इंदूरच्या सैन्यातला एक अधिकारी आणि होळकर

संत्राचा खेळाडू एकदम जगमान्य झाला. त्याने केवळ या खेळात १०० च धावा केल्या नाहीत तर त्यात आणखी ५६ धावांची भर खेळातील चमक कायम टिकवून सहजपणे घातली.

काकाने वयाच्या ७ व्या वर्षी या मुलाच्या हातात दिलेला क्रिकेटचा चेंडू हा असा त्याने पहाता पहाता इंग्लंडच्या पाहुण्यांना वयाच्या ३१ व्या वर्षी नेत्रदीपकपणे टोलवून लावून भारतातले तरुण हे केवळ भारतीय खेळातच प्रविण नाही तर ते साहेबाच्या घरच्या खेळात-सुद्धा त्याला आश्चर्याने तोंडात बोट घालावयास लावू शकतात हे सिद्ध करून दाखविले. आणि इंदूरच्या या सैनिकाला त्याच्या या खेळाच्या असामान्यत्वामुळे जगन्मान्यता मिळाली.

त्यांना आज आपण क्रिकेटचे पितामह म्हणतो ते केवळ त्यांनी शेकडो धावा काढल्या. अनेक चौकार आणि षटकार मारले म्हणून का ? असे चौकार आणि षटकार तसे पाहिले तर आजचेही काही खेळाडू मारत नाहीत का ? आपला हनुमानसिंग घ्या, अजीत वाडेकर घ्या, रमाकांत देसाई घ्या, बापू नाडकर्णी घ्या, पाहिजे तर चंदू बोर्डे घ्या, आपला पतौडीचा नबाब घ्या हे प्रत्येकजण आजच्या कसोटी सामन्या-तले भारताचे खेळाडू आहेत. प्रत्येकात क्रिकेटचा कोणता ना कोणता विशेष गुण अस्तित्वात आहे. कोणी चांगला फलंदाज आहे, कोणी चांगला गोलंदाज आहे. कोणी चांगला क्षेत्ररक्षक आहे, कोणी चांगला कप्तान आहे. अशा निरनिराळ्या गोष्टींचे एकत्रित दर्शन म्हणजे भारतीय क्रिकेट संघ होय. अर्थात या प्रत्येकाला क्रिकेटच्या प्रत्येक उपांगाबद्दल माहिती असते पण त्याचे विशेषत्व कोठल्यातरी एकाच घटकात केंद्रित होते. आणि तेवढ्याच बाबतीत तो आपली चमक दाखवितो. पण या सर्व महत्त्वांच्या घटकांचे ज्ञान आणि त्यावरील प्रभुत्व या एकाच माणसात होते. ते उत्कृष्ट फलंदाज होते, गोलंदाज होते, क्षेत्ररक्षक होते

शिक्षक होते, मग अशा या माणसाला आपण पितामह म्हणणार नाही नाही तर काय म्हणणार ?

क्रिकेटचा हा पितामह तसा एका खेळातच प्रविण नव्हता अनेक खेळांची त्याला शाळा, कॉलेजमध्ये शिकत असल्यापासून आवड होती. म्हणूनच हायजंप, लॉंगजंप, चेंडू फेक, १०० यार्ड धावणे, ४४० यार्ड धावणे इत्यादी शालेय आणि महाविद्यालयीन स्पर्धेत ते नेहमी पहिला किंवा दुसरा क्रमांक मिळवीत असत.त्यांच्या क्रिकेटचा जीवनाचा पाया हा असा नागपूरला घातला गेला होता.

१९१५ सालची गोष्ट. मुंबईला माटुंगा आंध्र स्पोर्ट्स् असोसिएशनने नाना खेळांच्या स्पर्धा भरविल्या होत्या या स्पर्धेत तरुण नायडूने हिरीरीने भाग घेऊन अनेक स्पर्धात पहिला क्रमांक पटकाविला आणि आपले प्राविण्य मुंबईकरांना दाखविले. याच साली मुंबईला हिंदू जिमखान्यात त्यांचा वरील स्पर्धांच्या यशामुळे प्रवेश झाला. आणि १९१६ च्या चौरंगी सामन्यात ते गोलंदज म्हणून उभे राहिले. यातील पहिला सामना पुण्याला इंग्रज संघाबरोबर झाला. इंग्रजांच्या संघात फ्रॅकटॅरंट नांवाचा एक फिरकी गोलंदाज व फलंदाज होता. त्याला बाद करणे सोपे नव्हते पण नायडुंनी त्याला सहज बाद केले. आणि त्यांच्या खेळाची चमक प्रथम इंग्रज खेळाडुंना दाखविली. १९१६ साली मुंबईला झालेल्या सामन्यात ते उत्तम फलंदाज आणि अचूक क्षेत्ररक्षक म्हणून चमकले आणि तेंव्हापासून त्यांचे नाव क्रिकेटच्या क्षेत्रांत चक्रवाढ पद्धतीने पसरत राहिले.

इंग्रजांच्या या राजकीय धोरणाचे डावपेच त्यांनी खेळासारख्या निकोप प्रकारातही त्या काळी कळत नकळत लढविले होते. आणि म्हणून त्या काळी आस्तित्वात असलेल्या अनेक खेळाडूंना भारतीय पातळीवर किंवा गुणांच्या कसोटीवर एकत्र आणण्याऐवजी टिकटिकाणी जातीजातीचे

संघ निर्माण करून खेळातील आनंदाला, विजयाला जातीयतेचे खतपाणी त्यांनी पुरविले होते आणि यातूनच या निधर्मी भारतात जातीय विचारांची पाळेमुळे खोलवर रुजत गेली. हिंदू जिमखाना, मुस्लीम जिमखाना, पारशी जिमखाना इत्यादी नावाच्या संस्था यांचे द्योतक नाही का म्हणूनच त्या काळी हिंदूविरुद्ध पारशी, इंग्रजविरुद्ध हिंदू, पारशीविरुद्ध मुसलमान अशा प्रकारची नावे जिमखान्याच्या खेळासंबंधी वर्तमानपत्रात वापरली जात.

१९२९ साली चौरंगी सामना झाला तोही असाच हिंदूविरोधी पारशी जिमखान्यावर होता. पारशांचे सर्व खेळाडू उत्तम तयारीचे होते. हिंदू जिमखान्याची तयारी चांगली होती. वजीफदाराच्या बोलींगवर अनेक हिंदू जिमखान्याचे खेळाडू बाद होऊ लागले. जणू प्रत्येकाने यात्रे आणि ऑफ स्टंपच्या जरा बाहेरून जाणाऱ्या चेंडूला सणसणीत स्क्वेअरकट करण्याऐवजी तर्पण केल्यासारखे करून स्लीपमध्ये झेल देत असे. एका-मागून एक असे खेळाडू बाद होऊ लागल्यामुळे हिंदूची जिरू लागली. अनेकांचे चेहरे चिंताक्रांत झाले. टाळ्यांचा कडकडाट होईनासा झाला. मैदानात गंभीर शांतता पसरली. येणारा खेळाडू आत्मविश्वासाने खेळण्या-ऐवजी बिचकत बिचकत खेळू लागल्याने तो लवकरच बाद होऊ लागला. श्वास रोखले गेले. काय करावे ते कळेना. अशा वेळी आशेचा किरण ठरू पाहणारा नायडू शांतपणे विकेटपाशी येऊन उभा राहिला.

त्यांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे जणू काही घडले नाही, असे समजून ते खेळाला आत्मविश्वासाने उभे राहिले. सावकाश चौफेर क्षेत्ररचना पाहिली. मैदानावर खडे अगर ढेकळे असलेली त्यांना आवडत नसत. प्रतिस्पर्धी खेळाडूप्रमाणेच याही गोष्टी त्यांच्या डोळ्यात खुपत होत्या. जवळपासचे खडे आणि ढेकळे उचलून ते प्रथम दूर फेकून देत असत. नेहमीप्रमाणे ही गोष्ट त्याने यावेळी केली. बॅट घेऊन त्यांनी पहिला चेंडू

धिमेपणाने अडविला. शांतता हाळू लागली. स्तब्धता कुजबुजू लागली. प्रेक्षकांनी रोखलेला श्वास सोडला. पुन्हा दुसरा चेंडू येताच तो जितक्या वेगाने आला तितक्याच प्रतिवेगाने त्यांनी तो आपल्या पोलादी मनगटाच्या ताकदीने असा जबरपणे तडकविला की वजीफदाराची चांगली जिरली. म्हणून प्रेक्षकांनी खेळ सुरू झाल्यापासून पहिल्यांदाच टाळ्यांचा कडकडाट केला. बाऊंडरीवर बसलेल्या उत्साही शाळकरी पोरांनी आपल्या टोप्या उडवून आनंदाचा एकच कल्लोळ उठविला. खेळात दम नाही म्हणून स्टँड सोडून बाहेर गेलेले या आवाजाने भराभर पुन्हा आपआपल्या जागेवर बसू लागले आणि अखेरीस पराभूत होत असलेला डाव सावरला गेला. हिंदू जिमखाना त्यावेळी जिंकला. त्याला कारण नायडुंचे त्यावेळचे खेळणे होय.

अनेक खेळाडुत आढळून येणारा उतावळेपणा यांच्यात बिलकूल नव्हता. प्रतिपक्षातील खेळाडुंचे प्रत्यक्ष वारकावे ते हेरून असत. ते नेहमी धिम्यावृत्तीने खेळत असता पीचवरील खडी उचलून फेकून देण्याच्या सवयीमुळे ते आपला डाव एकदम प्रतिपक्षाच्या लक्षात येऊ देत नसत. आणि म्हणूनच त्यांचा खेळ मोठा प्रेक्षणीय होत असे. प्रतिपक्षाच्या लक्षात येण्यापूर्वी ते कव्हरड्राईव्हज, ऑफड्राईव्हज इतक्या शिताफीने मारीत की पाहणारा प्रेक्षक आश्चर्यात पडत असे.

दुलीपसिंहाप्रमाणे सर्व दिशांना सहजपणे चेंडू फटकविणारे फसवे स्पीन बोलर राजलिंगम् हे त्यांना गुरुस्थानी मानीत असत. आठवड्यातील एकही दिवस त्यांचा कधी रिकामा नसे. क्रिकेटचा सीझन संपला की हॉकी, फुटबॉल, टेनिस, नेमबाजी, ब्रीज, बिलीयर्डस फार काय कॅरमसुद्धा ते खेळत. ते हे खेळ नुसतेच खेळत नसत तर ज्या खेळात ते लक्ष घालीत त्या खेळात ते आपले कौशल्य पणाला लावून त्यात प्राविण्य संपादित. आणि क्रिकेटप्रमाणे त्यांचे इतर खेळही आकर्षक ठरत. जणू

यांचा जन्म खेळण्यासाठीच झाला होता. खेळण्याचे त्यांना जबरदस्त व्यसन होते. रोज कुठला तरी खेळ खेळल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. असे जरी असले तरी त्यांच्या नावाचा दबदबा निर्माण केला तो क्रिकेटच्या खेळाने !

क्रिकेट शौकिनांच्या गळ्यातले ते ताईत होते. भारतीय क्रिकेटच्या इतिहासात अनेक पट्टीचे खेळाडु होऊन गेले पण त्यांच्यासारखे नायडु-युग निर्माण करण्याची धमक फारच थोड्या खेळाडुंमध्ये होती. नायडु म्हणजे सिक्सर असे समीकरण त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण खेळामुळे निर्माण केले होते. इंदूर आणि मुंबईची क्रीडांगणे त्यांच्या स्मृतीची आजही अनेकांना आठव द्यायला कारणीभूत होतील. या दोन क्रिडांगणावर ते विशेष करून खेळले. ते इंदोरला गेल्यानंतर त्यांनी होळकर संघाला सजीवता प्राप्त करून दिली. जुन्या होळकर संघात हो असत त्यांनी चार वेळा रणजी करंडक त्या संघाला आपल्या कौशल्यामुळे मिळवून दिला. वास्तविक या संघाला रणजी ट्रॉफी खेळण्याची मान्यतासुद्धा भारताच्या क्रिकेट कंट्रोल बोर्डाने प्रथम नाकारली होती. होळकर संघाचे स्वतंत्र अस्तित्व कंट्रोल बोर्डाला प्रथम मान्य नव्हते. पण त्यांच्यामुळे अखेरीस होळकर संघाला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले. अनेक सामने या संघाने जिंकले.

खेळाला ते परमेश्वर समजत आणि खेळाडूला भक्त समजत. परमेश्वराची आराधना करायची म्हणजे भक्त । दीनवाणा, भावडा, आत्मविश्वासहीन असता कामा नये; तर तो बुद्धिनिष्ठ, आत्मविश्वासी आणि कणखर शरीराचा असला पाहिजे. एवढ्याशा चेंडूच्या फटक्याने आऊट होणारा, जखमी होणारा किंवा हातपाय मोडून घेणारा खेळाडू त्यांना आवडत नसे. आपले शरीर आणि वागणे या दृष्टीने त्यांनी आदर्श ठेवले होते. शरीर निकोप राहावे म्हणून ते नियमित व्यायाम घेत. प्रत्येक खेळा-

डूनेही अशाच प्रकारे वागावे असे त्यांचे मत आणि शिक्षण असे. आपल्या होळकर संघाच्या बाबतीत ते या दृष्टीने विशेष प्रयत्नशील रहात. एकदा होळकर संघ आणि बंगालचा संघ यांच्यात कलकत्ता येथे क्रिकेटचा सामना झाला. त्या सामन्यामध्ये पहिल्या डावात होळकर संघाने त्या दिवशी त्यांचा एकही खेळाडू बाद न होता २२५ धाव केल्या होत्या. तेव्हा होळकर संघाने ४५२ धावा करून सुद्धा हा सामन त्यांना हरावा लागणार म्हणून त्या संघातील सर्व तरुण खेळाडू अस्वस्थ झाले. त्यांच्या मनाला निराशा स्पर्श करू लागली. त्यांचे ते उदास चेहरे कर्नल नायडूंनी पाहिले. तेव्हा त्यांनी त्या दिवशी रात्री सर्व खेळाडूना दुसऱ्या दिवशी कसा खेळ करायचा याविषयी सूचना दिल्या बंगालच्या संघाचा कमकुवतपणा कुठे आहे हे त्यांनी हेरले होते. तेव्हा त्यासंबंधी ते म्हणाले, "गड्यांनो, तुम्ही असे दु:खी होऊ नका. अरे, सामना आपणच जिंकणार आहोत!"

त्यांचे हे शब्द ऐकून अनेकजण त्यांच्याकडे आश्चर्याने पाहू लागले. प्रत्येकाच्या मुखावरची उदास छाया ढवळली गेली.

रांगणेकरच्या पाठीवर थाप मारून सर्वांकडे पहात ते म्हणाले, "मुलांनो, हे बघा! पंकजराज आज नाबाद राहिला आहे. त्याने नाबाद राहून १५२ धावा केल्या आहेत, त्याला उद्या सकाळी कसे बाद करायचे याचे मी नियोजन केले आहे." असे म्हणताच अनेकांचे चेहरे उत्साहाने उजळले. सी. के. काय सांगतात याकडे सर्वांचे लक्ष एकवटले गेले.

स्मित हास्य करीत सर्व खेळाडूकडे पहात ते म्हणाले, "हे बघा दोस्तांनो, पंकजचा वीक पॉईंट तुमच्या ध्यानात आला का? एखाद्याची आवड हा सुद्धा त्याचा वीक पॉईंट होऊ शकतो!"

सर्व जण त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागले. त्यांच्या बोलण्याचा कुणालाच उलगडा होईना. तसे ते हसत म्हणाले, "पंकजला

स्पेअर कट करणे फार आवडते. उद्या सकाळी जेव्हा सामना सुरू होईल तेव्हा आपला जलद गतीचा गोलंदाज......" त्यांनी अर्जुन नायडूकडे पाहिले.

अनेकांनी त्याच्या पाठीत प्रेमाचे धपाटे घातले. "अरे, अरे, अरे! आताच त्याला आऊट करू नका!" त्यासरशी सर्वजण मनापासून हसले.

कर्नलसाहेब पुढे म्हणाले, "तर सांगत काय होतो, आपला हा अर्जुन नायडू पंकजच्या षटकाराचा पहिला चेंडू ऑफ स्पीचच्या बाहेर टाकील. मी त्यावेळी गली पोझिशनला अतिशय जवळ उभा राहणार आहे. मला अती जवळ उभा राहिलेला पाहून पंकजराज निर्धास्त होऊन त्याच्या आवडीचा स्क्वेअर कट जरूर करील कारण मी अती जवळ गली पोझिशनला उभे राहिल्याने त्याला अशी बालंबाल खात्री वाटेल की, मी काही त्याचा झेल घेऊ शकणार नाही. आणि त्याचा तो अंदाज खराही आहे. पण तरीही आपण त्याला आऊट करू."

सर्वजण श्वास रोखून सी. के. पुढे काय सांगतात ते ऐकण्यासाठी अधीर झाले. त्यांच्या युक्तीची कोणालाच कल्पना येईना! काही क्षण असे गेल्यावर ते गंभीरपणे म्हणाले, "पण त्याने फटकाविलेला तो चेंडू मी माझ्या छातीवर घेईन." हे वाक्य बोलणे सोपे आहे. पण वेगाने आलेला असा चेंडू छातीवर अडवायला ती छातीसुद्धा तशीच निधडी असावी लागते! सी. के. ची शरीरप्रकृती मजबूत असल्याने त्यांचा शब्द म्हणजे त्यांची कृती अशी त्यांची वृत्ती सर्वांना परीचित होती. पण तरीही भलतेच काहीतरी घडले तर...त्यांनी असे काही करू नये, जीव धोक्यात घालू नये असे शब्द अनेकांच्या ओठावर आले. पण बाहेर मात्र पडले नाही. त्यांच्या पुढे बोलण्याचा धीर त्यांच्या प्रिय शिष्यांनासुद्धा त्यांच्या दराऱ्यामुळे लवकर होत नसे.

ते पुढे म्हणाले, " तशी चिंता करण्याचे काही कारण नाही ! माझ्या छातीवर झेललेला तो चेंडू उसळून कदाचित जवळपास पडेल. तेव्हा त्या चेंडूचा झेल माझ्या आसपास क्षेत्ररक्षण करणाऱ्यांनी घ्यावा."

सर्वांना त्यांची ती योजना पटली. पण तरीही अनेकांच्या चेहऱ्यावरील त्यांच्या या युक्तीने त्यांच्यावरील प्रेमाने काळजीची काळी छाया अधिकच वाढली. पोरांची ही मानसिक अवस्था त्यांनी चांगली हेरली होती. आपण एवढा धीर देऊनही काहींचे मन अजून निश्चयाची वाटचाल करू लागले नाही हे त्यांच्या लक्षात आले. जेवता जेवता ते म्हणाले, " चला, आज आपण सर्वजण नाटकाला जाऊ या ! "

नाटकाचे नाव निघताच अनेकांचे चेहरे उजळले. नीटनेटका पोषाख करून नाटकाच्या धुंदीतच त्याविषयी बोलत ते सर्वजण नाटकाला जाऊन बसले.

नाटक विनोदी होते. त्यामुळे हास्यरसाने मनावरील दुःखाचे सावट दूर झाले. मनातला पराभवाचा विचार त्यामुळे कुठल्याकुठे पळून गेला. रात्री दीड-दोन वाजता प्रत्येकजण नाटकाच्याच मूडमध्ये परतला. अर्थात ठरल्याप्रमाणे सामना होळकर संघाने जिंकला. इंदूरला परतत असता एका खेळाडूने त्यांना विचारले, " पण कर्नलसाहेब, तुम्ही आम्हाला काल नाटकाला का नेले होते ? "

ते हसत म्हणाले, " अरे, आपल्या संघावर सर्व खेळाडू प्रेम करतात. अर्थात् त्यामुळे आपल्या संघाचा होणारा पराभव जेव्हा स्पष्ट दिसू लागला तेव्हा त्यांची निराशा मला त्यांच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झालेली स्पष्ट दिसली. आपण जर नाटकाला गेलो नसतो तर रात्रभर याच गोष्टीचा विचार करीत तुमच्यापैकी अनेकजण जागत वसले असते आणि मनाच्या अशा अवस्थेत दुसऱ्या दिवशी ते खेळायला गेल्यावर

परिणाम व्हायचा तोच झाला असता. म्हणून मी तुम्हाला सर्वांना नाटकाला घेऊन गेलो. त्यामुळे दिवसाच्या खेळाचा विसर पडून मनाची निराशा दूर पळाली आणि आपल्याला......"

अशाच प्रकारची त्यांची दुसरी एक आठवण कसोटी खेळाडू खंडू रांगणेकर सांगतात — १९३९ साली पंचरंगी सामन्यांमध्ये प्रथमच होळकर संघातर्फे त्यांची निवड झाली होती. सामना मुस्लिम संघातर्फे सुरू होता. महम्मद निसार हा त्यांच्याकडील जलद-गति गोलंदाज होता. त्याने फटकारलेला एक चेंडू इतक्या जोराने उडाला, की रांगणेकरांच्या मांडीवर तो जोराने आदळला ! त्यावेळी फलंदाजांनी पॅड बांधायची पद्धत नव्हती. त्यामुळे चेंडूचा दणका इतक्या जोराने बसला की, तिथे एक सणक निर्माण झाली. रांगणेकर दुःखामुळे मांडी चोळू लागला. सी. कें. च्या हे लक्षात येताच त्यांनी त्या दिवशी जेवताना त्याला विचारले, "काय रे, तुला आयुष्यात पुष्कळ क्रिकेट खेळायचे आहे की नाही ?" रांगणेकरांनी होकार देताच ते म्हणाले, "ही जर तुझी महत्त्वाकांक्षा असेल तर आपल्या शरीराची अशी घडण घडव की एखादा चेंडू आपल्या शरीराच्या कुठल्याही अवयवावर आदळला तरी आपल्या शरीराचा आकार, नव्हे तर त्या आदळणाऱ्या चेंडूचा आकार बदलला पाहिजे ! समजलास ?"

मांडीतून अजूनही वेदना होत होत्या. पण तरीही त्यांचे ते बोल केवळ रांगणेकरांनीच नव्हे तर तेथे जेवत असलेल्या प्रत्येक खेळाडूने ऐकले आणि ते आपापल्या परीने आचरणात आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच तर त्यांच्या हाताखाली शिकण्याचे भाग्य लाभलेला प्रत्येक खेळाडू हा मुशीतल्या सोन्याप्रमाणे तावून सुलाखून निघाल्याने आपल्या पुढील आयुष्यात स्वपराक्रमाने चमकला.

त्यांच्याबरोबर खेळण्याची संधी मिळणे म्हणजे खरोखरच सुवर्णसंधी

होय. नवीन हौशी खेळाडूंना त्यांच्याबरोबर खेळतांना हा खेळ अतिशय सोपा भासे. चुकून एखादेवेळी एखादा गोलंदाज अवघडपणे गोलंदाजी करू लागला तर सी. के. त्याची गोलंदाजी फटकावून काढीत. त्यामुळे आपोआपच नवीन खेळाडूंमध्ये आत्मविश्वास निर्माण होत असे !

होळकर संघावर त्यांचे अत्यंत प्रेम होते. ते शिस्तीचे करडे असले तरी मनाने अत्यंत प्रेमळ होते. खेळाच्या मैदानावर खेळ चालू असता मधूनच आपल्या संघातील कोणत्याही खेळाडूने पाणी पिऊ नये हा त्यांचा नियम होता. असे खेळ चालू असता पाणी पिणे खेळाच्या आणि आरोग्याच्या दृष्टीने धोक्याचे आहे; अशी त्यांची समजूत होती. एकदा काय झाले, चंदू सरवटे या खेळाडूने एका सामन्यामध्ये एक शतक झळकाविले, त्याच्या घशाला कोरड पडली. प्रथेप्रमाणे क्षेत्ररक्षण करणाऱ्या खेळाडूंसाठी मैदानावर पाणी नेण्यात आले. चंदू सरवटेला अतिशय तहान लागली होती. आपल्या संघाचा नियम विसरून तो नकळत एक ग्लासभर पाणी प्यायला , आपल्या तंबूत बसून सी. के. हा सारा प्रकार पहात होते. त्यावेळी ते एकही शब्द बोलले नाहीत. परंतु पुढल्या सामन्याच्या वेळी जेव्हा होळकर संघाची निवड व्हायची होती. त्यावेळी निवड समितीमध्ये ते म्हणाले, " सरवटे हा खेळाडू म्हणून कितीही उत्तम असला तरी तो माझ्या संघात नको. तो नियमांचे, शिस्तीचे पालन करीत नाही ! "

निवड समितीच्या बाकीच्या सभासदांना अर्थातच त्यांची समजूत घालता घालता जीव नकोसा झाला. चांगल्या दीड-दोन तासांनंतर कशीबशी त्यांची समजूत पटली. आणि याही सामन्यात सरवटेने शिस्तीचे पालन करून खेळातील सौंदर्य टिकवून ऐंशी धावांची भर घातली. तेव्हा स्वतः सी. के. त्याच्या जवळ गेले, त्याच्या पाठीवर थाप मारीत ते त्याला म्हणाले, " अरे चंदू तू मला खरोखरच खूप आवडतोस. जर

तू आवडत नसतास तर मी तुझ्यावर कधीच रागावू शकलो नसतो."

असे होते सी. के ! क्रिकेट म्हणजे त्यांचे जीवन सर्वस्व ! या क्षेत्रात अत्यंत रुबाबदारपणे व झुंझारपणे ते आयुष्यभर वावरले. कसोटी सामन्यात त्यांना फार उशिरा खेळायला मिळाले. पण तरीही त्यांची चमक गोऱ्या साहेबांना दिसल्यावाचून राहिली नाही ! त्यांची फलंदाजी अनेक सामन्यात त्याकाळी विशेष गाजली. उभ्या आयुष्यात ते फक्त सहा कसोटी सामने खेळले. इंग्लंड आणि सिलोनच्या दौऱ्याबरोबर गेलेल्या संघांबरोबर फक्त ते गेले होते. असे असले तरी, दोनदा इंग्लंडला आणि एकदा सिलोनला गेलेल्या ह्या सी. के. ने आपल्या खेळाचा धाक, कौशल्य आणि सौंदर्य साऱ्या जगाला दाखविले. १९३२–३३ साली भारतीय संघाबरोबर ते गेले. वास्तविक ते पहिल्यांदा ह्या अनोळखी देशात आणि साहेबाच्या घरच्या मैदानावर गेले होते, पण कोणतेही आवाहन स्वीकारणे आणि न कचरता खेळणे हे तर त्यांचे वैशिष्ट्य ! लॉर्डस मैदानावर हा सामना खेळला गेला. त्यात त्यांची चमक सर्व क्रिकेट प्रेमिकांचे डोळे दिपवून गेली. भारताचा हा धिप्पाड गंभीर वृत्तीचा संघनायक लॉर्डस मैदानावर असा काही खेळला की, याने धावांचा जणू डोंगर रचला. ह्या दौऱ्यात त्यांनी १८४२ धावा काढल्या. पासष्ट खेळाडूंना त्यांनी बाद केले. आणि शहात्तर सहांचे टोले किंवा सिक्सर त्यांनी लगावले. सर्व इंग्रज खेळाडू आणि क्रिकेट प्रेक्षक त्यांचा तो नेत्रदीपक गतिमान खेळ पाहून खूष झाले. आणि म्हणूनच 'विसडेन' या क्रिकेटविषयक जगप्रसिद्ध वार्षिकात त्या वर्षी त्यांची नोंद जगातील पहिल्या पाच अप्रतिम खेळाडूतील एक अशी त्यांच्या-बद्दल त्या नियतकालिकाच्या संपादकाला घ्यावी लागली असा हा असामान्य सन्मान मिळवणारे ते भारताचे पहिलेच खेळाडू होते.

प्रेक्षकांचे चित्त थरारून टाकणारा हा खेळाडू १९३५-३६ च्या

सुमारास म्हणजे वयाच्या सुमारे ४१ व्या वर्षी दुसऱ्यांदा इंग्लंडला भारतीय संघाबरोबर गेला. तेव्हाही त्यांनी शेकडो धावांचा डोंगर रचला त्यात अनेक चौकार आणि षटकार टोलावताना त्यांनी टाळ्यांवर टाळ्या घेतल्या. त्या त्यांच्या सौन्दर्यपूर्ण शिताफीच्या खेळामुळे त्याही वेळी त्यांनी अनेक खेळाडूंचा पाहता पाहता बळी घेतला होता.

यावेळी वास्तविक एलनचा वेगाने आलेला चेंडू एकदा त्यांच्या छातीवर जोरात आदळला होता. दुसरा कोणी लेचापेचा असता तर तो मटकन् खालीच बसला असता. पण होणाऱ्या वेदना तशाच सहन करून त्यांनी आपल्या खेळातील कौशल्य तशाही परिस्थितीत दाखवले. १९३४ ते १९४३ या काळात ते सातत्याने रणजी करंडकमध्ये खेळत असत. त्याकाळी असा एकही संघ नव्हता की ज्या संघामार्फत ते खेळले नाही. मग तो गव्हर्नर संघ असो, अगर कोणत्याही एखादा संस्थानिकाचा संघ असो, सी. के. त्यात नाहीत असे होत नसे.

प्रतिपक्षाच्या मनात भीती उत्पन्न करणारा हा खेळाडू आपल्या खेळाने एकप्रकारचे उत्साहदायी वातावरण आपल्या शैलीदार खेळामुळे निर्माण करत असे.

ते अनेक राज्यसंघातर्फेही त्या काळी खेळले. भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळाच्या निवड समितीचे अनेक वर्ष ते सभासद होते. आणि या समितीची अध्यक्षपदाची धुरा त्यांच्या गळ्यात पडताच त्यांनी त्या पदाचा फायदा अनेकांना अडविण्यासाठी नव्हे तर अचूक निवडण्यासाठी केला. १९४८–४९ च्या सुमाराला ए. एम्. सी. सी. संघ भारतात आला आला होता. त्या संघाविरुद्ध इंदूरला एक सामना झाला. ब्रायन स्टॅथम हा अतिशय जलद गतीचा गोलंदाज ए. एम्. सी. सी. तर्फे गोलंदाजी करत होता. त्याने पाहता पाहता खेळाडू बाद केले. पाचवाही खेळाडू त्याने चेंडूवर बाद केला. सी. के. हे सारे गंभीरपणे पहात होते. तरुण

खेळाडूंची हा गोलंदाज पार तिरपिट उडवणार हे लक्षात येताच वयाच्या चौपन्नाव्या वर्षी ते स्वतः तंबूतून उठले आणि हातात बॅट घेऊन मैदानावर आले. त्यावेळी रांगणेकर नॉटऑऊट होता. तेव्हा ते त्याला म्हणाले, " अरे, या स्टॅथमच्या गोलंदाजीत तसे भिण्यासारखे काही नाही. मी कसा खेळतो ते पाहा. " आणि त्यांनी त्याची गोलंदाजी अशी चौफेर फटकावली की, ए. एम. सी. सी. संघांचा कर्णधार नंतर त्याला म्हणाला, " अरे वाईम् मला असे वाटले होते की तू जलद गतीचा गोलंदाज आहेस म्हणून ! परंतु सी. केंचा खेळ पाहिल्यावर असे वाटू लागले आहे की, तुझा चेंडू पीचवरून जलद गतीने निघण्यापेक्षा त्यांच्या बॅटवरून तो जास्त जलद गतीने पिटाळला गेला आहे. "

भारतीय क्रिकेटचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले.अनेक खेळाडूंना त्यांनी स्वतः उत्तेजन देऊन तयार केले. मुस्ताक अली,जगदाळे, भांडारकर, सरवटे, गायकवाड; रांगणेकर, निंबाळकर इत्यादी अनेक नावे त्यांच्या शिष्यवर्गात मोडतात. पतौडीचा नबाब हा त्यांचाच शिष्य !

त्यांच्या सिक्सरला उंची आणि लांबी असे. त्यामुळे पहाणाऱ्याचे नेत्र त्या फटकारामुळे क्रिकेटमधील सौन्दर्याने आनंदित होत.

१९५२ ते ५४ मध्ये खेळल्या गेलेल्या राष्ट्रकुल सामन्याच्या संघाची निवड त्यांनीच केली होती. हा संघ 'रौप्यमहोत्सवी आंतरराष्ट्रीय संघ' म्हणून क्रिकेटच्या जगात प्रसिद्ध आहे. आपल्या हयातीत त्यांनी धावांची २०० फटके आणि २६ शतके काढली. ती खेळातील कुशलता सतत कायम ठेवून त्यांनी काढली आहेत. यातील प्रत्येक फटकार आणि प्रत्येक शतक आजही त्यावेळी ज्यांनी ज्यांनी त्यांचा खेळ पाहिला त्यांच्या डोळ्यापुढे त्यांची भरपूर उंची असलेली देहयष्टी आणि गंभीर मुद्रा स्पष्ट केल्यावाचून रहाणार नाही.

त्याची बोलण्याची पद्धत गंभीर असे. पण विनोदाचे त्यांना वावडे नव्हते. बोलताना एखादेच वाक्य ते असे बोलत, की ऐकणाराची हसता हसता पुरेवाट होत असे : इंग्रजीवर असलेल्या प्रभुत्वामुळेच ते असा प्रासंगिक आणि चटकदार विनोद करून जात. वाचनाची आणि संगीताची त्यांना आवड होती. इतर कोणत्याही विषयावर बोलण्यापेक्षा क्रिकेटवर बोलणे त्यांना मनापासून आवडत असे.

मद्रास प्रांतातून आलेलं त्यांचं घराणं महाराष्ट्रीय जीवनाशी इतकं एकरूप झालं होतं की, घरचे काही रीतीरिवाजच फक्त ते मद्रासी असल्याचे ध्यानात आणून देत.

पण खेळाला आणि खेळाडूला, नव्हे कोणाच्या कलेला आणि कलाकाराला जात, प्रांत, जमात या प्रांतात वावरता येणार नाही. तसा तो वावरू लागला तर त्याचा मोठेपणा, त्याचे वैशिष्ट्य हे जागतिक स्वरूपाचे होऊच शकणार नाहीत !

सी. के. जवळ जवळ वयाच्या ६२ वर्षांपर्यंत क्रिकेट खेळत होते. ते इंदूरला स्थायिक झाल्यामुळे त्यांचे अखेरचे दिवस इंदूरलाच गेले. आजही त्यांच्या घरी इंदूरला कोणी गेला तर त्यांची दोन मुले किंवा चार मुलींपैकी माहेरी आलेली एखादी मुलगी मोठ्या अभिमानाने त्यांच्या बैठकीच्या खोलीकडे तुम्हाला घेऊन जाईल. खोलीचे दार उघडले जाताच क्रिकेटच्या क्षेत्रातील ह्या अलिबाबाच्या गुहेत तुम्हाला काय दिसेल ? मोहरांचे ढीग ? हिऱ्यांच्या राशी ? होय, होय ! ते पाहा ते समोर कपाट दिसते आहे ना, त्यात लहानमोठे चांदीचे पेले कसे चकचकताहेत ! अगदी जवळ जाऊन पाहिलंत कां, त्यावर बारीक सुंदर अक्षरात क्रिकेटच्या सी. कें.च्या स्मृती कोरलेल्या आहेत ! ते पाहा दुसरे कपाट ! काय म्हणता, सोन्याचांदीची लहानमोठी तबके तुम्हाला समोर दिसतात ?

अनेक लहान मोठ्या वस्तू तुम्हाला तिसऱ्या एखाद्या कपाटात दिसतात आणि हे काय! चवथ्या कपाटात स्टंपस, ह्या बॅटी, हे चेंडू कशा चिठ्या डकवून व्यवस्थित मांडून ठेवलेल्या दिसतात! अहो, हेच ते भाग्यशाली स्टंपस, ह्याच बॅटस, हेच चेंडू ज्यांना सी. केंचा स्पर्श झाला आणि ते पाहा, त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात शतक काढले आहे! हे सारे सारे या स्टंपसनी ह्या चेंडूनी या बॅटीनी पाहिलं आहे बरं!

जन्मभर साहेबाचा खेळ खेळलेला, साहेबी रीतीरिवाज बाळगणारा, साहेबी रीतीरिवाज पाळणारा, सारे काही साहेबी थाटात जगणारा हा माणूस घरात आला की आपल्या कुलदेवतेकडे विनम्रभावाने सदा नतमस्तक होत असे. त्यांची कुलदेवता काली देवी हिची उपासना त्यांनी जन्मभर केली. एकदा ना. सी. फडके असेच त्यांना भेटायला गेले असता क्रिकेटविषयी सर्व काही बोलून झाल्यावर ते म्हणाले, "सी.के.भारताच्या तरुण पिढीसाठी एखादा संदेश द्या ना!" तेव्हा डोळे मिटून गंभीरपणे ते म्हणाले, "स्वतंत्र भारताच्या नागरिकांनी कालीची उपासना करावी. ताकद आणि हिम्मत या गुणांची जोपासना करावी."

पक्षघाताने ६७ साली ते अंथरुणाला खिळले पण तेव्हा त्यांचा नातू मध्यविभागातर्फे रणजी करंडक सामन्याकरता निघाला होता. राजस्थान संघाविरुद्ध जेव्हा त्यांच्या नातवाने आपल्या आजोबाचा चमकदार खेळ पुन्हा दाखवला आणि ते वृत्त जेव्हा त्यांच्या कानावर आले, तेव्हा त्यांना बोलता येत नसताही त्यांच्या चेहऱ्यावर झालेला आनंद हा एखाद्या भक्ताला देव भेटावा तसा होता!

भारत सरकारने त्यांच्या क्रिकेटच्या कामगिरीचा गौरव त्यांना पद्मभूषण ही पदवी देऊन केला. आणि अखेरीस हा तुफानी खेळाचा राजा, सी. के. म्हणजे सिक्सर, असे समीकरण मानणारा खेळडू

बॅटींगसाठी नुसते मैदानावर येत असता टाळ्यांचा कडकडाट घेणारा हा भारतीय क्रिकेटचा पितामह वयाच्या बहात्तराव्या वर्षी १४ नोव्हेंबर १९६७ ला इंदूर येथे चिरनिद्रित झाला! जणू ही चिरनिद्रा संपल्यावर तो पुन्हा मैदानावर येणार आहे, आणि लोक म्हणणार आहेत, "कम् ऑन सी. के.!"

* *

शाखा.
धा. क्र...११५...... दिनांक ....
विषय....क्रिशोर.. क्र...१५६...

BVBK-0400197

## अरगडे-कुलकर्णी प्रकाशन, १६।२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०

| | | |
|---|---|---|
| १. | जनी जनार्दन | २·५० |
| २. | तुम्हास अमुचे लाख प्रणाम | २·५० |
| ३. | शेक्सपीअर | २·५० |
| ४. | साधुसंत येती घरा (भाग १) | २·५० |
| ५. | ,, ,, (भाग २) | २·५० |
| ६. | राणी दुर्गावती | २·५० |
| ७. | साहसी सुनिलकुमार | २·५० |
| ८. | इसापनीती | २·०० |
| ९. | सागरपरींच्या कथा व इतर गोष्टी | १·५० |
| १०. | मजेदार गोष्टी | १·५० |
| ११. | सोनेरी गाय व इ. गोष्टी | १·५० |
| १२. | जादूचा हिरा व इ. गोष्टी | १·५० |
| १३. | लाल परी व इ. गोष्टी | १·५० |
| १४. | शेवंतीचे फूल व इ. गोष्टी | १·५० |
| १५. | फुलराणी व इ. गोष्टी | १·५० |
| १६. | शिरीषकुमार व इ. गोष्टी | १·५० |
| १७. | आधारवड व इ. गोष्टी | १·५० |
| १८. | राजकुमारी रूपा व इ. गोष्टी | १·५० |
| १९. | राक्षसाला शह व इ. गोष्टी | १·५० |
| २०. | चतुर राजकुमार | १·५० |
| २१. | अग्निनारायणाचा प्रसाद | १·५० |
| २२. | डॉ. झकिर हुसेन | १·०० |
| २३. | बासरीमधे लपले राक्षस | १·५० |
| २४. | राजमाता जिजाबाई | १·५० |
| २५. | सुरस अरेबियन कथा | १·५० |
| २६. | चतुर इसाप | १·५० |
| २७. | ताई मला ओवाळ | १·५० |
| २८. | डॉ. आंबेडकर | २·०० |
| २९. | ऐसे संत होणे नाही | २·५० |
| ३०. | अद्दल घडली | १·०० |
| ३१. | असे चमकले तारे | ३·०० |
| ३२. | उदंड झाले बलिदान | २·५० |
| ३३. | जुळे भाऊ | १·५० |
| ३४. | आधुनिक महर्षी | २·५० |
| ३५. | भारतीय स्वातंत्र्य प्रेरक | २·०० |
| ३६. | शांतिदूत | २·५० |
| ३७. | शांततेचे उपासक | २·५० |
| ३८. | आधुनिक संत | २·५० |
| ३९. | कॅप्टन हेन्री | १·५० |
| ४०. | भक्त जयदेव | १·५० |
| ४१. | साहसी सोमदत्त | २·०० |
| ४२. | हिरकण्या | २·५० |
| ४३. | फतेवाडीचा झुंझार | १·५० |
| ४४. | कलासागरातील मोती भा. १ | ३·०० |
| ४५. | ,, ,, भा. २ | ३·०० |
| ४६. | कुमार ज्ञानेश्वर | १·५० |
| ४७. | लाल बहादुर शास्त्री | ०·५० |

### कुमारमाला भाग १ ते ५ ( प्रत्येकी रु. २·५० )

१. भयचकित नमावे तुज रमणी २. अशी घेतली झुंज ३. दुःखिता

४. कहाणी एका राणीची ५. अशी ही वीरमणी

# मनोरंजक व बोधप्रद गोष्टींची पुस्तके

प्रत्येकी ०·५०

- हंसरे झाड
- सोनेरी गाय
- जादूचा हिरा
- लाल परी
- कुबडा हकीम
- जादूचा मोती
- विषारी विहीर
- लोभाचे प्रायश्चित्त
- आधारवड
- गुलाबी राक्षस
- गंपू पाण्यावरून चालतो
- हरिणीचा शाप
- जादूचा मासा
- उडत्या पादुका
- राक्षसाचा पाय
- शिरीष कुमार
- चंद्रशेखर
- शरश्चंद्र
- शेवंतीचे फूल
- कापसाची किमया
- जादूची कोंबडी
- राक्षसाला शह
- जंगलसे ज्यादा
- अरे बापरे भूत
- जादूची बाहुली
- बोलणारा पुतळा
- रोगी राक्षस
- फुलराणी
- मायाजाल
- गाणारा बुलबुल
- कुठे असतो देव
- तारा नगरी
- झिंबा नगरी
- वाघ, नाग व माणूस

■■■

## मनोरंजक व बोधप्रद गोष्टींचा संच

( संपूर्ण संच प्लास्टिकच्या पेटीत रु. १२·५० )

३१ पुस्तके, प्रत्येकी ०·५०

■■■

## बौद्धिक मिठाई अर्थात महान मानव संच

( प्लास्टिकच्या मजबूत पेटीत. रु. १७·५० )

( ६२ चरित्रांची ३५ पुस्तके, प्रत्येकी ०·५० )

आमच्या कायम ग्राहक योजनेचे सभासद व्हा.

—: प्राप्तिस्थळ :—

**अरगडे आणि मंडळी**
अप्पा बळवंत चौक,
पुणे ३०.

**सौ. मालिनी कुलकर्णी**
२४३ खेतवाडी, पहिली गल्ली
अलंकार सिनेमा शेजारी, मुंबई ४.

MINISTER

सत्यमेव जयते

GOVERNMENT OF MAHARASHTRA

शिक्षण [illegible] मंत्री
महाराष्ट्र
सचिवालय, मुंबई-३२.

31 OCT 1969

राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय थोर विभूतींची चरित्रे राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व व कुमारांवर सद्गुणांचा ठसा उमटविण्यात उपयुक्त ठरावीत अशा पुस्तकांचा 'महामानव' हा संच प्रकाशित केल्याबद्दल अरगडे कुलकर्णी प्रकाशन अभिनंदनास पात्र आहे. या संचाचा सर्वत्र प्रसार होवो हीच शुभेच्छा.

( म. प. चौधरी )